सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, २३ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २३९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com





**छत्रपती संभाजीनगर** – पांडे आयर्न ॲण्ड ट्रेडींग कं., शहा स्टील ट्रेडर्स, रॉयल ट्रेडर्स, वाय.के.ट्रेडर्स, **नारेगाव** – एन.के.ट्रेडर्स, **हर्सुल** – सुरेश ट्रेडर्स अँड हार्डवेअर, **बेरीबाग** – सारा ट्रेडर्स, **सावंगी** – अंजनी ट्रेडर्स, **पिसादेवी** – देवदत्त ट्रेडर्स, **शेंद्रा एमआयडीसी** – निशांत ट्रेडर्स, **करमाड** – साई बिल्डींग मटेरिअल ॲण्ड सप्लायर्स, **आडुळ** – शिवकृपा ट्रेडर्स, **वाळुज एमआयडीसी** – देवांश ट्रेडींग कंपनी, **वाळुजगाव** – चंद्रपुष्प इंटरप्राईजेस, **पडेगाव** – कमलेश ट्रेडींग कं, **वैजापूर** – समर्थ ट्रेडर्स, राजाराम स्टील ट्रेडर्स, **लोणी**– बाबा ट्रेडर्स, **देवगाव रंगारी** – मराठवाडा ट्रेडर्स, **खंडाळा** – रविराज ॲग्रो एजन्सीज, **गंगापूर**– श्री महालक्ष्मी स्टील पत्रा डेपो, हरिओम ट्रेडर्स, **लासूर स्टेशन** – साई ट्रेडिंग कंपनी (मढीकर), **लिंबेजळगाव** – श्री.विठ्ठल कृपा ट्रेडर्स, **महालगाव** – महालक्ष्मी स्टील ट्रेडर्स, **शिऊर बंगला** – जलाल ट्रेडर्स, **पैठण** – संजय ट्रेडर्स, **बिडकीन** – मानधने स्टील ट्रेडर्स, **वासडी** – संतोष ट्रेडर्स, **पिशोर** – रेणुका ट्रेडर्स, **सिल्लोड** – सहारा ट्रेडर्स, **भराडी** – श्रीकृष्ण ट्रेडर्स, **गोळेगाव** – सागर ट्रेडर्स, **उंडणगाव** – श्री.गणेश ट्रेडर्स, **अंधारी** – विशाल ट्रेडर्स, **आळंद** – गजानन ट्रेडर्स, **फुलंब्री** – गजानन ट्रेडर्स, शिव ट्रेडर्स, **पाल फाटा** – योगराज ट्रेडींग कंपनी, श्री.जगदंबा स्टील ट्रेडर्स, **बोरगाव गणपती** – संजय हार्डवेअर, **सुलतानपूर** – लक्की मशिनरी स्टोअर्स, **कन्नड** – मोरया ट्रेडर्स, **विहामांडवा** – वर्धमान हार्डवेअर अँण्ड मशिनरी, **शिऊर** – विठ्ठल ट्रेडर्स, **औराळा** – बालाजी ट्रेडर्स, **पाणपोईफाटा** – भगवती स्टील, **पाचोड** – श्रीनाथ ट्रेडर्स ॲण्ड हार्डवेअर, **चितेगाव** – दुर्गा स्टील ट्रेडर्स.

आयकॉन स्टील
टीएमटी बार


## मतमोजणीचा फार्म १७ सी भाग दोन, फेरीनिहाय तक्ता व अंतिम निकालाची प्रत त्वरित मिळावी काँग्रेसची मागणी

मुंबई, दि. २२ नोव्हेंबर: मतदान मोजणीदिवशीचा फार्म १७ सी भाग दोन, फेरीनिहाय तक्ता (परिशिष्ट-५७) व अंतिम निकाल (फार्म-२०) पडताळणीसाठी याची प्रत उमेदवार प्रतिनिधीला त्वरित देण्यात द्यावी ,अशा सूचना सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना द्याव्यात, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे केली आहे. त्याबाबत त्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, निष्पक्ष व पारदर्शक निवडणुकीसाठी लोकप्रतिनिधी कायद्याच्या तरतुदी अन्वये मतमोजणी टेबलवर फेरीनिहाय मतमोजणी झाल्यावर फार्म १७ सी मोजणी प्रतिनिधीची सही घेवून मोजणी पर्यवेक्षक निवडणूक निर्णय अधिकारी यांना देतो. त्या अगोदर त्याची दुय्यम प्रत मोजणी प्रतिनिधी यास किंवा उमेदवार प्रतिनिधी यास त्वरित देण्यात यावी. तसेच फेरीनिहाय तक्ता हा फार्म १७ सी भाग २ वरून सहायक निवडणूक अधिकारी तयार करतो तो परिशिष्ट ५७ च्या तक्त्याची दुय्यम प्रत उमेदवार प्रतिनिधीला त्वरित देण्यात यावी.ही कायदेशीर तरतूद असून या द्वारे मतमोजणी प्रक्रिया पारदर्शक आहे हे समजून येईल.

# प्रतिक्षा संपली! रंगणार आयपीएल २०२५चे सामने
## बीसीसीआयकडून वेळापत्रक जाहीर



नवी दिल्ली : क्रिकेटप्रेमी जगातील सर्वात मोठ्या क्रिकेट लीग आयपीएलची आतुरतेने वाट पाहत असतात. अशातच चाहत्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीची चर्चा आणि आयपीएल २०२५ मेगा लिलावाची उत्सुकता शिगेला पोहोचली असताना यासाठीचे वेळापत्रक जारी करण्यात आले आहे.

बीसीसीआयने आयपीएल २०२५चे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलनंतर लगेचच आयपीएल २०२५ सुरु होणार आहे. हा सामना १४ मार्च ते २५ मे या कालावधीत खेळला जाणार आहे.

दरम्यान, बीसीसीआयने आयपीएलच्या तिन्ही सीझनच्या तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार, २०२५चा पहिला हंगाम १४ मार्च ते २५ मे या कालावधीत खेळवला जाईल. दुसरा हंगाम १५ मार्च रोजी व अंतिम सामना ३१ मे रोजी होईल. तसेच आयपीएल २०२७ ची तारीख देखील समोर आली आहे. २०२७ चा आयपीएल सामना १४ मार्च ते ३० मे या कालावधीत असणार आहे.

# छत्तीसगड चकमकीत १० नक्षलवाद्यांचा खात्मा

रायपूर : छत्तीसगडच्या सुकमा येथे आज, शुक्रवारी सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत १० नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला. यावेळी सुरक्षा दलाने त्यांच्याकडून एके-४७ रायफलींसह मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे जप्त केली आहेत.

यासंदर्भातील माहितीनुसार छत्तीसगडच्या भांडारपदरच्या जंगलात सुरक्षा दलाचे जवान नक्षलवाद्यांची शोधमोहिम राबवत असताना अचानक चकमक सुरू झाली. यामध्ये १० नक्षलवाद्यांना ठार करण्यात पोलिसांना यश आले आहे.

चकमकीनंतर शोध मोहिम राबवण्यात आली. यात आतापर्यंत १० जणांचे मृतदेह सापडले आहेत. या परिसरात छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यातील कोंटा आणी किस्टाराम एरिया कमेटीचे नक्सली सदस्य असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सुकमा जिल्ह्यातील पोलीस स्टेशन भेज्जी क्षेत्राअंतर्गत्कोराजुगुड़ा, दंतेसपुरम, नागाराम, भंडारपदरच्या जंगल क्षेत्रात चकमक झडली. याबाबत बस्तचे पोलिस महानिरीक्षक पी. सुंदरराज यांनी सांगितले की, दक्षिण सुकमामध्ये डीआरजीसोबत झालेल्या चकमकीत १० नक्षलवादी मारले गेले आहेत. तसेच घटनास्थळाहून इन्सास रायफल, एके-४७, एसएलआर आणि इतर अनेक शस्त्रे जप्त करण्यात आली असून परिसरात सुरक्षा दलाची शोध मोहिम सुरू आहे.

दरम्यान या चकमकीनंतर मुख्यमंत्री विष्णुदेव साई यांनी सुरक्षा दलाचे कौतुक केले आहे. यासंदर्भात सोशल मिडीया प्लॅटफॉर्मवरील संदेशात मुख्यमंत्री म्हणाले की, सैनिकांनी मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे. आमचे सरकार झिरो टॉलरन्सच्या धोरणावर काम करत नक्षलवाद्यांविरुद्ध जोरदार लढा देत आहे. बस्तरमध्ये विकास, शांतता आणि सुरक्षा सुनिश्चित करणे ही आमच्या सरकारची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे विष्णुदेव साई यांनी सांगितले.

## काँग्रेस महाविकास आघाडी स्पष्ट बहुमतासह सत्ता स्थापन करेल : रमेश चेन्नीथला

तभा वृत्तसेवा

मुंबई, दि. २२ नोव्हेबर : विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेचा कौल महाविकास आघाडीलाच मिळेल व स्पष्ट बहुमतासह काँग्रेस महाविकास आघाडी सरकार स्थापन करेल असा विश्वास काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी शुक्रवारी व्यक्त केला आहे. टिळक भवन येथे पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही महाराष्ट्रातील जनता काँग्रेस व महाविकास आघाडीच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहिली आहे. विधानसभेला जास्त मतदान झाल्याचा फायदाही आघाडीलाच होईल. मविआला स्पष्ट बहुमत मिळत असल्याचे दिसत आहे त्यामुळे त्रिशंकु विधानसभेचा प्रश्न उद्भवत नाही. निवडून आलेल्या आमदारांना काँग्रेस पक्षाने हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था केली आहे का, यावर चेन्नीथला म्हणाले की, काँग्रेसचे आमदार कठीण परिस्थितीतही पक्षासोबत राहिले आहेत त्यामुळे त्यांना हॉटेलमध्ये ठेवण्याची आवश्यकता वाटत नाही,

# राज्याच्या घोषित मतदानात एक टक्क्यांनी वाढ
## निवडणूक आयोगाकडून माहिती जाहीर

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. २२ नोव्हेंबर :

महाराष्ट्र २८८ विधानसभा मतदार संघातील निवडणूकीत निवडणूक आयोगाने बुधवारी रात्री उशिरा घोषित केलेल्या मतदानाच्या टप्प्यात आणखी एक टक्क्यांनी वाढ झाली आहे.

आयोगाचे नव्याने जाहीर केलेल्या आकडेवारीत राज्यात एकूण सरासरी ६६.०५ टक्के मतदान झाले आहे.२८८ मतदारसंघांत एकूण ६ कोटी ४० लाख ८८ हजार १९५ मतदारांनी आपला हक्क बजाविला असल्याचे नमूद केले आहे.

राज्यात बुधवारी झालेल्या एक मतदानामध्ये एकूण ३ कोटी ३४ लाख ३७ हजार ५७ पुरूष, ३ कोटी ६ लाख ४९ हजार ३१८ महिला तर १ हजार ८२० इतर मतदारांनी मतदान केले असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. मतदानाची अंतिम आकडेवारी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून प्रकाशित झाली आहे. यात प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांचा समावेश आहे. प्रत्यक्ष मतमोजणी करतांना टपाली मतदानाचा समावेश करण्यात येईल. त्याचप्रमाणे मतदान केंद्राध्यक्षाद्वारे भरण्यात आलेला १७ सी हा प्रत्यक्ष झालेल्या मतदानासंदर्भातील फॉर्म उमेदवारांच्या प्रतिनिधींनाही देण्यात आला असल्याचेही मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत स्पष्ट करण्यात येत आहे





| | PULSAR 125 कार्बन फायबर | | PULSAR 150 | | PULSAR N150 | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सिंगल सीट | स्प्लिट सीट | सिंगल डिस्क | ट्विन डिस्क | सिंगल डिस्क | ट्विन डिस्क |
| बचत | ₹3000/- | ₹4800/- | ₹3000/- | | | |
| बचतीनंतर/सूट दिल्यानंतर निव्वळ किंमत | ₹90 278/- | ₹92 282/- | ₹1 08 290/- | ₹1 15 374/- | ₹1 19 362/- | ₹1 22 862/- |

pulsar
DEFINITELY DARING

72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | अतिरिक्त ऑफर्स उपलब्ध Flipkart आणि amazon.in वर

*नियम आणि अटी लागू. *एक्स-शोरुम किंमत पल्सर 125 CF सिंगल सीट वेरिएंटसाठी. ऑफर फक्त निवडक वेरिएंट्सवर. ऑफर 31 डिसेंबर 2024 पर्यंत उपलब्ध. बजाज ऑटोने पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. साहसी दृश्य एक्सपर्ट्सने प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून वेगळ्या स्थानावर केली आहेत. ह्या दृश्यांचं अनुकरण करण्याचा प्रयत्न करू नका आणि नेहमी रहदारीचे व सुरक्षिततेचे नियम पाळा. एएमसी विशिष्ट मॉडेल्सवर आणि विशिष्ट राज्यात उपलब्ध आहे. अधिक माहिती बजाज डीलरकडे मिळवा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून दिली जाते आणि ती त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवरील ऑफर्स त्यांच्या नियम आणि अटींच्या अधीन आहेत.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd Aurangabad** • **Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 9168601253 • **Shendra ASHOK BAJAJ 8380025694**• **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • • **Beed** SWASTIK BAJAJ 9423473449, **Parli** SWASTIK BAJAJ 9579731991 • **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906 • **Latur** RAJYOG BAJAJ 8149565419 • **Udgir** RAJYOG BAJAJ 7620050200• **Nanded** UJWAL BAJAJ 7770018779 ,Gangotri Bajaj 9673004409 • **Hingoli SAI SHAM BAJAJ** 8766819162• **Parbhani** MUTHA BAJAJ 7447241490• **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ 8929643158 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 **Jamkhed** Navale Bajaj 9130609999 • **Osmanabad Raghuveer Bajaj** 9132113211. **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031. • **Authorised Service Centre: Paithan** 9850823363, **Bidkin** 9881341213, **Vaijapur** 9422854982, **Lasur 9527771795**, **Gangapur 9423940806**, **Shivoor** 9850709785, **Mahalgaon 9284755116**, **Soygaon** 8956111154, **Phulambri** 7588075675, **Karmad** 9881159432, , **Pishore** 9130646246 **Bhokardan** 9923485831, **Georai** 8698568509, **Majalgaon** 9422380842, **Kaij** 9423715751, **Ambajogai** 9607091874, **Patoda** 9423471895, **Ashti** 7840900444, **Ambad** 9834910719, **Rajur** 8275333360, ,**Walsawangi** 8275855491, **Partur** 9112649438 , **Ahmadpur** 262050, **Chakur** 9423520262, **Renapur** 9881951011, **Omerga** 7028590626, **Paranda** 9421212280, **Kallamb** 8329268718, **Kinwat** 9527257525, **Mukhed** 9579194868 , Umri 8149815921, Narsi 9860069635 **Bhokar** 9423139732, **Mahur** 96089073034 ,**Malegaon** 9403746580,**Vasmat** 9890173708, **Sengaon** 9762427999, **Jawala Bazar** 9890989138, **Pathri** 9860907003, **Palam** 9763385151, **Selu** 7499441540, **Gangakhed** 9421859114, **Ranisawargaon** 8668727630. **Khamgaon** 9921479013, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060 **Akole** 9881939099, **Alephata** 7507571715, **Ashwi** 8888201059, **Ghargaon** 9970302801,**Manchar** 9890014697, **Narayangaon** 9850112036, **Sakur** 9422146709, **Talegaon Dighe** 9970886986, **Nighoj** 9850224992, **Kotul** 9921583946, **Ottur** 8007000790, **Shevgaon** 9067893709, **Loni** 7709387085, **Ghodegaon** 7588030777, **Sonai** 7588603005, **Newasa** 9527554555, **Kukana** 7588079959, **Rahata** 9881239140.

## दर 10 पैकी एकाला आयुष्यात अपस्मार होण्याची जोखीम

छत्रपती संभाजीनगर – डॉ. श्रीकांत देशमुख , मेंदू विकारतज्ज्ञ सांगतात मज्जा संस्थेत बिघाड झाल्यास अपस्मार हा आजार होण्याची जोखीम वाढते. हा आजार संसर्ग जन्य नसला तरी कोणत्याही कारणाने तो वयाच्या कोणत्याही टप्प्यात गाठण्याची शक्यता असते. हा आजार कुठलाही भेदभाव करत नाही. लहान मुलांपासून ते प्रौढावर आणि स्त्री-पुरुष दोघांनाही याची तितकीच जोखीम असते. दर १० पैकी एकाला हा आजार आयुष्यात कधीतरी गाठू शकतो, अशी माहिती ज्येष्ठ मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. श्रीकांत देशमुख यांनी येथे दिली.अपस्मार अर्थात मिरगी या आजारावर जागृती करण्यासाठी आयोजित संवादात या मुद्याकडे लक्ष वेधत मेंदूविकारतज्ज्ञ डॉ. देशमुख म्हणाले, धर्म, मूळ, वंशाची पार्श्वभुमी आणि सामाजिक वर्ग या पैकी कोणालाही हा आजार अकाली गाठू शकतो, या आजारात वारंवार झटके अर्थात फेफरे येतात. अपस्मार हा संसर्गजन्यही नाही आणि मानसिकही नाही. तो नेमका कशामुळे होतो, याचे कारणही निश्चितपणे सांगता येत नाही. मात्र बहुतेक वेळा अपघात, डोक्याला गंभीर ईजा, मेंदूवर परिणाम घडविणारा संसर्ग होणे, अचानक झटका येणे अथवा मेंदूतील ट्युमर त्याला कारण ठरतो. यातून अल्झायमर अर्थात स्मृतीभ्रंष होण्याची जोखीमही वाढते. बहुतेक वेळा अपस्मारचा हा लहान मुलांवर अथवा ६५ वर्षा वयानंतर परीणाम होत असला तरी तो कोणत्याही वयात होऊ शकतो, असेही मेंदूविकारतज्ज्ञ डॉ. देशमुख यांनी सांगितले.

## वीवो ने लॉन्च केले वाई300, सुहाना खान बनली ब्रँड म्बेसेडर

पुणे : वीवो या नाविन्यपूर्ण जागतिक स्मार्टफोन ब्रँडने आज भारतात नवीन वीवो वाई ३०० लाँच करून आपल्या प्रीमियम वाई -सिरीज लाइनअपचा विस्तार केला आहे. नुकत्याच लाँच झालेल्या या स्मार्टफोनमध्ये स्टायलिश टायटॅनियम इन्स्पायर्ड डिझाइन आहे, ज्यामुळे तो वेगळा दिसतो. या उत्साहात आणखी भर घालत, वीवो ने वाई ३००५जी सह वाई -सिरीजचे स्मार्टफोन लॉन्च केले आहेत ज्यात सुहाना खान तिची ब्रँड म्बेसेडर आहे जी तिची तरुण ऊर्जा आणि ब्रँडमध्ये आकर्षण आणते. स्मार्टफोनला एआई ऑरा लाइट और २एक्स पोर्ट्रेट वैशिष्ट्यासह सक्षम सोनी आईएमएक्स ८८२ मुख्य कॅमेरा देण्यात आला आहे, ज्यामुळे वापरकर्त्यांना तीक्ष्ण, नैसर्गिक दिसणारी पोर्ट्रेट कॅप्चर करता येते. स्मार्टफोन सुधारित एआई कॅमेरा वैशिष्ट्यांसह येतो ज्यात एआई इरेज आणि एआई फोटो एन्हान्स समाविष्ट आहे जे प्रतिमांची स्पष्टता सुधारण्यात मदत करते. जलद चार्जिंगसाठी हे ८०थ फ्लॅशचार्जने सुसज्ज आहे.

## अभिनेता रविश देसाई 'कैसे मुझे तुम मिल गये'मध्ये

झी टीव्हीवरील 'कैसे मुझे तुम मिल गये' ह्या मालिकेने नेहमीच आपल्या रोचक, रोमांचक आणि नाट्यमय कथानकासह प्रेक्षकांना आपल्या खुर्च्यांना खिळवून ठेवले आहे. आणि तरीही हे कथानक एक रोचक वळण घेत असून ह्या मालिकेत रविश देसाई हा शुभ कदम ह्या व्यक्तिरेखेमधून दिसून येणार आहे. त्याचे अमृता (सृती झा) सोबत आधी लग्न ठरले होते. ८ वर्षांनंतर टेलिव्हिजनवर पुनरागमन करणारा रविश ह्या मालिकेत एका पारंपारिक महाराष्ट्रीय परिवारातील मेहनती आणि नम्र स्वभावाच्या उद्योजकाच्या रूपात दिसून येणार आहे. त्याची स्वतःची इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी असून त्याचे विचार मात्र जुने आहेत जिथे पुरूष निर्णय घेतात आणि स्त्रियांनी ते निर्णय मानायचे असतात.

## युनिक्लोचे सर्वात मोठे स्टोअर सुरू

मुंबई – जागतिक अपीरल रिटेलर युनिक्लोने आज आपले तिसरे आणि मुंबईतील सर्वात मोठे स्टोअर फिनिक्स पॅलाडिअम मॉलमध्ये सुरू केले. या नव्या स्टोअरच्या उद्घाटनासाठी प्रसिद्ध बॉलिवुड स्टार आणि भारतातील युनिक्लोच्या ब्रँड ॲम्बेसेडर करिना कपूर खान उपस्थित होत्या. उत्सुक ग्राहकांसमोर त्यांनी रिबिन कापून या स्टोअरचे उद्घाटन केले.मुंबईतील युनिक्लो फिनिक्स पॅलाडिअम हे स्टोअर दोन मजल्यांवर असल्याने दक्षिण मुंबईतील ग्राहकांना खरेदीचा अतुलनीय असा अनुभव इथे मिळू शकेल.

# मतमोजणीसाठी १ हजार २५९ कर्मचारी

### जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघात सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात होणार

अहिल्यानगर दि.२२–जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघात शनिवार २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता सुरूवात होणार असून मतमोजणीसाठी १ हजार २५९ अधिकारी–कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सकाळी टपाली मतदानाची मतमोजणी सुरू झाल्यानंतर अर्ध्या तासाने ईव्हीएम यंत्राची मतमोजणी सुरू होईल, अशी माहिती जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

मतमोजणीसाठी एकूण उपलब्ध १ हजार ३८५ मनुष्यबळापैकी १ हजार २५९ अधिकारी–कर्मचारी प्रत्यक्षात मतमोजणी कामासाठी नियुक्त असणार आहेत. या मनुष्यबळाची पहिली सरमिसळ १६ नोव्हेंबर, दुसरी २१ नोव्हेंबर रोजी झाली असून तिसरी सरमिसळ मतमोजणीच्या दिवशी पहाटे ५ वाजता करण्यात येईल.

अकोले विधानसभा मतदार संघासाठी मिटींग हॉल तहसील कार्यालय नवीन इमारत ता. अकोले, संगमनेर – सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात क्रीडा संकुल बॅडमिंटन हॉल, ता. संगमनेर, शिर्डी – प्रशासकीय इमारत, तळमजला, तहसील कार्यालय राहाता, कोपरगाव – सेवा निकेतन कॉन्व्हेंट स्कूल, तळमजला, ता. कोपरगाव, श्रीरामपूर – मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय, पहिला मजला, ता. श्रीरामपूर येथे मतमोजणी होईल.

नेवासा मतदारसंघासाठी न्यू गव्हर्नमेंट ग्रेन गोडाऊन, उत्तर बाजू खोली क्र.२ संथ मेरीस् स्कुल रोड, मुंकुदपुरा नेवासा फाटा, ता.नेवासा, शेवगाव – शासकीय इमारत तळमजला तहसील कार्यालय शेवगाव, राहुरी – लोकनेते रामदास पाटील धुमाळ न्यु आर्टस सायन्स ण्ड कॉमर्स कॉलेज राहुरी इनडोअर स्पोर्ट्स हॉल राहुरी, पारनेर – औद्यागिक प्रशिक्षण संस्था वर्कशॉप पारनेर, अहमदनगर शहर – महाराष्ट्र स्टेट वेअर हाऊस कॉर्पोरेशन गोडाऊन नं.६ एम.आय. डी. सी. नागापूर अहिल्यानगर, श्रीगोंदा – गव्हर्नमेंट ग्रेन गोडाऊन नं.३, पेडगाव रोड श्रीगोंदा आणि कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघासाठी बॅडमिंटन हॉल, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत येथे मतमोजणी होईल.

अकोले मतदारसंघातील ३०७ मतदान केंद्रांसाठी मतमोजणीच्या २२ फेऱ्या होतील. संगमनेर २८८ आणि २१ , शिर्डी २७१ आणि २०, कोपरगाव २७२ आणि २०, श्रीरामपूर ३११ आणि २३, नेवासा २७६ आणि २०, शेवगाव ३६८ आणि २७, राहुरी ३०८ आणि २२, पारनेर ३६६ आणि २७, अहमदनगर शहर २९७ आणि २२, श्रीगोंदा ३४५ आणि २५, तर कर्जत जामखेड मतदारसंघातील ३५६ मतदान केंद्रांसाठी मतमोजणीच्या २६ फेऱ्या होतील. प्रत्येक मतदारसंघात ईव्हीएम मतमोजणीसाठी १४ टेबल लावण्यात येणार असून प्रत्येक टेबलसाठी त्यासाठी प्रत्येकी १ पर्यवेक्षक, सहाय्यक आणि सूक्ष्म निरीक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.

टपाली मतदानासाठी अकोले मतदारसंघात ७ टेबल, संगमनेर आणि कर्जत जामखेड ९, शिर्डी आणि कोपरगाव ४, नेवासा आणि अहमदनगर शहर ६, श्रीरामपूर ५, शेवगाव १०, पारनेर १२, श्रीगोंदा मतदारसंघात ११ टेबलवर मतमोजणी होईल. प्रत्येक टेबलवर १ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, १ पर्यवेक्षक, २ सहाय्यक आणि १ सूक्ष्म निरीक्षक असतील.

ईटीपीबीएस स्कॅनिंगसाठी अकोले, शिर्डी, कोपरगाव आणि श्रीरामपूर मतदारसंघात २ टेबल, संगमनेर, पारनेर अणि श्रीगोंदा मतदारसंघात प्रत्येकी ५, नेवासा, अहमदनगर शहर आणि कर्जत जामखेड मतदरसंघात प्रत्येकी ३, शेवगाव ४ आणि राहुरी मतदारसंघात ६ टेबलवर व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक टेबलवर १ पर्यवेक्षक आणि १ सहाय्यकांची नियुक्ती करण्यात येईल.

## योगेश त्रिपाठी सांगत आहेत चाहतावर्गाबाबत!

योगेश त्रिपाठी यांनी एण्ड टीव्हीवरील घरेलू कॉमेडी 'हप्पू की उलटन पलटन'मधील दरोगा हप्पू सिंगच्या भूमिकेत प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. सिग्नेचर ढेरपोट्या, ट्विस्टेड मिशनी आणि प्रख्यात संवाद 'अरे दादा' यासह योगेश यांनी हप्पू सिंगला चाहत्यांमध्ये लोकप्रिय बनवले आहे. हा काल्पनिक पोलिस अधिकारी साधारण आहे, तसेच तो गुन्हेगारांना पकडण्याचे काम टाळण्यामध्ये कुशल आहे आणि कायद्याचे पालन करण्यापेक्षा त्याची नऊ मुले व कुटुंबाचे पालन करण्याकडे अधिक वेळ व्यतित करतो.

## अभिनेता कृष्ण भारद्वाजने केले टक्कल

एखादी महान व्यक्तिरेखा पडद्यावर जिवंत करणे ही काही सोपी गोष्ट नाही. ते करण्यासाठी पॅशन, निष्ठा आणि कधी कधी धाडसी बलिदान करावे लागते. अभिनेता कृष्ण भारद्वाज तेनाली रामा ही महान व्यक्तिरेखा साकारत आहे, त्यासाठी त्याने पुन्हा एकदा आपल्या निष्ठेचा प्रत्यय दिला आहे आणि व्यक्तिरेखा अस्सल दिसण्यासाठी आपल्या केसांचे पूर्ण टक्कल केले आहे.ही मालिका पुनरागमन करत आहे आणि प्रेक्षक तेनाली रामाचे चातुर्य, त्याची सुजाणता आणि मोहकता पुन्हा अनुभवण्यास उत्सुक आहेत.

## बानीने घटस्फोटाचे कागद रजतला दिले

सोनी सबवरील 'बादल पे पांव है' मालिकेत बानी या एका महत्त्वाकांक्षी तरुणीची गोष्ट सांगितली आहे. आर्थिक अडचणींवर मात करून आपल्या कुटुंबाचे जीवनमान उन्नत करण्यासाठी झटणारी ही मुलगी आहे. अलीकडच्या भागांमध्ये बानीचे कुटुंब म्हणजे खन्ना परिवार लावण्या (भाविका चौधरी)च्या घरी राहायला गेला आहे, जिकडे बानीचा नवरा रजत (आकाश आहुजा) आधीपासूनच राहात आहे. बानीचा परिवार लावण्याच्या खर्चिक जीवनशैलीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करत आहे, तेव्हा बानी घरी केलेले देशी जेवण त्यांच्यासाठी घेऊन येते.

---

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२४/२०२५ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : २२-११-२०२४

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **आरतीदेवी अजयसिंह हजारी अतुल अजयसिंह हजारी** यांनी मोहल्ला **वार्ड क्र. १५** सोयगांव स.नं. ----- मधील घर क्रमांक **---** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : गणेश नगर** पश्चिम : **सरकारी रस्ता**
**दक्षिण : संजय दलपत मंडवे** **उत्तर : दिलीप राजमल बिर्ला**
आकार : पूर्व पश्चिम **४० x २० = ८०० चौ.फुट** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

---

### जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-६९२ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १५/१०/२०२४**

अर्जदार : शेख सफीया इम्रान उर्फ शेख सफीया शफीक रा. नागापूर ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय नागापूर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतःच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक ३०-०४-२००२ रोजी नागापूर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक ३०-०४-२००२ रोजी नागापूर ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक ३०-०४-२००२ रोजी नागापूर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १०/१२/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ३०-०४-२००२ रोजी नागापूर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक १५/१०/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

### जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-६९३**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**दिनांक १५/१०/२०२४**

अर्जदार : शेख हफीज शेख महंमद रा. नागापूर ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय नागापूर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतःच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक ०१-०६-१९७३ रोजी नागापूर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक ०१-०६-१९७३ रोजी नागापूर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज

अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक ०१-०६-१९७३ रोजी नागापूर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १०/१२/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०१-०६-१९७३ रोजी नागापूर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक १५/१०/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

### जाहीर प्रगटन

माझे पक्षकार नामे त्रिंबक केशव वेताळ, रा. देवपुडी, ता. कन्नड जि. औरंगाबाद. यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकाराचे आजोबा सखाराम आनंदा वेताळ यांचा मौजे देवपुडी शिवारातील गट नं. २२ क्षेत्र ०८ हे. ३६ आर (२० एकर २६ गुंठे) क्षेत्रावर १९५० पुर्वीपासून संरक्षित कुळ म्हणून ताबा होता व त्यांच्या मृत्यूनंतर माझे पक्षकाराचे वडील केशव सखाराम वेताळ व त्याचे काका म्हसू सखाराम वेताळ यांच्या नावाने संरक्षित कुळ म्हणून फेर नं. ११५ आधारे ताबा होता व आहे. जे अनुक्रमे दि. ०२/०९/१९९८ व दि. २८/१२/२००३ रोजी मरण पावले आहे व आता सदरील गट नं. २२ वर माझे पक्षकार व त्यांचे काका यांचे वारस हे वारसा हक्काने संरक्षित कुळ म्हणून ताबेदार आहे. संरक्षित कुळ संबंधी महसूल दप्तरी फेर नं. ११५ मंजुर झालेला आहे. गट नं. २२ माझे पक्षकाराचे पुर्वजांचे नाव संरक्षित कुळ म्हणून इतर हक्कातून गैरकायेदशीरपणे कमी झालेले आहे. परंतु वहितीच्या रकान्यात माझे पक्षकाराचे नाव वारस हक्काने आहे व माझे पक्षकार एकत्रीतपणे गट नं. २२ वे पुर्ण क्षेत्राची वहिती करुन पिके घेत आहे व त्यावर त्यांचा ताबा आहे. गैरअर्जदार बद्रीनाथ अप्पा लहानू अप्पा झारेकर, सुभाष अप्पा लहानू अप्पा झारेकर, कैलास अप्पा लहानू अप्पा झारेकर व इतर वारस हे माझे पक्षकाराच्या वहिती व उपभोगास अडथळा आणित असल्यामुळे माझे पक्षकाराने त्यांच्या विरुद्ध दिवाणी न्यायालय कन्नड येथे दिवाणी मुकदमा नं. २६४/२०१६ मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केला असून जो की, दिवाणी न्यायालयात न्याय प्रविष्ठ आहेत. तेव्हा सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, कोणीही वर नमूद मिळकतीचे व्यवहार उपरोक्त बद्रीनाथ अप्पा लहानू अप्पा झारेकर, सुभाष अप्पा लहानू अप्पा झारेकर, कैलास अप्पा लहानू अप्पा झारेकर व इतर वारस यांच्याशी करु नये जर व्यवहार केल्यास माझे पक्षकार त्यांचे विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करतील व होणाऱ्या परिणामास ते स्वतः जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी, करिता हे जाहिर प्रगटन देत आहे. दिनांक :- २२/११/२०२४.

मार्फत — जाहीर प्रगटन देणार
ॲड. एम.एच. सय्यद — त्रिंबक केशव वेताळ
कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद,
मो.नं. ९९६०७७२३४३

---

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. एस. वाय. वाकचौरे, ३ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्र. ५२७/२०२४
प्रकरणात पुढील तारीख १३/०१/२०२५

अर्जदार : १) इंदूबाई भ्र. शेषराव रहाटवाड वय ५९ वर्षे, धंदा घरकाम रा. मु. तुर्काबाद खराडी, ता. गंगापूर जि. औरंगाबाद मो. नं. ८८३०१९७२३२ २) आशाबाई भ्र. ज्ञानेश्वर सामसे वय ३८ वर्षे, धंदा घरकाम रा. मु. तुर्काबाद खराडी, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) फकिरचंद पिता शेषराव रहाटवाड वय ३३ वर्षे, धंदा मजूरी रा. घर नं. ४०१, तुर्काबाद खराडी, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) राधाबाई भ्र. विष्णू खंडागळे वय ३१ वर्षे, धंदा घरकाम रा. रांजणगांव खुरी, जि. औरंगाबाद ५) पुजा भ्र. तुकाराम पंडीत वय २५ वर्षे, धंदा घरकाम रा. रांजणगांव, रांजणगांव देवी, जि. अहमदनगर

// विरूध्द //

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ हे वरील नमूद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ ही अर्जदार क्रं. २ ते ५ यांची आई आहे. अर्जदार क्रं. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ बहिण आहे. अर्जदार क्रं. १ हिचे पती व अर्जदार क्रं. २ ते ५ यांचे वडील नामे शेषराव गोपीनाथ रहाटवाड हे दिनांक ०४/०९/२०२४ रोजी मौजे तुर्काबाद खराडी, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ची सासू व अर्जदार क्रं. २ ते ५ यांची आजी नामे यशोदाबाई गोपीनाथ रहाटवाड हे दिनांक ०४/१२/२००६ रोजी मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ चे सासरे व अर्जदार २ ते ५ यांचे आजोबा नामे गोपीनाथ रहाटवाड हे सुध्दा बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले असून मयत शेषराव गोपीनाथ रहाटवाड यांना अर्जदार क्रं. ही पत्नी व अर्जदार क्र. २, ४ व ५ ह्या मुली असून अर्जदार क्रं. ३ हा मुलगा या नात्याने कायदेशीर वारसदार असून मयतास अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत शेषराव गोपीनाथ रहाटवाड यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिद झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन,

आज दिनांक २२/११/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले,

आदेशावरून
लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

---

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १५२/२०२४

अर्जदार : १. सुशिलाबाई तुळशीराम बोडखे, वय ४८ वर्ष, धंदा घरकाम, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २. रामेश्वर तुळशीराम बोडखे, वय ३५ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध
निल

प्रकरण: वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन एस. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत तुळशीराम दौलत बोडखे यांचा दि. १२.०८.२०२४ रोजी मौजे आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ व २ हे एकमेव वारस आहे असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ व २ हे मयत तुळशीराम दौलत बोडखे यांचे वारस असुन त्यांना मयत तुळशीराम दौलत बोडखे यांच वारस प्रमाणपत्र हे शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि.२२/१/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. २६/११/२०२४
आदेशावरुन
क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)

---

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. एस. एस. अग्रवाल, दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. ५२८/२०२४
प्रकरणात पुढील तारीख ०३/०१/२०२५

अर्जदार :१) बिस्मिल्ला पिता भिकन शहा वय ५६ वर्षे, धंदा मजूरी रा. सावंगी, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) रजियाबी भ्र. राजू शाहा वय रा. मु. सावंगी, पो. लासूर स्टेशन, ४७ वर्षे, धंदा घरकाम ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) जुलेखाबी भ्र. अहमद शहा वय रा. मुस्लीम मोहल्ला, खंडाळा, ता. ७४ वर्षे, धंदा घरकाम वैजापूर जि. औरंगाबाद ४) भिकन शहा सुलेमान शहा वय ८२ वर्षे, धंदा मजूरी रा. शहा नगर, सावंगी, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार निरंक

प्रकरण : भारतीय वारस कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारस प्रमाणपत्र लिगल सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबाबत अर्ज.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत भारतीय वारस कायदा १९२५ चे कलम ३७२ अन्वये वारस प्रमाणपत्र / लिगल सक्सेशन सर्टिफिकेट मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ४ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपीचे राहणार असून अर्जदार क्रं. १ ते ३ यांची आई व अर्जदार क्रं. ४ यांची पत्नी नामे राबिदाबी भ्र. भिकन शहा हे दिनांक २५/०८/२०२४ रोजी वृध्दपकळाने राहत्या घरी मौजे सावंगी, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे. मयतास अर्जदार क्रं. १ हा मुलगा असून अर्जदार क्रं, २ व ३ ह्या विवाहीत मुली व अर्जदार क्रं. ४ हे पती आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे सख्खे भाऊ विवाहीत बहिणी असून अर्जदार क्रं. ४ हे त्यांचे वडील आहे. मयत राबिदाबी भ्र. भिकन शहा व अर्जदार क्रं. ४ यांचे नावे सेंट्रल बैंक ऑफ इंडिया शाखा लासूर स्टेशन येथील खाते क्र. ३३००६९०१५० (जॉइंट खाते) सामाईक एकत्रीत खाते असून सदरील खात्यात रक्कम रूपये २,९८,३४६.७१/- (अक्षरी दोन लाख अनुयात्रव हजार तीनशे शेहचाळीस रूपये एकाहत्तर पैसे) असून सदरील रक्कम अर्जदार क्रं. ४ यांच्या नावे व्याजासह मिळण्याकरीता वारस प्रमाणपत्र / लिगल सक्सेशन प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र लिगल सक्सेशन सर्टिफिकेट देण्यात येईल. करीता

जाहीर प्रगटन. आज दिनांक २२/११/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

---

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. पी.बी. पाटील, सह दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. ५२९/२०२४
प्रकरणात पुढील तारीख ०४/०१/२०२५

अर्जदार : १) महेसन पिता खालेद चाऊस वय ३३ वर्षे, धंदा मजूरी रा. आंबेडकर पार्क जवळ, अरब गल्ली, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद मो. नं. ९८६०७५३५७२ २) फिरदोस भ्र. सलमान बाकोदा वय ३१ वर्षे, धंदा घरकाम रा. समतानगर, रेहाना कॉलनी, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) इरफान पिता खालेद चाऊस वय २८ वर्षे, धंदा मजूरी रा. अरब गल्ली, एक खाना मस्जिद जवळ, गंगापूर ता. गंगापूर

// विरूध्द //

गैरअर्जदार – निरंक

प्रकरण – बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. अफताब एस. शेख रा. गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / बोरस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ३ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ व ३ हे आपसात सख्खे भाऊ असून अर्जदार के २ ही त्यांची विवाहीत बहिण आहे.अर्जदार क्रं. १ ते ३ यांचे वडील नामे खालेद अब्दुल्ला चाऊस हे दिनांक ११/०६/२०२४ रोजी मौजे गंगापूर, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ते ३ यांची आई नामे शहेनाज खालेद चाऊस ही दिनांक २८/१०/२०२३ रोजी मौजे गंगापूर, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. त्यामुळे मयत खालेद अब्दुल्ला चाऊस व मयत शहेनाज खालेद चाऊस यांना अर्जदार क्रं. १ व ३ हे मुले व अर्जदार क्रं. २ ही मुलगी या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्रं. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत खालेद अब्दुल्ला चाऊस व मयत शहेनाज खालेद चाऊस यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन, आज दिनांक २२/११/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

---

### जाहीर प्रगटन

**मा. ३ रे दिवाणी न्यायाधीश (श्री. एस. वाय. वाकचौरे), (क. स्तर) गंगापूर यांचे न्यायालयात**

सिव्हील एम.ए. क्र. ३६६/२०२४

अर्जदार – १) मंदाबाई भ्र. भागीनाथ शेजूळ, वय- ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. वैरागड, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद. २) गणेश पिता भागीनाथ शेजूळ, वय ३२ वर्षे, धंदा मजुरी/शेती, रा. वरील प्रमाणे. ३) राणी भ्र. राहुल हरिशचंद्रे, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, रा. आनंतपूर, लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद. ४) अर्चना भ्र. मन्सुब ठोंबरे, वय २७ वर्षे, धंदा घरकाम, रा. भायगाव, पो. बिलोनी, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक.

विषय :- हेअरशिप सर्टिफिकेट/वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

असे की, ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी ॲड. योगेश जी. चव्हाण, रा. औरंगाबाद यांचे मार्फत लिगल हेअरशिप सर्टिफिकेट (वारसा हक्क प्रमाणपत्र) मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ हिचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे भागीनाथ मंजिनाथ शेजूळ, यांचे दि.११/०६/२०२३ रोजी राहत्या घरी निधन झाले आहे. मयत नामे भागीनाथ मंजिनाथ शेजूळ, यांना अर्जदार क्र. १ ही पत्नी असून अर्जदार क्र.२ हा मुलगा आहे, तसेच अर्जदार क्र. ३ व ४ ह्या विवाहीत मुली आहेत, अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत नामे भागीनाथ मंजिनाथ शेजूळ, यांचे कायदेशीर वारसदार आहेत, अर्जदार क्र.१ ते ४ यांचे शिवाय मयत नामे भागीनाथ मंजिनाथ शेजूळ, यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

असे की, मयत नामे भागीनाथ मंजिनाथ शेजूळ, यांचे अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारस असल्याबाबत अर्जदार क्र. १ ते ४ यांना शासकीय/निमशासकीय कामासाठी हेअरशिप सर्टिफिकेटची/वारसा हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून अर्जदार क्र. १ ते ४ यांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल करण्यास कारण घडले आहेत.

त्याअर्थी सदरहू जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदार वारस असल्याचे घोषीत होवून अर्जदार यांच्या नावे हेअरशिप सर्टिफिकेट / वारसा हक्क प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत मा. न्यायालयात लेखी स्वरुपात आपला उजर/आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणाचाही काही उजर/आक्षेप न आल्यास अर्जदार हे वारस असल्याचे घोषीत होवून अर्जदार यांच्या नावे हेअरशिप सर्टिफिकेट / वारसा हक्क प्रमाणपत्र देण्यात येईल व मुतीनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करीता दि२.२/११/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

आदेशावरून
क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

---

### जाहीर प्रगटन

**मा. व्ही. एन. काटकर साहेब दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.क्रि. अर्ज.क्रं. ३५०/२०२४.
पुढील तारीख २३/१२/२०२४.

अर्जदार : १. नवाब इमाम खान, वय ६२ वर्षे, धंदा शेती, रा. कुंजखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ह मुशम्स नगर अन्सारी किराणा जवळ शानुरवाडी क्रांती चोक औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद. २. फरजानाबी अहेमद अली खा, वय ६२ वर्षे, धंदा घरकाम, रा. हबीब कलोनी भोकरदन ता. भोकरदन जि. जालना. ३. शमाबी मस्तान खा पठाण, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. कुंजखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुदध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे

बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. शेख कामरान रफिक यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ हे मयताच्या मुलगा असून अर्जदार क्र. २ व ३ ह्या मयताच्या विवाहित मुली आहेत. अर्जदार क्रं. १ ते ३ हे आपसात सख्खे भाऊ बहिण आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत पठाण इमाम खान मकबूल खान व कुलसमबी इमाम खा पठाण यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ यांचे वडील नामे मयत पठाण इमाम खान मकबूल खान हे दि.०५/०१/२००५ रोजी कमलनयन बजाज रोग्णालय औरंगाबाद येथे आजारीप्नामुळे मरण पावले आहे तसेच अर्जदार क्रं. १ ते ३ यांची आई नामे मयत कुलसमबी इमाम खा पठाण हि दि.०२/०१/२०१७ रोजी मौजे कुंजखेडा ता. कन्नड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावली आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ यांना मयत पठाण इमाम खान मकबूल खान व कुलसमबी इमाम खा पठाण यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे व त्यांचे मयत आई व वडील नामे मयत पठाण इमाम खान मकबूल खान व कुलसमबी इमाम खा पठाण हे मौजे कुंजखेडा ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी होते तसेच ते कुंजखेडा ता. कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ३ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि. १८/१०/२०२४ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. दिनांक २२/११/२०२४.

आदेशावरून
कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड.

# सत्ता स्थापनेसाठीच्या गणितासाठी जुळवाजुळव सुरू

## महायुती, मविआची छोटे पक्ष, अपक्ष उमेदवारांशी संपर्क

तभा वृत्तसेवा/जमीर काझी

मुंबई,दि.२२ नोव्हेंबर : संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत जनतेने कोणाला कौल दिला आहे, याचे उत्तर आता अवघ्या काही तासानंतर स्पष्ट होणार आहे. मात्र स्पष्ट बहुमत न मिळाल्यास सत्ता स्थापनेची संधी आपल्या हातातून निघून जाऊ नये, यासाठी सत्ताधारी महायुती व विरोधी महाविकास आघाडीने खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी निवडून येण्याची शक्यता असलेल्या छोटे पक्ष, अपक्ष व नाराज बंडखोर उमेदवारांची संपर्क साधण्यात येत आहे.

महायुतीतील प्रमुख पक्ष भाजपाचे राज्यातील प्रमुख नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर आज दिवसभर त्या अनुषंगाने बैठका व चर्चा भेटीगाठी झाल्या. तर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी हॉटेल ग्रँड हयात येथे बैठक घेऊन निकालानंतर परिस्थिती हाताळण्याबाबतचे नियोजन केले. शनिवारी दुपारी बारा वाजेपर्यंत निवडणुकीचा कौल स्पष्ट झालेला असणार आहे .

राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघासाठी बुधवारी सरासरी ६६ टक्के मतदान झाले आहे. त्याची मतमोजणी उद्या सकाळी आठ वाजता सुरू होणार आहे. सत्ताधारी महायुती की विरोधी महाविकास आघाडीचे सरकार येणार? याबाबत राजकीय नेत्यांकडून वेगवेगळे दावे करण्यात येत आहेत. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार महायुतीला जास्त जागा तर महाविकास आघाडीला कमी जागा मिळण्याचा अंदाज आहे. मात्र, निकाल समोर आल्यानंतरच कोणाला किती जागा मिळतात? हे स्पष्ट होईल. मात्र मावळत्या विधानसभेचा कालावधी २६ नोव्हेंबर पर्यंतच असल्याने सत्ता स्थापन करण्यासाठी केवळ दोन दिवसाचा अवधी हाती असणार आहे त्यामुळे बहुमता स्पष्ट बहुमत न मिळाल्यास सर्वाधिक संख्याबळ असणारे आघाडी सत्तेत सत्ता स्थापन करण्यासाठीच दावा राज्यपालाकडे करतील मात्र बहुमत गाठण्यासाठी १४५ आमदारांची साथ असणे आवश्यक असल्याने हे संख्या पूर्ण करण्यासाठी छोटे पक्षी व अपक्ष म्हणून निवडून आलेल्या उमेदवारांची गरज लागू शकते त्यामुळे सत्ताधारी महायुती व विरोधी महाविकास आघाडी कडून आत्तापासूनच संभाव्य विजेते अपक्ष बंडखोर उमेदवार व छोट्या पक्षाचे उमेदवारांची संपर्क साधला जात आहे त्या अनुषंगाने आज मुंबईत दिवसभर राजकारणाचे बैठकीचा सिलसिला चालू होता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निवासस्थान असलेल्या सागर बंगल्यावर आज मनसेचे नेते व शिवडी विधानसभा मतदारसंघातील उमेदवार बाळा नांदगावकर यांनी भेट घेतली.

# ‘त्या’ १२ स्तंभामुळे रामजन्मभूमीचा दावा प्रबळ

## पुरातत्वविद के. के. मोहम्मद यांचे प्रतिपादन

छत्रपती संभागीनगर/प्रतिनिधी

पुरातत्व विभागाने बाबरी मशीद परिसरात सर्वप्रथम केलेल्या उत्खननात १२ स्तंभ सापडले. या स्तंभांवरील देवीदेवतांच्या मूर्ती, शिलालेखांतूनच या जागेवर पुरातन मंदिर होते, हे स्पष्ट झाले होते. कालांतराने न्यायालयाच्या आदेशानंतर पुन्हा एकदा त्याच भागात उत्खनन झाले. त्यातही ९० स्तंभांसह असंख्य अवशेष सापडले अन् या ठिकाणी राममंदिर होते, यावर शिक्कामोर्तब झाले, असे प्रतिपादन पुरातत्वविद के. के. मोहम्मद यांनी केले. तिसऱ्या पद्म फेस्टिव्हलमध्ये ते बोलत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सभागृहात गुरुवार, २१ नोव्हेंबरपासून तिसऱ्या पद्म फेस्टिव्हलला सुरुवात झाली. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक, उद्योजक मिलिंद केळकर, डॉ. उन्मेष टाकळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी १०.३० वाजता या सोहळ्याचे उद्घाटन झाले. यानंतर ज्येष्ठ भाजप नेते राम नाईक यांच्यापासून संवाद सत्रांना सुरुवात झाली. उद्योजक राम भोगले व पद्मश्री केंडे यांनी नाईक यांच्यासोबत संवाद साधला. नाईक यांनी जडणघडण ते राजकारणातील वाटचाल यावर प्रकाश टाकला. शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी अनेक प्रश्नांना सविस्तर उत्तरंही दिली.

दुसऱ्या सत्रात मोहम्मद यांनी उपस्थितांशी संवाद साधला. ४० वर्षांपेक्षा जास्त काळ देशभरातील विविध राज्यांमध्ये काम करताना आलेले अनुभव या वेळी त्यांनी शब्दबद्ध केले. पुरातत्व विभागात कार्यरत असताना दहा राज्यांमध्ये काम केले. देशात सर्वाधिक मध्यप्रदेश या राज्यामध्ये असंख्य पुरातन वास्तू असून, त्यापैकी अनेकांची नासधूस झाली आहे. त्यामुळे या राज्यात उत्खननासाठी प्रचंड वाव आहे. मात्र आक्रमक मते, दुराग्रह यांच्यापेक्षा समकालीन दस्तऐवज अन् पुरावे जास्त महत्वाचे ठरतात. त्यामुळे हिंदू असोत वा मुस्लिम; परस्परांच्या आस्थांबाबत सौदार्ह्याची भावना असणे जास्त योग्य ठरते, असे मत त्यांनी मांडले.

पुढे ते म्हणाले, देशातील पुरातन वास्तूंमध्ये असंख्य कहाण्या दडलेल्या आहेत. या वास्तूंची रचना, मांडणी, उभारणीची पद्धती अशा अनेक बाबी जिज्ञासूंसमोर यायला हव्यात. आपल्याकडे असंख्य वारसास्थळे आहेत. त्यांना ताकदीने जगापुढे मांडणे आवश्यक आहे. पद्मश्री केंडे व सोमनाथ वाघमारे यांनी संवाद साधला. उद्घाटनसत्राचे सूत्रसंचालन ड. अर्चना गोंधळेकर यांनी केले.

ज्ञानयज्ञ फाऊंडेशनतर्फे गुरूवारी तिसऱ्या पद्म फेस्टिव्हलचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यगृहात आयोजन केले होते. याप्रसंगी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, उद्योजक मिलिंद केळकर, फेस्टिव्हलच्या संचालिका वत्सला देशपांडे आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना बागडे म्हणाले की, भारत स्वातंर्त्य झाल्यानंतर काही वर्षांनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न मिळाला. आज बौध्दिक क्षमता वाढवण्यासाठी नवीन पिढीने अभ्यासाच्या पलिकडे वाचले पाहिजे. आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजेत असे सांगितले.

यानंतर माजी केंद्रीय मंत्री नाईक यांनी मी कसा घडलो यावर बोलताना म्हणाले की, १९५० साली कॉमर्सचे दोन ते तीन कॉलेज होते आज शैक्षणिक प्रसार वाढला आहे. माझ्या आयुष्यात दामोदर सावरकर, श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या भाषणांचा प्रभाव असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, पदविभूषण मिळाले ते सामाजिक कार्यामुळे. आज समाजकारण व राजकारण वेगळे नाही लोकशाही टिकली पाहिजेत असे त्यांनी सांगितले.

### झोकून देण्याची तयारी हवी

इतिहास आणि पुरातत्वशास्त्र हे शांतपणे समजावून घेण्याचे विषय आहेत. विशेषत: आर्किऑलॉजीच्या क्षेत्रात अनेक संधी आहेत. संयम, शोधकवृत्ती अन् झोकून देऊन काम करण्याची तयारी असेल तर विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात आवर्जून यावे, असा सल्ला के.के. मोहम्मद यांनी दिला.

### धर्म कधी आड आला नाही

प्रामाणिकपणे जबाबदारी पार पाडण्याच्या वृत्तीमुळे माझा धर्म, माझे 'मोहम्मद' हे नाव कधी अडचणीचे ठरले नाही. छत्तीसगडमधील नक्षलग्रस्त भागांत काम करतानाही डाकूंचे भय होते. परंतु, झोकून देऊन काम करण्याची हे भय कमी करणारी ठरली. पुढे तर त्यांच्याच सहयोगाने मंदिरांच्या संवर्धनाचे काम सुकर झाले, अशी आठवणही त्यांनी सांगितली.

# तीन उस्तादांच वंदन हो मनाला तृप्त करणारं गाणं प्रेक्षकांच्या भेटीला

संगीत नाटके हा मराठी रंगभूमीचा सुवर्णकाळ मानला जातो आणि हीच परंपरा जपत, संगीत मानापमान या अजरामर नाटकावरून प्रेरीत लवकरच प्रदर्शित होणाऱ्या संगीत मानापमान या सिनेमाच्या माध्यमातून मराठी प्रेक्षकांना एक वेगळाच अनुभव पडद्यावर पहायला मिळणार आहे. नुकताच या सिनेमाचा एक अप्रतिम टिझर रोहित शेट्टीच्या सिंघम अगेन या सिनेमासोबत रिलीज झाला होता ज्याला प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिलं. 'संगीत मानापमान' ह्या चित्रपटावरूनच यात संगीताची मजेशीर मेजवानी असल्याचं लक्षात येत. आणि याचीच सुरवात आज चित्रपटाच्या पहिल्या वंदन हो गाण्याने झाली.

कट्यार काळजात घुसली नंतर पुन्हा एकदा प्रेक्षकांना संगीत विश्वातील दिग्गज संगीतकार शंकर महादेवन, गायक महेश काळे आणि राहुल देशपांडे यांचा आवाजातील तिहेरी संगम अनुभवायला मिळणार आहे. या आधीही ही सुप्रसिद्ध तिकडी एकत्र येऊन गायली होती परंतु चित्रपटातील गाण्यासाठी एकत्र येण्याची ही पहिलीच वेळ आहे. हल्लीच चित्रपटातील पहिल्या गाण्यासाठी शंकर महादेवन, महेश काळे आणि राहुल देशपांडे यांनी मुंबईतील एका स्टुडिओत वंदन हो हे गाणं शूट केलंय. उत्तम संगीत आणि गीतकार हयामुळे सेट वर किती प्रसन्न वातावरण होतं हे नुकताच सेट वरून वायरल झालेल्या व्हिडिओ मध्ये तूम्ही पहिलंच असेल.

# ग्राहक संरक्षण समिती जिलाध्यक्षपदी सुरेखा भंसाली यांची नियुक्ती



छत्रपती संभाजीनगर : भारत सरकार द्वारा नोदनी कृत जिला अध्यक्ष सुरेखा भंसाली यांची छत्रपति संभाजीनगर औरंगाबाद येथिल ग्राहक संरक्षण प्रतिष्ठान संचालित ग्राहक संरक्षण समिति का पदवार नियुक्ति करण्यात आली.

संरक्षण समिति चे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष दादा केदार नाशिक, डॉ गंगाराम उबाले, विदर्भ प्रदेश संपर्क प्रमुख विदर्भ विभाग कार्य अध्यक्ष ग्राहक संरक्षण समिति डॉक्टर शालिग्राम चौहान यानी पत्रा द्वारा की नियुक्ति केली , ज्यानी सुरेखा भंसाली से सिफारिश केली होती , छत्रपति संभाजी नगर औरंगाबाद जिला ग्राहक संरक्षण समितिवर सुरेखा भंसाली यांनी त्यांच्या सामाजिक, राजकीय कार्यशी दखल घेऊन समितिला त्यांचा निश्चित फायदा होणार व ग्राहक संरक्षण समितीसाठी ते सदैव कठिबद्ध राहतील असे सुरेखा भंसाली यांनी सांगितले. सुरेखा भंसाली ची नियुक्ति झाल्या बदल महावीर भंसाली, संजयजी संचेती,बालु सेठ सुराणा, पारस बागरेचा, संदीपजी बांठिया, सीमा सुराणा, नीता गादिया, विद्या खिवसरा,राखी बोरा,शिला पारेख,आरती गुगळे, योगीता चोरड़िया,सीमा मरलेचा एवं जैन समाजा नी शुभेच्छा दिली

# माहितीच्या दृष्टीने समृद्ध अशा वृत्तपत्राला वाचकांची पसंती

## माध्यमतज्ज्ञ डॉ. धारूरकर यांचे मत

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : अलीकडे माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वेब वृत्तपत्रांना महत्व येत आहे. जे वृत्तपत्र माहितीच्या दृष्टीने संपन्न व समृद्ध असते, तेच वृत्तपत्र वाचकांच्या पसंतीला उतरते. बातम्यांपेक्षाही दुर्मिळ अशी वैशिष्ट्यपूर्ण माहिती ज्या वृत्तपत्रांत अधिक प्रसिद्ध होते, त्याकडे वाचक अधिक प्रमाणात आकर्षित होत आहेत. माहितीची संपन्नता हा नव्या परिपूर्ण वृत्तपत्राचा अलंकार होय, असे मत वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. वि. ल. धारूरकर यांनी व्यक्त केले.

बनारस विद्यापीठात वृत्तपत्र व संज्ञानपनशास्त्र विभागात '२१ व्या शतकातील पत्रकारिता' या विषयावर धारूरकर बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. बाला लखेंद्र होते.

प्रारंभी विभाग प्रमुख प्रा. डॉ. शोभना नेरळीकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आपल्या भाषणात डॉ. धारूरकर यांनी परिपूर्ण वृत्तपत्राची संकल्पना मांडली. २१ व्या शतकात डीजिटल युगातील पत्रकारिता ऑनलाइन माध्यमातून नवे रूप धारण करीत आहे. तरुण वाचकवर्ग अशा वृत्तपत्रांकडे वळत आहे. भविष्यात लेखणीविना आणि कागदाविना वृत्तपत्रे लोकप्रिय होतील, असे सांगून डॉ. धारूरकर म्हणाले, कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्राचाही वृत्तपत्र व्यवसायावर दूरगामी परिणाम होत आहेत. आपले वृत्तपत्र ज्ञान-विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या आधारे जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करण्यासाठी परिपूर्ण कसे होईल, यावर भर देण्याची गरज आहे. त्यांनी आपल्या भाषणात समाज सुधारणेचे युग, स्वातंत्र्य चळवळीचे युग आणि पुनर्रचनेचे युग ह्या तीन कालखंडावर विशेष प्रकाश टाकला.

एम. ए. संवादशास्त्र तसेच एम. ए. कॉर्पोरेट कम्युनिकेशन आणि संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या आधारे विविध विषयांवर चर्चा घडवून आणली. प्रा. डॉ. लता पांडे यांनी सूत्रसंचालन करून आभारप्रदर्शन केले.

# संपूर्ण समर्पणाची तयारी ठेवूनच क्रीडाक्षेत्रात या

## क्रिकेट समालोचक सुशील दोशी यांचा सल्ला

छत्रपती संभागीनगर/प्रतिनिधी

प्रचंड ऐश्वर्य, प्रसिद्धी मिळवून देणाऱ्या क्रिकेट या क्रीडा प्रकाराकडे अवघ्या जगाचे लक्ष आहे खरं पण, पदोपदी परीक्षा पाहणारे हे क्षेत्र आहे. क्षणोक्षणी तुमचे कसब लागणार आहे. त्यामुळे केवळ लालसेमुळे नव्हे, तर संपूर्ण समर्पणाची तयारी असेल तरच क्रीडाक्षेत्रात येण्याचा सल्ला प्रसिद्ध समालोचक सुशील दोशी यांनी दिला. गुरुवार, २१ पासून सुरू झालेल्या पद्म फेस्टिव्हलच्या तिसऱ्या सत्रात ते बोलत होते. क्रिकेट सामन्यांचे समालोचन करताना 'आंखो देखा हाल' सांगण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या दोशी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत उत्स्फूर्तपणे सत्राला सुरुवात केली.



क्रिकेट खेळण्याच्या ओढीतून समालोचक बनलेले सुशील दोशी क्रिकेटच्या ५० वर्षांच्या इतिहासाचे साक्षीदार आहेत. हिंदी समालोचन लोकप्रिय करण्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान असून, मध्य प्रदेश शासनाने जीवनगौरव पुरस्कारानेही त्यांचा गौरव केला आहे. प्रमोद सरकटे आणि संजय कुलकर्णी यांनी दोशी सरांशी संवाद साधला. खास मुलाखतीसाठी नांदेड येथून आलेले संजय कुलकर्णी यांनी भारतीय क्रिकेटच्या इतिहासाचा धावता आढावा घेतला.

दोशी म्हणाले, मध्यमवर्गीय कुटुंबात मी वाढलो. आम्ही चौघे भाऊ. इंजिनिअरिंगची अजिबात आवड नव्हती. पण, मोठ्या भावाचे अनुकरण करत मीही याच क्षेत्रात शिक्षण घेतले. शालेय जीवनात मी खूपच साधारण विद्यार्थी होतो. आज तुम्ही सगळेजण जी मौज अनुभवत आहात, ती आम्ही सर्वांनीही अनुभवली आहे. आम्हीही पाढे पाठ केले, पाठ होत नसतील तर शिक्षेलाही सामोरे गेलो आहोत. घराजवळ समवयस्क मुलांसोबत लुटूपुटूचा खेळ खेळण्यात आम्हीही रमलो आहोत. छोटासा होतो तेव्हा वडिलांसोबत पहिल्यांदा स्टेडिअममध्ये क्रिकेट मॅच पहायला गेलो अन् माझ्या जीवनाला कलाटणी मिळाली. पुढे समालोचन सुरू केले, तेव्हा पहिला अडसर होता तो भाषेचा. क्रिकेट कॉमेंट्री आणि इंग्रजी भाषा हे सूत्र रूढ झालेले होते. हिंदीतून कॉमेंट्री कशी करता येईल, असा प्रश्न उपस्थित करत हिंदी भाषिकांनीच विरोध सुरू केला. पण, जसा कोणत्याही नव्या प्रयोगाला सुरुवातीस विरोध होतो अन् नंतर नवकल्पनांचा स्वीकार होतो तद्वतच हिंदी समालोचनाबाबतही घडले.

### स्वत:ची शैली निर्माण करा

समालोचन करताना प्रेक्षकांच्या हृदयाला हात घालायचा असेल तर मनापासून बोलणं आवश्यक आहे. क्लिष्टता टाळून प्रेक्षकांना रुचतील, आपलेसे वाटतील, असे शब्द निवडण्यामुळे माझी शैली वाखाणली गेली. तुम्हीही स्वत:ची खास शैली तयार करू शकता, असा सल्ला दोशी यांनी दिला.

# श्यामराव बोधनकर स्मृती पुरस्कार डॉ. रवींद्र कोल्हे, डॉ. स्मिता कोल्हे यांना प्रदान

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : स्वातंत्र्य सैनिक श्यामराव बोधनकर स्मृती पुरस्कार आणि समाजसेवी कै. इंद्रायणी मधुकर बोधनकर स्मृती पुरस्कार २०२४ डॉ. रवींद्र कोल्हे आणि डॉ. स्मिता कोल्हे यांना गुरुवारी, २१ रोजी प्रदान करण्यात आला. गोविंद भाई श्रॉफ ललित कला अकादमी सभागृहात कार्यक्रम पार पडला.

डॉ. रवींद्र कोल्हे व डॉ. स्मिता कोल्हे या दोघांनाही भारत शासनातर्फे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. अतिशय कमी अशा जोडप्यांमधील एक असलेल्या या दाम्पत्याला इतरही अनेक सन्मान प्राप्त झालेले आहेत.



वैरागड या मेळघाटातील अतिशय दुर्गम भागात गेल्या चौतीस वर्षांपासून ते वैद्यकीय सेवा करीत आहेत. केवळ दोन रुपये फीस आकारणारे डॉक्टर म्हणून ते प्रसिद्ध आहेत. त्यांच्या सातत्यपूर्ण खडतर आणि अथक प्रवासात त्यांनी आदिवासींच्या उत्थापनासाठी असंख्य उपक्रम राबवले आहेत, यात शेतीतील प्रयोग, पशुपालन, शासकीय स्वस्त धान्य योजना इत्यादींचा समावेश आहे. या दाम्पत्याने आपल्या ३८ वर्षांच्या वैरागड या गावातल्या अनुभवांचे कथन केले. मानवी आयुष्य फार थोडे आहे, ते सार्थकी लावण्यासाठी आपण सर्वांनी विचारपूर्वक जगले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. ग्रामीण भारतातील आणि आदिवासी भागातील लोकांचे आयुष्य अतिशय वेगळे आहे, हे लोक निखळपणे आणि निर्मळपणे निसर्गाच्या सानिध्यात जगतात. त्यांच्या अपेक्षाही फार थोड्या असतात, त्यामुळे ते खूप समाधानी असतात असे डॉ स्मिता कोल्हे म्हणाल्या.

प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समाजवादी नेते अंकुश भालेकर होते, तर ज्ञानप्रकाश मोदाणी ज्येष्ठ गांधीवादी व पर्यावरणवादी विचारवंत हे अध्यक्ष होते. त्यांनी शामराव बोधनकरांच्या अतुलनीय योगदानाबद्दल माहिती दिली व गोविंदभाई श्रॉफ यांना आदरांजली वाहिली. याप्रसंगी 'अग्निशिखा कावेरी' या हैदराबाद मुक्ती संग्रामावर आधारित बालनाट्याचे उर्दू भाषांतर आणि 'हैदराबाद मुक्ती संग्रामातील झुंजार महिला' या डॉ. ऊर्मिला चाकूरकर यांच्या पुस्तकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते झाले. डॉ प्र. दि. जोशी पाटोदेकर, राघवेंद्र चाकूरकर, डॉ. ऊर्मिला चाकूरकर, अभय बोधनकर, महेंद्र बोधनकर, जयदेव डोळे, डॉ. भवान महाजन, डॉ. छाया महाजन, डॉ. शिरीष खेडगीकर, अलका वालचळे, भारती पैठणे, उज्वला निकाळजे, प्रतिभा शर्मा, समाधान दहिवाल, कैलास पैठणे, योगेश राऊत, हर्षपाल खाडे, संजय जामकर व प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपस्थित होते

# प्रचंड उत्कंठेनंतर आज ठरणार पैठणचा आमदार; १४ टेबलावर होणार २६ फेऱ्या

तभा वृत्तसेवा

पैठण दि २३ :- शिवसेना विरुद्ध उ.बा.ठा शिवसेना अशी अटीतटीच्या झालेल्या पैठण ११० विधानसभा निवडणुकीचा निकाल आज घोषित होणार असून महायुतीचे उमेदवार विलास बाप्पू भुमरे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार दत्ता गोर्डे यांनी आपापल्या विजया दावा केला आहे.ऐन निवडणुकीच्या धामधुमीत जोरदार प्रचार करणारे महायुतीचे उमेदवार विलास बाप्पू भुमरे हे गॅलरीतून पडून गंभीर जखमी झाल्याने छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपान भुमरे यांच्यासह महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रचाराची धुरा खांद्यावर घेऊन तसेच महाविकास आघाडीचे उमेदवार दत्ता गोर्डे यांनी ही यशस्वी प्रचाराची धुरा सांभाळली. दोघा उमेदवारांनी मोठ्या मतदानाचा कौल घेतला. यावरून ही निवडणूक अटीतटीची झाली ज्याचा फैसला आज होणार आहे. रासपचे उमेदवार प्रकाश दिलवाले किती मतदान घेतात यावर ही राजकारण्यांचे लक्ष लागले आहे.

विधानसभेच्या मतदान पार पडल्यानंतर मतमोजणीसाठी निवडणूक विभाग सज्ज झाले नाथसागर धरणाच्या पायथ्याशी असलेल्या संत पिठाच्या प्रशासकीय इमारतीत कडेकोड बंदोबस्तात मतमोजणीस सुरुवात होणार आहे मतदानानंतर ईव्हीएम मशीन स्टाँग मध्ये ठेवण्यात आले आहे स्ट्राँग रूम परिसरात केंद्रीय राखीव दलाच्या जवानाचा खडा पहारा आहे दरम्यान आज २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नीलम बाफना यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निवडणूक अधिकारी सारंग चव्हाण सहाय्यक निवडणूक अधिकारी रतनसिंग साळोक,नोडल अधिकारी संतोष आगळे मतमोजणीला सुरुवात होणार आहे. यासाठी एकूण १४ टेबलावर २६ फेऱ्या होतील यापैकी २६ वी फेरी फक्त टेबल क्र १ वर होईल तसेच पोस्टल मतपत्रिका मोजण्यासाठी ८ टेबल असणार आहेत, प्रत्येक टेबलवर साधरणपणे ५०० मतपत्रिकांची मतमोजणी करण्यात येणार आहे.

# 'आर्यन्स नवदुर्गा सन्मान पुरस्कार' आणि 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक २०२४' नामांकन सोहळा

छत्रपती संभाजीनगर - राज्य सरकारनंतर रोख पुरस्कार देणारा दुसरा पुरस्कार सोहळा असा मनोरंजन विश्वात नावलौकीक मिळवलेल्या 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक २०२४' पुरस्कार सोहळ्याची नामांकने लवकरच घोषित होणार आहेत. याच सोहळ्यात 'आर्यन्स नवदुर्गा सन्मान पुरस्कार' वितरीत करण्यात येणार आहेत. 'मराठी कलांचा, गुणांचा प्रतिभा प्रशंसा सोहळा...' अशी बिरुदावली मिरवणारा 'आर्यन्स सन्मान' पुरस्कार सोहळा घोषणेपासूनच मनोरंजन विश्वात चर्चेचा विषय ठरला होता. बुधवार २७ नोव्हेंबर रोजी या पुरस्कार सोहळ्याची नामांकने घोषित केली जाणार आहेत. दुसऱ्या वर्षात पदार्पण केलेला 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक २०२४' नामांकन सोहळा यंदा बुधवार २७ नोव्हेंबर रोजी केशव बाग, डी. पी. रोड, कर्वे नगर, पुणे येथे सायंकाळी ६.३० वाजता भव्य-दिव्य स्वरूपात पार पडणार आहे. 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक २०२४' पुरस्कार सोहळ्यामध्ये एकूण २३ विभागांमध्ये मराठी चित्रपटांना पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे. नाट्य विभागात १६ पुरस्कार दिले जाणार आहेत. पुरस्कारांची एकूण रक्कम १३ लाख रुपये असून ही रक्कम ओमा फाऊंडेशन कडून वितरित करण्यात येणार आहे. दिनांक १ जून २०२३ ते दिनांक ३१ मे २०२४ या कालावधीत प्रदर्शित किंवा सेन्सॉर झालेल्या मराठी व्यावसायिक आणि प्रायोगिक नाटकांना तसेच चित्रपटांना पुरस्कार सोहळ्यात प्रवेश देण्यात आला आहे. या पुरस्कार सोहळ्याची नामांकने उत्सुकता वाढवणारी ठरणार आहेत. याच सोहळ्यात आपल्या असामान्य अशा कर्तृत्वाच्या बळावर समाजाला नवी दिशा देण्याचे काम करणाऱ्या नवदुर्गांचा 'आर्यन्स नवदुर्गा सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.

# फुफ्फुसाच्या आरोग्याला प्राधान्य देण्याचे आणि या मूक परंतु दुर्बल रोगाचा सामना करण्यासाठी वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन : डॉ आशिष गाडे

छत्रपती संभाजीनगर - डॉ आशिष गाडे, सल्लागार पल्मोनोलॉजिस्ट, मेडिकोव्हर हॉस्पिटल्स सांगतात, छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णाला जिने चढणे यासारख्या साध्या क्रियाकलापांमध्ये सतत खोकला आणि श्वास लागणे लक्षात येईपर्यंत सक्रिय जीवन जगले. ही वयाशी संबंधित समस्या किंवा हंगामी ऍलर्जी आहे असे गृहीत धरून, त्याने वैद्यकीय मदत घेण्यास उशीर केला. कालांतराने, त्याची प्रकृती खराब होत गेली, वारंवार घरघर येणे आणि तीव्र थकवा जाणवू लागला. मेडिकोव्हर हॉस्पिटल्सला भेट देईपर्यंत, त्याच्या फुफ्फुसाच्या कार्यामध्ये लक्षणीय तडजोड झाली होती आणि त्याला क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) असल्याचे निदान झाले.



रुग्णाची कथा सीओपीडी निदानाचा वाढता कल दर्शवते. भारतात, सीओपीडीचे निदान होत नाही, बहुतेकदा तो धूम्रपान करणाऱ्यांचा रोग किंवा दमा म्हणून नाकारला जातो. तथापि, बायोमास इंधनासह स्वयंपाक केल्यामुळे घरातील वायू प्रदूषणास सामोरे जाणाऱ्या महिलांसह धूम्रपान न करणाऱ्यांनाही धोका असतो. अलीकडील डेटावरून असे दिसून आले आहे की सीओपीडी महिलांपेक्षा अधिक पुरुषांना प्रभावित करते, शहरी भागात पुरुष-महिला प्रमाण अंदाजे २:१ आहे. तथापि, ग्रामीण सेटिंग्जमध्ये, खराब हवेशीर घरांमध्ये घन इंधनाच्या व्यापक वापरामुळे हे अंतर कमी होते.

बहुसंख्य सीओपीडी प्रकरणे ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींमध्ये नोंदवली जातात, परंतु सुरुवातीची लक्षणे खूप लवकर सुरू होऊ शकतात, विशेषत: उच्च-जोखीम असलेल्या गटांमध्ये जसे धूम्रपान करणारे किंवा प्रदूषणाच्या दीर्घकाळ संपर्कात असलेल्यांमध्ये. सीओपीडी साठी सुवर्ण मानक निदान चाचणी, स्पायरोमेट्रीमध्ये जागरूकता आणि प्रवेशाचा अभाव ही एक महत्त्वाची चिंता आहे.

मेडिकोव्हर हॉस्पिटल्समध्ये, आम्ही लवकर हस्तक्षेपाच्या महत्त्वावर जोर देतो. पल्मोनरी रिहॅबिलिटेशन, इनहेलर थेरपी आणि रूग्ण शिक्षण यांसारख्या प्रगतीमुळे, सीओपीडी असलेल्या व्यक्ती त्यांच्या जीवनावर नियंत्रण मिळवू शकतात. मुख्य म्हणजे तीव्र खोकला, घरघर आणि श्वास लागणे यासारखी लक्षणे लवकर ओळखणे.

रुग्ण सर्वसमावेशक उपचार सुरू केल्यानंतर, आता चांगले-गुणवत्तेचे जीवन जगतो. या सीओपीडी जागरुकता दिनानिमित्त, आम्ही प्रत्येकाला फुफ्फुसाच्या आरोग्याला प्राधान्य देण्याचे आणि या मूक परंतु दुर्बल रोगाचा सामना करण्यासाठी वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन करतो. लवकर निदान खरोखरच जीवन वाचवणारे असू शकते.

# संपादकीय

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# 'एक है तो सेफ है'

जेमतेम पाच वर्षांच्या काळात तब्बल अडीच सत्ताबदल अनुभवलेल्या महाराष्ट्रातील २८८ मतदारसंघांत २० नोव्हेंबरला विधानसभेसाठी एकाच वेळी झालेल्या निवडणुकांतर आता देशाचे लक्ष महाराष्ट्राकडे केंद्रित झाले आहे. २०१९ ते २०२४ या पाच वर्षांत महाराष्ट्राने सत्तेच्या राजकारणाचे अनेक कंगोरे अनुभवले. याच काळात मतदारांनी दिलेला कौल नाकारून महाविकास आघाडीने सत्तेवर कब्जा मिळविला आणि त्या सत्तेच्या अडीच वर्षांतील संकटकाळात महाराष्ट्राच्या प्रगतीची चाके उलटी फिरल्याचा अनुभव महाराष्ट्राने घेतला. अशा अनिश्चित आणि निष्क्रिय सत्ताकाळात राजकीय नाराजीनाट्ये उफाळून येणे साहजिकच होते. त्यामुळे सव्वादोन वर्षांपूर्वी महायुतीचे सरकार सत्तेवर आले आणि अस्थिर झालेला कारभार पूर्वपदावर येऊन स्थिरावल्याचेही महाराष्ट्राने अनुभवले. या पृष्ठभूमीवर विधानसभेची ही निवडणूक औत्सुक्यपूर्ण ठरणार होतीच. उद्या, २३ नोव्हेंबरला मतमोजणी झाल्यानंतर निकाल जाहीर होणार आहेत. निर्णयासाठी आता जेमतेम काही तासांचा अवधी शिल्लक असताना, सत्ता कोणाची येणार, यावर केवळ अंदाज वर्तविण्यात हशील नाही. बुधवारी मतदानाची वेळ संपल्यानंतर विविध माध्यमांनी घेतलेल्या मतदानोत्तर चाचण्यांतूनही फारसे काही ठोस अंदाज वर्तविले गेलेले नाहीत. असे अंदाज वर्तविणे ही माध्यमविश्वातील केवळ प्रथा मानून तसे करण्याची आता गरज राहिलेली नाही. दुसरे म्हणजे, मतदाराच्या मनाचा थांग घेण्यासाठी त्याच्या मनाच्या तळाशी डोकावण्याचे तंत्र अजूनही कोणास साधलेले नाही. त्यामुळे मतमोजणीनंतरचे प्रत्यक्ष निकाल हेच यावेळी महाराष्ट्राच्या सत्ताधीशांची निवड स्पष्ट करणारे एकमेव सूत्र आहे. म्हणून त्याची अनावश्यक मीमांसा न करता, या निवडणुकीच्या नव्या वेगळेपणाची चर्चा करणे उचित ठरेल. तब्बल तीन दशकानंतर महाराष्ट्राच्या मतदारांमधील मरगळ झटकली जात असल्याचे संकेत या निवडणुकीतील मतदानाने दिले, हे या निवडणुकीचे वेगळेपण ठरले आहे. महाराष्ट्राच्या मतदारांमध्ये ही जागरूकता कशामुळे आली, त्याचा शोध घेणे ही या निवडणुकीच्या निकालानंतरची नेमकी मीमांसा ठरेल आणि भरघोस मतदानातील मोठा वाटा मतदारांच्या कोणत्या वर्गाने उचलला, याचा नेमका आढावा घेणे हे या निमित्ताने शोधणे उचित ठरेल. मतदानाची वेळ संपल्यानंतर राज्यात जाहीर झालेल्या मतदानाच्या टक्केवारीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत, हे स्पष्ट दिसते आहे. या मतदानाच्या वाढलेल्या टक्केवारीचे मूळ कशात आहे, हे शोधणे आवश्यक ठरते. बुधवारी रात्री उशिरा मतदानाची सारी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर स्पष्ट झालेल्या आकडेवारीनुसार, राज्यातील सुमारे ९ कोटी ७० लाख २५ हजार १३४ मतदारांपैकी ६५ टक्क्यांहून अधिक, म्हणजे जवळपास ६ कोटी ३१ लाख मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. गेल्या सुमारे ३० वर्षांतील हा मतदानाच्या टक्केवारीचा उच्चांक मानला जातो. १९९५ मधील विधानसभा निवडणुकीत ७१.७० टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. तेव्हा राज्यातील मतदारांची एकूण संख्या पाहता, आजच्या निवडणुकीत झालेल्या मतदानाच्या टक्केवारीतील भरघोस प्रतिसादाची कल्पना करणे शक्य आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीदरम्यान राज्यातील मतदानाची टक्केवारी ६१.३९ टक्के एवढी होती आणि पाच वर्षांपूर्वी, २०१९ मधील विधानसभा निवडणुकीत ६१.४० टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारण आणि सत्ताकारणावरून मतदारांनी बरेच काही धडे घेतले असावेत, असा अंदाज या वाढलेल्या टक्केवारीवरून वर्तविता येऊ शकतो. पण हेदेखील तेवढेच एकमेव कारण नाही. निवडणुका जाहीर झाल्यापासून गेल्या जवळपास महिनाभरात राज्याच्या कानाकोपऱ्यात सत्तास्पर्धेतील दोन प्रमुख आघाड्यांनी केलेल्या आक्रमक प्रचाराचा हा परिणाम असू शकतो का, याचे उत्तरही उद्याच मिळणार आहे. तरीही या प्रचारातील काही मुद्यांचा प्रभाव अधोरेखित करावा लागेल. गेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपप्रणीत महायुतीला मोठा फटका बसला असला, तरी त्या विजयाचा डांगोरा पिटणाऱ्या महाविकास आघाडीच्या मतांची टक्केवारी महायुतीहून केवळ सुमारे सव्वा टक्क्यांनी अधिक होती आणि विधानसभा निवडणुकीच्या प्रचारातून हा फरक भरून काढण्याकरिता आखणी करण्याचे आव्हान महायुतीसमोर होते. भारतीय जनता पार्टीने महायुती करून या निवडणुकीत काँग्रेसप्रणीत महाविकास आघाडीस शह देण्याकरिता हीच नीती वापरून मतदारांच्या मानसिकतेवर मोठा प्रभाव टाकला, हा मतदानाच्या वाढीव टक्केवारीचा प्राथमिक परिणाम मानता येईल. 'एक है तो सेफ है' ही महाराष्ट्राच्या राजकारणासाठी केवळ निवडणूक प्रचाराची घोषणा नव्हती, तर समाजात भय फैलावणाऱ्या प्रवृत्तींच्या विरोधात दिली गेलेली ती सावधगिरीची हाक होती असे मानले, तर मतदानाच्या वाढीव टक्केवारीमागील कारणे स्पष्ट होऊ शकतात. महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत विविध समाजघटकांमध्ये वेगवेगळ्या कारणांमुळे अस्पष्ट, अंधुक अशा मानसिक दुफळीच्या रेषा उमटल्या आहेत. त्यामुळे निर्माण झालेल्या सामाजिक अशांततेमुळे काही अनामिक भयाचे सावटही समाजव्यवस्थेवर दाटून राहिले आहे. या पृष्ठभूमीवर ऐक्याची हाक देऊन निवडणुकीच्या निमित्ताने समाजात पुन्हा एकदा ऐक्याच्या भावनेचे महत्त्व रुजविण्याचा प्रयत्न यशस्वी झाल्याचे चित्र पाहता, याचे विश्लेषण केल्यास, मतदानाच्या वाढीव टक्केवारीमागे हेदेखील कारण असू शकते. 'एक है तो सेफ है' या आवाहनामुळे राज्यातील समाज राजकीयदृष्ट्या एकवटला आणि मोठ्या संख्येने मतदान करून सुरक्षिततेचा आश्वस्त करण्याची समाजाची सामूहिक मानसिकता असावी, असाही या वाढीव मतदानाचा निष्कर्ष असू शकतो. म्हणूनच निकालानंतर सत्तेच्या राजकारणाचे भवितव्य स्पष्ट होणार असले, तरी तब्बल तीन दशकानंतर पुन्हा एकदा मतदारांच्या सामूहिक मानसिकतेमधील जागरूकता हे या निवडणुकीचे वेगळेपण नजरेआड करता येणार नाही.

मतदारांच्या या राजकीय उत्स्फूर्ततेचे प्रतिबिंब निकालात कसे उमटेल आणि कोणत्या पक्षास सत्तेच्या राजकारणात त्याचा लाभ होईल याविषयी राजकीय पक्षांचे दावे-प्रतिदावे आता सुरू झाले आहेत. मतदारांचा हा भरघोस कौल आपल्याच पारड्यात पडणार, असा दावा महाविकास आघाडी आणि महायुती या उभय प्रतिस्पर्ध्यांकडून केला जात आहे. मात्र, मतदानोत्तर चाचण्यांमधून निघालेले सावध निष्कर्ष या दाव्यांना ठाम विश्वासाचे पाठबळ देत नाही. म्हणूनच जेव्हा मतदानाची टक्केवारी वाढते तेव्हा नेमके काय घडते हे तपासणे योग्य ठरते. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत राज्यात सर्वाधिक म्हणजे ७१.६९ टक्के एवढे मतदान झाले होते. त्याआधीच्या युतीच्या झंझावाती प्रचारात काँग्रेसच्या कारभाराची लक्तरे भाजपाने अक्षरशः वेशीवर टांगली होती. राजकारणाचे गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार, लाचखोरी हेच प्रमुख मुद्दे घेऊन भाजपाने राज्याचा कानाकोपरा पिंजून काढला आणि १९९५ पूर्वीच्या तीन-चार वर्षांत राज्याने भोगलेल्या भयग्रस्ततेची परतफेड करून मतदारांनी भाजपा-शिवसेना युतीच्या हाती सत्तेची सूत्रे सोपविली होती. त्याआधी १९६२ पासून १९९५ पर्यंतच्या सात विधानसभा निवडणुकांत मतदानाच्या सरासरीने ६० टक्क्यांची सीमा पार केली नव्हती. पुढे २०१४ मध्ये मतदानाची टक्केवारी ६३.३८ पर्यंत पोहोचली आणि भाजपाचा सत्तेचा मार्ग मतदारांनी प्रशस्त केला. २०१९ मध्येही ६१.४४ टक्के मतदान झाले आणि वाढीव मतदानाचा फायदा पुन्हा युतीलाच झाला होती. उद्धव ठाकरे यांनी सत्तेसाठी जुळविलेल्या नव्या गणितांमुळे मतदारांचा हा कौल खुंटीवर टांगला गेला असला, तरी मतदारांची मानसिकता मात्र स्पष्ट होती. त्यामुळे जेव्हा मतदार मोठ्या संख्येने बाहेर पडतो, तेव्हा त्याचा कौल भाजपाला असतो, असा प्राथमिक निष्कर्ष यंदाच्या मतदानासही पोषक ठरू शकतो. 'एक है तो सेफ है' असा संदेश देणाऱ्या पक्षावर सामाजिक सुरक्षिततेची जबाबदारी असते. हा संदेश भाजपाने दिलेला असल्याने, ती जबाबदारी भाजपावर पडते, म्हणून मतदारांचा कौल भाजपाच्याच बाजूने पडतो का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. त्यासाठी आणखी केवळ काही तासांचीच प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## दृष्टिक्षेप

# तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कारागृह सुरक्षा अन् सुधारणा

**प्रवीण दीक्षित**

महाराष्ट्रात ६० कारागृहे आहेत. त्यातील मुंबई, ठाणे, तळोजा, येरवडा-पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती ही मध्यवर्ती कारागृहे आहेत. सध्या कारागृहात जवळ जवळ ४१ हजार कैदी आहेत. मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांची संख्या तेथील मान्यताप्राप्त क्षमतेहून कित्येक पटींनी अधिक आहे. यातील न्यायालयाने शिक्षा सुनावलेले ७७०० कैदी आहेत; ज्यात ७०७० पुरुष व २४५ महिला आहेत. शिवाय ३३,३०० वर कच्चे कैदी आहेत. त्यात ३१,७०० पुरुष तर १३४२ महिला आहेत. या कैद्यांसोबतच १५ तृतीयपंथीसुद्धा कच्चे कैदी म्हणून बंदिस्त आहेत. सर्वाधिक कैदी असलेल्या कारागृहांचा तपशील- येरवडा ५५१०, ठाणे ३९९९, मुंबई ३४४१, तळोजा २५०२, कल्याण २०५० व नागपूर १८९२. जवळपास ७९ टक्के कैदी हे कच्चे कैदी आहेत. त्यांना कोणतेही शारीरिक काम देता येत नाही. त्यांना शिक्षण, शिक्षेत सवलत अशा सुविधा मिळत नाहीत. कच्च्या कैद्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यांच्यावर शासनाचा खूप खर्च होतो. त्यांना न्यायालयात वेळेवर उपस्थित करणे, त्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचा फौजफाटा तैनात करणे आणि पोलिस वाहनांची व्यवस्था करणे या कामांचा भारही शासनाला सहन करावा लागतो. याशिवाय कच्च्या कैद्यांना न्यायालयात नेताना तसेच न्यायालयातही त्यांच्यावर त्यांचे विरोधक जीवघेणा हल्ला करून त्यांना ठार मारण्याचा वेळोवेळी प्रयत्न करतात. कच्च्या कैद्यांना वारंवार रुग्णालयात तपासासाठी न्यावे लागते. अनेक वेळा कारागृहात राहण्यातून सुटका सुटका मिळविण्यासाठी व रुग्णालयात स्वतःला ठेवून घेण्यासाठी हे कच्चे कैदी डॉक्टरांवर दबाव टाकतात.

वरील समस्यांवर उपाय म्हणून भारत सरकारने १ जुलै २०२४ पासून लागू केलेल्या भारतीय नागरिक सुरक्षा संहितामधील कलम ५३० चा उल्लेख करणे आवश्यक आहे. या कलमाप्रमाणे न्यायालयात तक्रारदाराची तपासणी, साक्षीदारांचे जबाब इत्यादी सर्व खटल्यांचे कामकाज दृक्‌श्राव्य पद्धतीने करण्यास नुसती मान्यता नव्हे, तर प्रोत्साहन देण्यात आले आहे. त्याच बरोबर सर्व शासकीय रुग्णालयात आज टेली-मेडिसीन व्यवस्था उपलब्ध आहे; त्याद्वारे कैद्यास कारागृहातच तिथे नेमलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मदतीने जवळच्या शासकीय रुग्णालयातील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्याकडून उपचार मिळण्याची सोय उपलब्ध आहे. दृक्‌श्राव्य माध्यमातून कच्चा कैदी त्याच्या विधि सल्लागाराशी तसेच नातेवाईकांशी संभाषण करू शकतो. त्यामुळे ठरावीक काही मध्यवर्ती कारागृहात गर्दीने व गैरसोयीने राहण्यापेक्षा राज्यातील ज्या कारागृहात कच्चे कैदी कमी आहेत, अशा ठिकाणी न्यायालयाचा आदेश मिळवून राहणे सहज शक्य आहे. तसेच कच्चा कैदी स्वतःच्या सुरक्षेसाठी सुनावणी दृक्‌श्राव्य पद्धतीने व्हावी म्हणून मागणी करू शकतो. जसे श्रद्धा वालकर खटल्यातील आरोपीने सांगितले की, त्याला लॉरेन्सकडून धमकी आहे? त्याची सुनावणी दृक्‌श्राव्य माध्यमाने घेण्यात यावी.

शिवाय कारागृहातून सुरक्षा भेदून ठिकठिकाणी दहशतवादी आणि कुख्यात गुन्हेगार पळून जाण्यात अनेक वेळा यशस्वी होताना दिसतात. आज जवळ जवळ सर्व महत्त्वाच्या कारागृहात पाकिस्तानी दहशतवादी, पाकिस्तानच्या मदतीने दहशतवाद माजवणारे काश्मीर येथील दहशतवादी, खलिस्तानवादी, सिमीसारख्या मूलतत्त्ववादी संघटनांचे कार्यकर्ते, आयसिसमध्ये भाग घेऊ इच्छिणारे, माओवादी आणि मोक्का कायद्याप्रमाणे कारागृहात ठेवलेले अनेक कुख्यात गुन्हेगार हे मुंबई, ठाणे, तळोजा, नाशिक, येरवडा-पुणे, नागपूर किंवा अन्य मध्यवर्ती कारागृहात आहेत. कित्येक खटल्याची वाट पाहात आहेत. त्यामुळे या कारागृहांवर दहशतवादी हल्ला होण्याची नेहमीच भीती असते. या प्रकारच्या कैद्यांना सुरक्षित अन्य कारागृहात ठेवून दृक्‌श्राव्य पद्धतीचा वापर करण्याने ही भीती कमी होऊ शकते. कारागृहातील व्यक्तींना आज त्यांच्या बरॅकमध्येच पंखा, ट्यूब, टीव्ही अशाप्रकारे विजेच्या जिवंत जोडण्या सहज उपलब्ध आहेत. त्याचा गैरफायदा घेऊन यातील अनेक व्यक्ती मोबाईल फोन सहज मिळवून ते चार्ज करतात व त्याच्या माध्यमातून कारागृहाच्या बाहेरील व्यक्तींच्या बरोबर संपर्कात आहेत? अनेक व्यक्तींच्या खुनाचे कारस्थान करतात आणि पळून जाण्याचे प्रयत्न करतात. कारागृहाच्या बहुतेक सर्व इमारती या शंभर वर्षांहून अधिक जुन्या असल्याने त्यात अनेक ठिकाणी मोबाईल सुरक्षितपणे लपवून ठेवणे आज या व्यक्तींना सहज शक्य होत आहे. बहुतेक ठिकाणी कारागृहाचा आजुबाजूचा परिसर हा पूर्णपणे निर्मनुष्य असतो. अशा ठिकाणी पोलिस क्वचितच फिरकतात. कारागृहातील सुरक्षा कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य फारसे चांगले नाही, संख्या अपुरी आहे, त्यांना प्रशिक्षण पुरेसे नाही. त्यांच्याकडे आधुनिक पद्धतीची उपकरणेही नाहीत. याशिवाय कारागृहातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हेगार दडपण आणून किंवा भ्रष्टाचाराने अनेक सवलती मिळविण्यात यशस्वी होतात. कारागृहाची सुरक्षा कशी वाढवावी यासंबंधी कुख्यात गुन्हेगार पळून गेल्यानंतर नेमलेल्या चौकशी समितींनी वेळोवेळी अहवाल दिलेले आहेत. परंतु त्यात केलेल्या सूचनांची अंमलबजावणी होत आहे, असे दिसत नाही. प्रामुख्याने कारागृहातून रुग्णालयात किंवा न्यायालयात जाण्यासाठी बाहेर जाणे यावर कडक निर्बंध लावून दृक्‌श्राव्य पद्धतीचा वापर करून रुग्णालय, न्यायालये किंवा विधि सल्लागार यांना व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमाने जोडणे आज तांत्रिकदृष्ट्या सहज शक्य आहे व आवश्यकही आहे. कारागृहात मोबाईल फोन्स कोणत्याही प्रकारे चार्ज करता येणार नाही यासाठी बरॅकमध्ये विजेची कोणतीही जिवंत जोडणी राहणार नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे. कारागृहाच्या प्रवेशद्वाराजवळ कमीत कमी सहा सशस्त्र पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहतील व त्यांच्याजवळ वाहन व वॉकीटॉकी उपलब्ध राहील, याची खात्री करणे आवश्यक आहे. कारागृह परिसर व बाहेरील भाग हा सीसीटीव्हीच्या माध्यमातून निगराणीखाली आणण्याची आवश्यकता आहे. यामध्ये अंधारातही दिसू शकेल अशा प्रकारच्या इन्फ्रा रेड सोयींनी युक्त असे सीसीटीव्ही बसवणे गरजेचे आहे. तुरुंगातील व बाहेरील भाग येथे सोडियम व्हेपरचे प्रखर दिवे लावणे आवश्यक आहे. याशिवाय कारागृहातील भिंतींच्या वर कॉन्सर्टिना वायर व त्यात भोंगे बसविण्याची गरज आहे. कारागृहाच्या प्रवेशद्वारावर विशेष कंट्रोलरूम निर्मिती करून त्यातून जवळच्या पोलिस अधिकाऱ्यांना संपर्काची व्यवस्था करणे आवश्यक आहे. कारागृहातील भिंतीच्या जवळील निर्मनुष्य भागाजवळ सेन्सॉर्स लावून तेथील हालचाल कंट्रोलरूममध्ये कळेल, अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. कारागृहाच्या आत प्रत्येक ठिकाणी कमीत कमी दोन ते तीन सशस्त्र सुरक्षा कर्मचारी ठेवणे आणि त्यांच्याकडे वॉकीटॉकी देणे गरजेचे आहे. कारागृहाच्या बाहेरून सशस्त्र पोलिसांची दर १५ मिनिटांनी गस्त ठेवण्याची आवश्यकता आहे; ज्यामुळे कोणतीही अनुचित गोष्ट नजरेला येऊन कारवाई करता येऊ शकेल. एखाद्या व्यक्तीस कारागृहात ठेवले म्हणजे आपल्याला त्याच्यापासून होणारा त्रास नाहीसा झाला, असे न समजता स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांनी त्याच्यावर दैनंदिन लक्ष ठेवणे व कारागृह अधिकाऱ्यांशी समन्वय ठेवणे आवश्यक आहे, अन्यथा देशांतर्गत सुरक्षा मोठ्या प्रमाणावर धोक्यात येण्याची शक्यता आहे.

(लेखक निवृत्त पोलिस महासंचालक आहेत)

## वेध

# कापूस, सोयाबीनला योग्य भाव मिळावा

**प्रफुल्ल क. व्यास**

हिंदू पंचांगानुसार श्रावण महिना अतिशय पवित्र महिना मानला जातो. याच महिन्यात 'जीवती' हा सण साजरा केला जातो. या दिवशी दिव्यांची पूजा केली जाते. गेल्या काही दिवसात या दिवसाला 'गटारी' म्हणून एक नवीन पायंडा पाडण्याचा प्रयत्न केला जात आहे. या दिवशी खान्देश, मराठवाड्यात दारू ढोसून चिखलात लोळवल्या जाते. आता गटारीला दारूड्यांमध्ये हळूहळू मान्यता मिळू लागली आहे. हिंदू सणांना अशी जोड लावून बदनाम करण्याची एक नवीन विकृत मानसिकता जन्माला आलेली आहे. 'पिने वालो को पिने का बहाना चाहीये.' ही झाली एक गटारी वर्षातून येणारी! दुसऱ्या गटारीचा यावेळी नव्याने जन्म झाला आहे तो महाराष्ट्रातील विधानसभा दिवडणुकांच्या निमित्ताने! महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांचे वेध लागले आणि गावखेड्यात असलेले विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सत्तेत असलेले महायुती सरकार नियोजित वेळी निवडणुका घेणार नाहीत इथपासून भविष्य वर्तविणे सुरू केले. (राज्यातील महानगर पालिका, जि.प., पं.स. आणि न.प.च्या लांबलेल्या निवडणुका हे त्याचे दाखले होते.) परंतु, सर्व भविष्यवेत्त्यांचा अंदाज चुकीचा ठरवत निवडणूक आयोगाने परंपरागत ठरलेल्या वेळेवर निवडणुका जाहीर केल्या आणि राज्य सरकारचा कार्यकाळ संपण्यापूर्वी दुसरे सरकार स्थापन होईल, असे नियोजन केले. काल २० नोव्हेंबर रोजी राज्यात नवीन सरकारसाठी ६५.११ टक्के मतदारांनी मतदान केले आणि हीच २० तारीख महाराष्ट्रात दुसरी 'गटारी' घेऊन आली. राज्यातील कोणत्याही निवडणुकांमध्ये ज्या वादग्रस्त घडामोडी घडल्या नाहीत त्या सर्वांची भर या निवडणुकीने भरून काढली. राज्यातील या विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदाच दोन राष्ट्रवादी आणि दोन शिवसेना एकमेकांविरुद्ध लढल्या. भारतीय जनता पार्टी (महायुती) आणि काँग्रेस (महाविकास आघाडी) या दोन आघाड्यांमध्ये लढत होती. आचारसंहिता लागल्यापासून ते मतदानाच्या पूर्वसंध्येपर्यंत मैत्रीपूर्ण लढतीचे चित्र रंगवले गेले. परंतु, ते लपून राहिलेले नाही. मैत्रीपूर्ण लढतीतही विरोधी तर काही ठिकाणी अपक्ष उमेदवारही लढवल्या गेले. आरोप-प्रत्यारोपातही या निवडणुकीने नीचांक गाठला. महाराष्ट्र धर्म आणि स्वाभिमान सांगणारे संजय राऊत यांनी तर स्वतःच्या शिवसेनेसोबत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची वकिली करण्याचा ठेकाच घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या बोलण्याचे नवल नव्हते! मात्र, १७ ते १९ नोव्हेंबर या दोन दिवसात राज्यातील सर्वच राजकीय पक्षाचे बुरखे फाटले. खरे चेहरे मतदारांपुढे आले. राजकारणी आपले संबंध जोपासून ठेवतात आणि कार्यकर्ते तेच संबंध अंगावर घेतात. निवडणूक काळात भांडणंही करतात. अगदी वैयक्तिक द्वेषापर्यंत पोहोचतात. राज्यात यावेळी निवडणूक आयोगाने आपली भूमिका अतिशय निःपक्षपणे पार पाडली. तेव्हाच राज्यात कोट्यवधी रुपयांची रक्कम दररोज पकडल्या जात होती. ही रक्कम निश्चितच विधानसभा निवडणुकांमध्ये वाटण्यासाठी जात होती, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. यावेळची निवडणूक पुन्हा एका विषयाने गाजली ती म्हणजे हल्ले! अमरावतीत नवनीत राणा, धामणगाव येथे प्रताप अडसड यांच्या भगिनीवर चाकू हल्ला तर नाशकात 'आज तुझा मर्डर नक्की' अशी धमकी दिली. परळीत शरद पवार गटाच्या नेत्याला मारहाण करण्यात आली. ईव्हीएम फोडल्या. बल्लारपूर मतदार संघातही दोन गटात राडा झाला. बुलढाणा जिल्ह्यातील वरवट बकाल येथे एका उमेदवारावर हल्ला करण्यात आला. काटोल येथे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या वाहनावर दगडफेक झाली. मात्र, देशमुखांच्या वाहनाच्या बोनेटवर असलेला दगड बघून एवढा मोठा दगड उचलून तो मारून फेकला जाईल, असे अजिबात वाटत नाही. त्यांचे भाचे खा. अमर काळे यांच्या आर्वीत भाजपाच्या एका कार्यकर्त्याच्या शेतात दारू सापडली. विशेष म्हणजे ही दारू पकडण्यात खा. अमर काळे आघाडीवर होते आणि पोलिस नंतर पोहोचले. विशेष म्हणजे दारू सापडल्यानंतर खा. काळे यांच्या चेहऱ्यावरचा आनंद 'झाला रे बा आपला विजय!' असे सांगणारा होता. मामा-भाच्याचा बनाव या निमित्ताने उघडकीस आले. नागपुरात मतदानाच्या दिवशी दिवसभर तणाव होता. रात्री काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निवडणूक कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्यांच्या कारवर हल्ला केला. राज्यात विधानसभेच्या निवडणुकांमध्ये भांडणं होत नव्हती अशातला भाग नाही. परंतु, एवढा स्तर घसरलेला नव्हता. राज्याचा बिहार होऊ न देण्यासाठी एकगठ्ठा मतदान करण्याचे आवाहन निवडणूक प्रचार काळात समाजमाध्यमातून होत होते. परंतु, त्याची चाहूल यावेळी लागली. या घटना निपटण्याची जबाबदारी आगामी सरकारची आहे. त्यापूर्वी सरकारने शेतकऱ्यांच्या सोयाबीन आणि कापसाला योग्य भाव देण्याचा पहिला धडाकेबाज निर्णय घ्यावा... गटारी वगैरे शेतकरी राजा तसेच तुडवून टाकतात...

९८८१९०३७६५

## प्रासंगिक

# निकाल लागला; महायुतीच येणार!

**मोरेश्वर बडगे**

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक संपली. आता चर्चा आहे, कोणाची सत्ता येणार? महायुती सत्ता कायम राखणार की महाविकास आघाडी डल्ला मारणार? मग मुख्यमंत्री कोण होणार? २३ नोव्हेंबरला निकाल आहे. आजच्या वाढलेल्या मतदानाने निकालाचा बराचसा अंदाज येतो. विद्यमान विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपत आहे. त्या आधी कुठल्याही परिस्थितीत सत्ताधाऱ्यांना नवी विधानसभा, नवे सरकार बसवावे लागेल. कोण आणणार सत्तेचा मंगलकलश? पुन्हा महायुती की महाआघाडी धक्का देणार? महायुतीचे चान्सेस जास्त दिसत आहेत. मात्र, नेमके उत्तर शोधताना सामान्य मतदारांचा गोंधळ उडतो. त्याला कारणही तसेच आहे. यंदाची निवडणूक आतापर्यंत झालेल्या निवडणुकांपेक्षा वेगळी आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी हे राज्यातले प्रमुख पक्ष फुटल्यानंतरची ही पहिली निवडणूक आहे. दिसायला दोन शक्तींमधला सामना आहे. मात्र सहा प्रमुख पक्ष मैदानात आहेत. महाविकास आघाडीच्या बाजूला काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे तर महायुतीच्या बाजूने भाजपा, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी उभे ठाकले आहेत. विषय इथे संपत नाही. राज ठाकरे यांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना, प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी, संभाजीराजे, परिवर्तन महाशक्ती... भरपूर पक्ष मैदानात उतरले आहेत. प्रत्येक निवडणुकीत बंडखोर असतात. मात्र यावेळी बंडखोरांचे मोठे पीक आहे. पैशाचा पाऊसही सपाटून पडला आहे. का नाही पडणार? राजकीय पक्षांनी दिलेले उमेदवार करोडपती आहेत. शरद पवारांनी उभ्या केलेल्या ८४ उमेदवारांपैकी ८० करोडपती आहेत. काँग्रेसने दिलेल्या १०१ उमेदवारांपैकी ९४ करोडपती तर उद्धव ठाकरे यांनी उतरवलेल्या ९५ पैकी ९४ करोडपती आहेत. भाजपा १४९ जागा लढवत आहे. यातले १४४ उमेदवार करोडपती आहेत. अजितदादा पवार यांच्या ५० उमेदवारांपैकी ४८ करोडपती आहेत. फक्त ४० लाख खर्चायला परवानगी आहे, असे निवडणूक आयोग सांगतो. मात्र, ४० लाखात निवडणूक होते का? होत नाही म्हणून मग बाकी गोष्टी होतात. निवडणुका सामान्य माणसाच्या हातून निसटत चालल्या आहेत. निवडणुकीतून सामान्य माणसांचे मुद्दे गायब होत चालले आहेत, त्याचे हेही एक कारण आहे. यावेळी तर विरोधकांनी खूप शिमगा खेळला. विकासाच्या मुद्याची फार चर्चाच झाली नाही. एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यात प्रचार संपला.



सत्तेचा हायवे विदर्भातून जातो. विदर्भ जिंकणाऱ्याला सत्ता जिंकणे सोपे जाते. पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत विदर्भात भाजपाला तडाखा बसला. त्यामुळे मोदींना ४०० चा आकडा गाठता आला नाही. मित्रपक्षांना सोबत घेऊन नरेंद्र मोदींनी तिसऱ्यांदा सरकार बनवले तो भाग वेगळा. मात्र, ही निवडणूक भाजपामध्ये सर्वांनीच गंभीरपणे घेतली होती. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार नाकेबंदी केली. नितीन गडकरी जोरदार फिरले. नरेंद्र मोदी-अमित शाह जोडीने जंगी सभा केल्या. त्यामुळे विदर्भातून महायुतीला मोठी ताकद मिळेल. तसाही, लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुती यांना मिळालेल्या मतांमध्ये अवघ्या एक टक्क्यापेक्षा कमी मतांचा फरक आहे. मात्र आघाडीला ३१ जागा मिळाल्या तर महायुतीला १७ जागा. आकड्यांची ही जादू आहे. जिता वह सिकंदर. विधानसभा निवडणुकीत मतदारसंघ लहान लहान असतात. स्थानिक मुद्यांवर निवडणूक लढली जाते. दोन-पाच हजारात निकाल लागतो. फार चुरस झाली तर शे-पाचशेमध्येही फैसला होतो. यावेळी उमेदवारांची गर्दी असल्याने मतविभाजन मोठ्या प्रमाणावर होणार आहे. त्याचा महायुतीला फायदाच आहे. लोकसभा १५० विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीला लीड होता. मात्र लोकसभा निवडणूक आणि आता झालेली निवडणूक यात जमीन-अस्मानाचा फरक सांगता येईल. पाच महिन्यात वारे खूप बदलले आहे. मनोज जरांगे पाटील या मराठा आंदोलकाने मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण मिळावे या मागणीच्या आडून आंदोलन केले. आरक्षण मिळतंय या हवेतून मराठा समाज त्यांच्यामागे गेला, पण जरांगे नावाचा फुगा फुटला. शरद पवार यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी उभे केलेले हे पिल्लू होते, ही गोष्ट आता मराठ्यांच्याही लक्षात येते आहे. त्यामुळे जरांगे फॅक्टर आता फार चालणार नाही. मोदींना संविधान बदलण्यासाठी ४०० जागा पाहिजेत, असा खोटा प्रचार विरोधकांनी चालवला. त्यामुळे मुस्लिम, दलित वर्ग तिकडे गेला. मात्र आज विरोधक उघडे पडले आहेत. भाजपाला रोखण्यासाठी विरोधकांकडे कुठला ठोस मुद्दाच नाही. 'बटेंगे तो कटेंगे' असा नारा या निवडणुकीच्या रणधुमाळीत उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिला. 'एक है तो सेफ है' असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. या दोन नाऱ्यांनी महाविकास आघाडीला 'उघडं' केलं आहे. यावेळी या मतांमध्ये विभाजन आहे. मुस्लिम मतं मोठ्या प्रमाणावर ओवेसी आणि अबू आझमी खातील. संभाजी राजेंची आघाडी मैदानात आहे. दलित मतंही विखुरलेली दिसतील. वंचित आघाडी आहे, राज ठाकरे यांची मनसे आहे. हे सारे महाविकास आघाडीचीच मतं खाल्लेले दिसतील. हिंदू मतं विभाजित होतात. मात्र हिंदू मतदारांमध्ये उत्साह दिसून आला. लोकसभा निवडणुकीत ६६ टक्के मतदान झाले होते. गेल्या विधानसभेत ६४ टक्के मतदान झाले होते. यावेळी मतदानाचा टक्का वाढलेला दिसतो. त्यामुळे कसेही फासे पडले तरी महायुतीचा विजयरथ थांबणे नाही. लिहून ठेवा.

एकटी 'लाडकी बहीण' योजनाच महाआघाडीला लंबी करणार आहे. लोकसभा निवडणुकीत 'लाडकी बहीण' या योजनेने अडीच कोटी 'बहिणीं'ना लाभ झाला आहे. यातल्या निम्म्याही 'बहिणी'ची मतं मिळाली तरी बल्ले बल्ले! सर्वात मोठी गोष्ट म्हणजे यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सैन्य भाजपाच्या मदतीला मैदानात उतरले होते. अंदाज आहे की, महाविकास आघाडी शंभराच्या आत गुंडाळली जाईल. लोकसभा निवडणुकीत भाजपाला पटकणी देणारी महाविकास आघाडी राज्याच्या एवढा मार खाईल, हे अनेकांना पचनी पडणार नाही. पण ते होणार आहे. लोकसभा निवडणूक लागली तेव्हा शिवसेना आणि राष्ट्रवादी फुटले होते. त्या सहानुभूतीचा लाभ त्यांना मिळाला. महाआघाडीला ३१ म्हणजे सर्वाधिक जागा मिळाल्या. जागा जास्त मिळाल्या तरी आघाडी आणि महायुती यांना मिळालेल्या मतांचा फरक नगण्य होता. लोकसभेतील यशाची आघाडीच्या नेत्यांना मस्ती चढली. आता तिन्ही घटक पक्ष एकमेकांच्या तंगड्या ओढू लागले. मुख्यमंत्री कोण होणार? यावरून उद्धव ठाकरे यांनी गोंधळ घातला. त्यानंतर शरद पवार, नाना पटोले सावध झाले. महाआघाडी हरली तर त्याचे श्रेय उद्धव ठाकरे आणि त्यांचे हनुमान संजय राऊत यांना दिले पाहिजे. या दोघांनी ज्या पद्धतीने आग ओकली ते मतदारांना आवडले नाही. ताजा किस्सा सांगतो, हेलिकॉप्टर तपासायला निवडणूक आयोगाचे अधिकारी आले तेव्हा उद्धव ठाकरे त्यांच्याशी ज्या उद्दामपणे वागले ते कोणालाही पसंत पडले नाही. मुख्यमंत्री पदावर दावा सांगायचा तर जास्त आमदार निवडून आणावे लागतील. त्या स्पर्धेतून एकमेकांचे उमेदवार पडण्याची जणू शर्यतीच लागली होती. त्या शर्यतीचा निकाल तुम्हीही सांगू शकता.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### हवामान बदल आणि लहान मुलं

सध्या भारतामध्ये लहान मुलांची संख्या ४४ कोटी एवढी आहे. २०५० पर्यंत ही संख्या ३५ कोटींपर्यंत खाली येऊ शकते. त्यांचे भविष्य सुरक्षित करणे हे मोठे आव्हान असणार आहे. युनिसेफने जागतिक पातळीवर मुलांच्या एकूण स्थितीबाबत एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. सध्या लोकसंख्येत काही बदल होत आहेत. दिवसेंदिवस पर्यावरणाचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. हवामान बदलाचे मोठे संकट उभे ठाकले आहे. या शिवाय पिण्याच्या पाण्याचा प्रश्नसुद्धा अवघड होत चालला आहे. तंत्रज्ञानामध्ये सतत बदल होत आहेत. या सर्वांचे परिणाम लहान मुलांवर होणार. युनिसेफने म्हटले आहे की, २००० च्या तुलनेत आठ पट जास्त उष्णतेच्या लाटांना लहान मुलांना सामोरे जावे लागेल. २०२४ हे वर्ष जगात अनेक दृष्टीने महत्त्वाचे होते. त्यामध्ये तापमानाची प्रचंड वाढ दिसून आली होती. कमी उत्पन्न असलेल्या काही देशात विशेषतः आफ्रिका इत्यादी. दारिद्र्य कमी, शिक्षण-आरोग्याची हेळसांड अशा अनेक समस्या जाणवू लागतील. शिवाय काही देशात सतत युद्धाचे वातावरण आहे. त्याचाही परिणाम लहान मुलांवर होऊ शकतो. त्यांच्या विकासात अडथळे निर्माण होऊ शकतात. एकूणच येणारा काळ हा लहान मुलांच्या दृष्टीने सध्या तरी कठीण आहे. युद्धसदृश स्थिती हा एक उपाय होऊ शकतो.


**शांताराम वाघ**/पुणे

●● ●●

### मतदानाची टक्केवारी इतकी कमी?

२० तारखेला महाराष्ट्राची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली. किती लोकांनी आपले मत टाकले, त्याची नोंदणी, जिल्हावार आकडेवारी आली. जवळपास सरासरी ६० टक्के लोकांनी मत टाकले आणि ४० टक्के लोकांनी आपले मत टाकले नाही. या लोकांनी मतदान का केले नाही, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. मतदान हा आपला हक्क आहे. आपले सरकार आपल्या मताप्रमाणे निवडून देण्याचा आपल्याला अधिकार मिळाला आहे. त्यामुळे प्रत्येकाची जबाबदारी आहे की आपल्या

## वाचक पत्रे



पसंतीचा, राज्याचे कर्तव्य निभावणारा, देशाची जबाबदारी सांभाळणारा राष्ट्रनिष्ठ अशा उमेदवाराला आपण मत द्यायला हवे. चांगल्या उमेदवारांना निवडून आणायला हवे. एक मत फार महत्त्वाचं असतं. नगरपालिकेची निवडणूक होती. ह्यांचा मित्र निवडणुकीत उभा होता. दुसऱ्या दिवशी मंगळागौरीचे उद्यापन असल्यामुळे माझ्याकडे पाहुणे आले होते. परंतु मला हे म्हणाले की, तुला आता मतदान केलेच पाहिजे. लवकर चल. मी यांच्याबरोबर गेले. मतदान केलं. माझं शेवटचं मत होतं. त्यानंतर मतदानाची वेळ संपली. त्यांचा मित्र फक्त एका मताने जिंकून आला. एक मत किती महत्त्वाचं असतं. आपलं मत अत्यंत महत्त्वाचं आहे हे त्यादिवशी मला कळलं. प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. मतदानाची टक्केवारी वाढावी. यापुढे निवडणुकांमध्ये ९० टक्के मतदानाची नोंद दिसायला हवी. निवडणुकांमध्ये लोकांनी मतदान करावंच करावं, अशी अपेक्षा आहे.

**मीना खोंड**/७७९९५६४२१२

●● ●●

### मतटक्का अपेक्षानुरूप वाढला?

मतदान पार पडल्यानंतर राज्यातील महासंग्राम आता थांबला आहे. राज्यात काही ठिकाणी काही प्रमाणात मतदानाची टक्केवारी वाढली आहे. किमान ७० टक्के मतदान राज्यात होईल, अशी अपेक्षा सर्वांनाच होती. गडचिरोली जिल्ह्याने मतदानाच्या बाबतीत पहिला क्रमांक पटकावला आहे. कोल्हापूर, भंडारा आणि गोंदिया जिल्हे आहेत. १५ जिल्ह्यांत प्रथम श्रेणीचे (६० टक्क्यांपेक्षा जास्त) मतदान झाले. मुंबई शहर आणि ठाणे याठिकाणी मतदान टक्केवारीला पन्नाशीसुद्धा गाठता आली नाही. विद्येच्या माहेरघरी आणि संत्रानगरीत ही टक्केवारी जेमतेम ५४ आणि ५६ एवढीच आहे. सुशिक्षित मतदार जर मतदानाकडे पाठ फिरवत असेल तर याला काय म्हणावं? झोपड्यांमध्ये राहणाऱ्या तुलनात्मक अशिक्षित मतदाराने भरघोस मतदान केले. निवडणूक आयोगाने मतदान वाढवण्यासाठी जाहिराती दिल्या, पण म्हणावी तशी तयारी केली नाही. मतदान केंद्रावर ज्येष्ठांसाठी किमान बसण्याची व्यवस्था असणं गरजेचं नाही का? मतदान यंत्रांची मतदानपूर्व तपासणी केल्यानंतर इतकी मतदान यंत्र बंद का पडतात? मतदान कक्षामध्ये पुरेसा प्रकाश आवश्यक नाही का? मतदार यादीत नाव नसण्यासाठी प्रशासन आणि राजकीय पक्ष हे दोघेही जबाबदार आहेत. राज्यातील लाखो मुलं-मुली परदेशांत जॉब करतात. केवळ मतदानासाठी मायदेशात काही जण येतात. सर्वांना ते शक्य होत नाही. या भारतीय नागरिकांसाठी काहीतरी उपाय शोधावेच लागतील. गेल्या काही वर्षांत राज्यात घडलेला सत्तासंघर्षाचा आणि निवडणूकपूर्व प्रचाराने गाठलेली नीचांकी पातळी मतदाराला उदासीन करते का?

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

●● ●●

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विद्यापीठात आज ६ विधानसभा व लोकसभेसाठी मतमोजणी

## किनवट, हदगाव व लोहा येथे त्या-त्या ठिकाणी मतमोजणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ नोव्हेंबर**

नांदेड जिल्ह्यात लोकसभा पोटनिवडणूक व ९ विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान झाले. निवडणूक आयोगाने २१ तारखेला दुपारी जाहिर केलेल्या अंतिम आकडेवारी नुसार नांदेड जिल्ह्याने यावेळी २०१९ च्या तुलनेने विक्रमी मतदान केले असून यावेळी विधानसभेसाठी ६९.४५ टक्के मतदान झाले आहे. तर लोकसभा पोटनिवडणुकीतही गेल्या वेळेच्या तुलनेत ७ टक्के अधिक मतदान झाले असून ही टक्केवारी ६७.८१ आहे. उद्या शनिवार २३ नोव्हेंबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये ज्ञान स्त्रोत केंद्र ( नॉलेज रिसोर्स सेंटर ) येथे सकाळी ७ वाजल्यापासून मतमोजणी सुरु होणार आहे.



पहिल्या व दुसऱ्या माळ्यावर विधानसभा व लोकसभा निवडणुकीची मतमोजणी होणार आहे. पहिल्या माळयावर खोली क्रमांक १०२ व खोली क्रमांक ६ याठिकाणी सहा विधानसभा क्षेत्राची मतमोजणी होणार असून सर्व मतयंत्र याठिकाणच्या स्ट्रॉंगरुममध्ये पोहोचले आहे. तसेच दुसऱ्या माळ्यावर खोली क्रमांक २०२ ते २०६ मध्ये लोकसभा पोटनिवडणुकीची मतमोजणी होणार आहे. याठिकाणच्या स्ट्रॉंगरुममध्ये मतयंत्र पोहोचली आहेत. उमेदवारांच्या उपस्थितीत सर्व मतपेट्या स्ट्रॉंगरुममध्ये बंद झाल्या असून सीसीटीव्हीच्या निगराणीत ठेवण्यात आल्या आहेत. २३ नोव्हेंबरला सकाळी उमेदवारांच्या व त्यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत मतदान यंत्र बाहेर काढले जातील व त्यानंतर मतमोजणीला सुरुवात होईल. याठिकाणी वेगवेगळे कक्ष करण्यात आले असून उमेदवारांचे प्रतिनिधींसाठी देखील थांबण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. विधानसभेची १४ टेबलावर मोजणी होणार आहे. लोकसभा व विधानसभेसाठी १४ गुन्हीले ६ असे ८४ टेबल लोकसभा आणि विधानसभासाठी असणार आहे. अंदाजे २४ ते २८ फेऱ्यांमध्ये मतमोजणी होणार आहे.

**किनवट, हदगाव व लोहा येथे त्या-त्या ठिकाणी मतमोजणी**

किनवटला आयटीआय कॉलेजमध्ये तर हदगावला समाज कल्याण भवन येथील अनुसूचित जातीचे मुलींचे शासकीय वसतीगृह तर लोहा येथे महसूल हॉल, तहसिल कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे.

**सुसज्ज मीडिया कक्ष**

भारत निवडणूक आयोगाने ज्यांना हिरव्या रंगाची प्राधिकार पत्र दिले अशा पत्रकारांना मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाणार आहे. याठिकाणी माध्यम प्रतिनिधींना संपर्क करण्यासाठी इंटरनेट, संगणक, टिव्हीची व खानपानाची व्यवस्था करण्यात आली आहे. पत्रकारांना माध्यम कक्षापर्यंत आपला मोबाईल वापरता येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत मतमोजणी कक्षाच्या आतमध्ये मोबाईल घेवून जाण्यास परवानगी असणार नाही. याठिकाणी जिल्हा माहिती अधिकाऱ्यांसोबत पाच किंवा त्यापेक्षा मर्यादित पत्रकारांचा गट करुन पाहणी करता येईल. माध्यम कक्षातून फेरीनिहाय माहिती, परवानगी मिळालेले छायाचित्र ई-मेल व व्हॉटसअप ग्रुपवर प्रसिध्दीसाठी देण्यात येईल.

# विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालव्याची व रस्त्याची दुरुस्ती करून नऊ पाणी पाळ्या देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ नोव्हेंबर**

आशिया खंडातील सर्वात मोठ्या विष्णुपुरी प्रकल्प डेरलां लिफ्ट यांच्या कालव्याची व रस्त्याची दुरुस्ती यांत्रिकी विभागामार्फत करून नऊ पाणी पाळ्या सोडण्याचे नियोजन करण्यासाठी कालवा सल्लागार समितीची सचिव, अधीक्षक अभियंता यांना शेतकऱ्यांच्या उपस्थित बैठक घेण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर यांनी केली आहे.

आशिया खंडातील सर्वात मोठा उपसा जलसिंचन प्रकल्प म्हणून विष्णुपुरी डेरला ओळखले जाते. विष्णुपुरी प्रकल्प हा पूर्ण क्षमतेने भरला असून जायकवाडी प्रकल्पसुद्धा भरलेला आहे व गोदावरी नदीवरील नऊ बंधारेही भरलेले आहेत. खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे, त्यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या हलाकीचा झालेला आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी रब्बी हंगाम महत्त्वाचा आहे. या रब्बी हंगामासाठी विष्णुपुरी प्रकल्प डेरला लिफ्टच्या कालव्याद्वारे लोहा, कंधार, नांदेड तालुक्यातील परिसरामध्ये अनेक गावांना रब्बी सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे, परंतु निवडणुकीमुळे कालवा सल्लागार बैठक झाली नाही.

विष्णुपुरी डेरला प्रकल्पाची कालव्यांना रब्बी व उन्हाळी पाण्याचे नियोजन करण्याचा अधिकार कायद्याने २००५ जलसंपदा कालवा सल्लागार समितीला मिळतो. या कालवा सल्लागार समितीचे अध्यक्ष पदसिद्ध हे महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री असतात, परंतु सध्या महाराष्ट्रात निवडणुका चालू असल्यामुळे त्या संदर्भात बैठक घेण्यात आली नाही. या समितीचे सचिव अधीक्षक अभियंता असतात. त्यांच्या अध्यक्षेखाली बैठक घेऊन रब्बी व उन्हाळी हंगामासाठी नऊ पाणी पाळ्यांचे नियोजन करण्याचे आदेश संबंधित अधीक्षक अभियंता सर्कल नांदेड पाटबंधारे यांना द्यावेत व शेतकऱ्याला न्याय द्यावा. तसेच कालव्याची दुरुस्ती करण्यासाठी व कॅनलवरील रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी यांत्रिकी विभागाला आदेशित करावे, असेही राज्याचे मुख्य सचिव यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनावर मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर, लिंगोजी पाटील हरबळकर, खुशाल पाटील दगडगावकर, त्र्यंबक पाटील जानापुरीकर, जाधव पिपरणवाडीकर माधवराव देसाई, गोविंदराव मुकादम, नवनाथराव मोरे, शंकरराव मोरे, अंबादासराव देशमुख जवळेकर, विजयकुमार बोरगावकर, ज्ञानोबा टोणगे दापसेडकर, बळी पाटील मडकीकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### तेलंगाना भैंसा डिपो मॅनेजर यांची कालावधीची मुदत संपली



**धर्माबाद**-महाराष्ट्र शासनाचा व राष्ट्रीय परिवहन महामंडळ यांचा महसूल बुडत आहे. तहसीलदार यांनी दिलेल्या पत्राची अंमलबजावणी होत नसून अनाधिकृत आंध्रा बस स्टॉप हे महर्षी वाल्मिकी चौक येथे राष्ट्रीय राष्ट्रीय परिवहन महामंडळ विभागासोबत कसलाही करार तेलंगाना येथील आगारप्रमुखांनी न करता तेलंगणातील बसेस चालूच ठेवल्या. सविस्तर वृत्त असे की धर्माबाद ही एक मोठी बाजार पेठ असून दररोज आंध्रा प्रदेश व तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून हजारो लोक विविध कामांच्या निमित्ताने धर्माबाद शहरात येत असतात. तालुक्यात महाराष्ट्र बस स्थानक आहे तेलंगणातील काही बस सेवा फक्त महर्षी चौक पर्यंतच येऊन तिथून परतत होतात त्यामुळे इतर नागरिकांना चक्क महाराष्ट्र बस स्थानकापासून महर्षी चौक पर्यंत पायी चालत जावे लागते किंवा ऑटो ने तीस रुपये देऊन जावे लागत असे याचा त्रास महाराष्ट्रातून आंध्र प्रदेश व तेलंगणा राज्यात जाणाऱ्या महाराष्ट्रीयन प्रवाशांना होत होता म्हणून रिपब्लिकन सेनेचे तालुका अध्यक्ष साहेबराव दुगाने, डी के पाटिल व वंचित बहुजन आघाडी चे शहर उपाध्यक्ष किरण गजभारे, राहुल शिरसे यांनी व सहकार्यांनी दिनांक १३ सप्टेंबर रोजी रिपब्लिकन सेनेचे धर्माबाद तालुकाध्यक्ष साहेबराव दुगाने यांच्या नेतृत्वात महर्षी चौक येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत धर्माबाद तहसीलदार यांनी भैसा व निर्मल वाहतूक नियंत्रण अधिकाऱ्यांना पत्र देऊन सदर आंदोलनांची माहिती देत तेलंगणा राज्यातून येणाऱ्या बसेस महर्षी चौक अनधिकृत (आंध्रा बस स्टॉप) येथे थांबवण्या ऐवजी ते अधिकृत महाराष्ट्र बसस्थानकात थांबवण्यात यावेत अन्यथा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो अशी लेखी विनंती वजा सल्ला दिला होता. या रास्ता रोको आंदोलनाच्या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी मा. अभिजीत राऊत, पोलीस अधीक्षक नांदेड, धर्माबाद तहसीलदार व पोलीस निरीक्षक व तेलंगणा राज्याच्या आगार प्रमुख यांना देण्यात आले होते. या दरम्यान सर्व बाबींची चौकशी करून नायब तहसीलदार गावंडे यांनी तोंडी व लेखी आश्वासन दिले व सदरील विभागाला पत्रव्यवहार केला त्यामुळे आज पासून (आंध्रा बस स्टॉप) च्या ऐवजी महाराष्ट्र व स्थानक या ठिकाणी तेलंगणातील सर्व बसेस थांबण्यात येणार आहे. त्यामूळे महाराष्ट्रातून आंध्र व तेलंगणा राज्यात जाणाऱ्या धर्माबाद तालुका वाशीयांसाठी व महाराष्ट्र राज्याच्या विविध भागांतून धर्माबाद शहरात ये जा करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय या पुढे होणार नसल्याने समाधान व्यक्त केल्या जात आहे. परंतु तहसीलदारांचा आदेश तेलंगानातील आगार प्रमुख यांनी कचऱ्याच्या डब्यात टाकून आपला मनमानी कारभार सुरूच ठेवला आहे. याकडे वाहतूक शाखेने सुद्धा कानाडोळा केला आहे. अनधिकृत आंध्रा बस स्टॉप या ठिकाणी बसेस थांबून विद्यार्थी नागरिक व्यवसायिक यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

### विनापरवाना शुभेच्छा फलक, बॅनर लावल्यास कारवाई..!

**नांदेड**-संपूर्ण महाराष्ट्रात शनिवारी विधानसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्याचवेळी नांदेडमध्ये विधानसभेसह नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचाही निकाल लागणार आहे. या निवडणूक निकालानंतर विनापरवानगी शुभेच्छा बाबतचे जाहिरात फलक, पोस्टर, किऑस, झेंडे, भित्तीपत्रके लावू नयेत, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे या आदेशाची नांदेडात काटेकोरपणे अंमलबजावणी होईल, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे. नांदेड शहरात कोणीही विनापरवानगी बॅनर, पोस्टर लावल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा नांदेड महापालिकेचे उपायुक्त स. अजितपालसिंघ संधू यांनी दिला आहे. याबाबत संपूर्ण क्षेत्रिय अधिकाऱ्यांनाही निर्देश दिले आहेत. कुठेही विनापरवानगी बॅनर, पोस्टर लावल्यास तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे उपायुक्त संधू यांनी सांगितले.

### निवडणुकीतील स्त्री-पुरुषनिहाय मतदान

**नांदेड**-लोकसभा पोटनिवडणूकीसाठी भोकर मतदारसंघात पुरुष १ लाख २० हजार ११७ तर महिला १ लाख ११ हजार २३६ व इतर ३ असे एकूण २ लाख ३१ हजार ३५६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. नांदेड उत्तर मतदारसंघात पुरुष १ लाख १३ हजार ५२४ तर महिला १ लाख ३ हजार ९८३ तर इतर १५ असे एकूण २ लाख १७ हजार ५२२ तर नांदेड दक्षिण मतदारसंघात पुरुष १ लाख ६ हजार ३९० व महिला ९६ हजार ३२६ व इतर २ असे एकूण २ लाख २ हजार ७१८ मतदारांनी आपला हक्क बजावला. नायगाव मतदारसंघात पुरुष १ लाख १९ हजार ६३७ तर महिला १ लाख १० हजार ११४ व इतर १ असे एकूण २ लाख २९ हजार ७५२ मतदारांनी मतदान केले. देगलूर मतदारसंघात पुरुष १ लाख २ हजार २९० महिला ९५ हजार १११ व इतर ८ असे एकूण १ लाख ९७ हजार ४०९ मतदारांनी मतदान केले. मुखेडमध्ये पुरुष १ लाख ११ हजार ८७६ तर महिला १ लाख ३ हजार ५२४ व इतर २ असे एकूण २ लाख १५ हजार ४०२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

# थडीसावळी, गळेगांव शिवारात हरभऱ्यास तुषारने पाणी सुरू

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. २२ नोव्हेंबर**

थडीसावळी,गळेगांव परिसरातील शेत शिवारात हरभरा या पीकास शेतकरी तुषार सिंचनाने पाणी देण्यात मग्न आहेत. एकंदरीत परिसरातील पीक पेरणी होऊन एक महिना जवळपास उलटला आहे. महिन्याचे हरभरा पीक शेता शेतात डोलू लागले आहे. वातावरणात थोडासा गारठाही वाढलेला दिसून येत आहे.पहिली फवारणी देखील पुढेमागे शेतकरी करीत आहेत. आया बायांची पीकात निंदणी देखील सुरू झाली आहे.काही शेतकरी धनियाचे पीक घेतल्याचे पहायला मिळाले.



रात्री अपरात्री शेत शिवारात शेतकरी आपल्या हरभरा पीकास तुषार सिंचनाने पाणी देत असल्याचे चित्र सध्या थडीसावळी, गळेगांव परिसरात पहायला मिळत आहे.शेताच्या उशाला,पायथ्याला,धुऱ्याला बोअरवेल असलेल्या शेजारील शेतकऱ्यांना थोड्या कष्टाने सहजासहजी पाणी, पाईप मिळत आहे,मात्र बोअरवेल पासून दूरदूर असलेल्या शेतांना पाण्यासाठी अतिरिक्त पाईपांची तडजोड करावी लागत आहे. कारण सगळेच शेतकरी पाणी देण्यात जिकडेतिकडे व्यस्त आहेत. त्या उपरही जाऊन विजेचा सिंगल फेज आणि थ्री फेज पुरवठा असल्याने अधेमधे वीजही गुल होत राहते.त्याचाही सामना शेतकरीवर्गांस करावा लागतो.

थडीसावळी, गळेगांव परिसरातील हरभरा पीकास सद्यस्थितीत जोमदार उगवण क्षमता लाभल्याने शेतकरी समाधानी आहेत. मात्र, पाणी देण्यासाठी राना शिवारात रात्री अपरात्री शेतात ठाण मांडून असल्याचे चित्र आहे.

# शकुंतलाबाई चन्नावार यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ नोव्हेंबर**

येथील डॉक्टर्स लेन परिसरातील प्रतिष्ठित श्रीमती शकुंतलाबाई गोविंदराव चन्नावार (वय ८० वर्षे) यांचे दि. १८ नोव्हेंबर रोजी रात्री १.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात कापड व्यापारी दीपक, संतोष व कृष्णा अशी तीन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. श्रीमती शकुंतलाबाई चन्नावार यांच्या पार्थिवावर दि. १९ नोव्हेंबर रोजी दुपारी शांतीधाम गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातून मोठा जनसमुदाय उपस्थित होता. श्रीमती शकुंतलाबाई चन्नावार यांचा स्वभाव मनमिळावू होता. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते स्व. नारायणराव पांडुरंग चन्नावार यांच्या त्या स्नुषा होत.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी राजाराम काकानी सहकार विद्या मंदिरच्या सोनाक्षी गिरीची निवड

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. २२ नोव्हेंबर**

नांदेड येथे नुकतेच राज्यस्तरीय हॉकीच्या स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेत राजाराम काकांनी सहकार विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांनी १७ वर्षाखालील मुलींच्या स्पर्धेत सहभाग घेतला होता. स्पर्धा संपन्न झाल्यानंतर राज्य निवड समिती आयोजित निवड चाचणीत आर के एस व्ही एम या शाळेतील सोनाक्षी गिरी हिचे १७ वर्षाखालील मुलींच्या संघात निवड करण्यात आली.



दिनांक २१ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर दरम्यान हरियाणा येथील रोहतक येथे संपन्न होणारे राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सोनाक्षी महाराष्ट्राचा प्रतिनिधित्व करणार आहे. सोनाक्षीच्या निवडीसाठी शाळेचे क्रीडा शिक्षक तथा हॉकी प्रशिक्षक श्रीनिवास कांबळे यांनी परिश्रम घेतले तर सोलापूरचे क्रीडा अधिकारी श्री कुरेशी सर, क्रीडा प्रबोधनी पूनेचे सागर करांदे, सोलापूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी श्रुत पवार सर, नांदेड चे श्री सरदार हरविंदर सिंग कपूर आणि सचिन कांबळे या अधिकाऱ्यांनी सोनाक्षीचे निवड केली. सोनाक्षीचे निवड झाल्याबद्दल शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री सुबोध काकांनी यांनी शाळेच्या क्रीडा अनुकूल धोरण व विद्यार्थ्यांना मिळणारे प्रोत्साहनामुळे हे यश प्राप्त झाले आहे असे म्हटले, सोनाक्षी गिरी चे अभिनंदन करत राष्ट्रीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिले तसेच शाळेतील प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक पालकांकडूनही कौतुक होत आहे.

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख गणेश गिरी महाराज यांची मुलगी आहे.

सोनाक्षी गिरी सध्या जळगाव येथे प्रशिक्षण घेत असून तिला देण्यात आलेल्या प्रोत्साहनाबद्दल तिने शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री सुबोध काकानी, क्रीडा शिक्षक श्रीनिवास कांबळे, प्राचार्य व सर्व शिक्षकांचे व पालकांचे आभार मानले.

# धर्मगुरु बाबुसिंगजी महाराज यांची वामनराव विष्णुपूरीकर यांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ नोव्हेंबर**

धर्मगुरु प.पू. बाबुसिंगजी महाराज गादीपती बंजारा काशी पोहरादेवी शक्तीपिठ (धाम) ता. मानोरा जि. वाशिम (महाराष्ट्र) यांची त्यांच्या पोहरादेवी येथील निवासस्थानी श्री संत रोहिदास महाराज मंदिर प्रस्तावित तिर्थक्षेत्र वर्ग ब एमआयडीसी एरिया बळीरामपूर नांदेड चे संस्थापक वामनराव मे. विष्णुपूरीकर यांनी सदिच्छा भेट घेऊन दि. १५ ऑक्टोंबर २०२४ रोजी त्यांची विधान परिषदेवर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा शाल,



श्रीफळ, पुष्पहार, स्मृतीचिन्ह, नऊ भाषेतील गुरु महाराज यांचा ग्रंथ भेट देऊन सहृदय सत्कार करण्यात आला.

यावेळेस चर्चेअंती सदरील तिर्थक्षेत्राचा मागील ४०-४१ वर्षाचा इतिहास व प्रगतीचा उलगडा त्यांच्यासमोर करण्यात आला. याप्रसंगी बसव संघटनेचे कार्यकर्ते गुंडप्पा बसलिंगप्पा बारोळे हे आवर्जुन उपस्थित होते.

# लोहा नगरपालिकेने काढले स्वच्छतेचे धिंडवडे

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २२ नोव्हेंबर**

शहरात सध्या प्रशासकराज चालू असून त्यांचे शहराकडे दुर्लक्षच अधिक दिसत आहे. शहरातील जिकडे तिकडे नाल्या तुडुंब कचऱ्याने, घाणीच्या पाण्याने भरभरून वाहत आहेत. रस्त्यावर घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे नागरिकांना दुर्गंधीचा नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. स्वच्छता विभाग प्रमुख यांचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्यामुळे आजही लोहा शहरात घाणीचा सामना करावा लागत आहे. शहरातील स्वच्छता ठेवणे हे नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाचे आद्यकर्तव्य असताना मुख्य रस्त्याने जुन्या गावात जाणाऱ्या रस्त्यावरील नालीतील पाणी कचरा घाणीने ओसंडून वाहत आहे, पोस्टामागील परिसर हा घाणीने (नालीच्या पाण्याने) वेढला आहे. त्यामुळे डासाचा प्रादुर्भाव वाढला आहे. असे चित्र सर्वच प्रभागात दिसून येत आहे.

कचऱ्याचे ढीग तर विचारूच नका, प्लास्टिक बंदीचे नियम तर नगरपालिकेने बासणात गुंडाळून ठेवले आहे. मोकाट जनावरांचा देखील त्रास होत आहे. शहराची स्वच्छता होत नसल्याने नागरिकांना दुर्गंधीयुक्त वासावर आणि नाल्याच्या घाण पाण्यातून रस्ते पार करावे लागत आहे. स्वच्छता विभागाच्या नाकर्तेपणामुळे शहरातील अस्वच्छतेचा कळस गाठला गेल्याचे दिसून येत आहे. ज्येष्ठ नागरिकांना साथीच्या रोगाचा सामना करण्याची वेळ आली आहे. मुख्याधिकारी यांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे स्वच्छता विभागाच्या कारभाराबाबत नियमानुसार कर भरणाऱ्या नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. प्रशासनाचे माणसं नाल्या साफ करण्यासाठी जवळपास सहा महिन्यापासून नाली साफ करायला आलेच नाहीत. त्यामुळे तुडूंब भरल्या आहेत. घरावर लावलेल्या स्टिकर चा काहीच उपयोग होत नसल्याचे दिसून येत आहे. त्याचे स्कॅनिंगपण होत नाही. सध्या ते ऍक्टिव्ह झाल्याचे दिसून येत नाही. स्वच्छता विभागाचे काम एखाद्या चांगल्या जबाबदार व्यक्तींना देऊन महिन्याला स्वच्छतेचा कर भरणाऱ्या नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी नागरिकातून होत आहे.

# देगलूर-बिलोली विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत माध्यम कक्षाने केले उत्तम नियोजन

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. २२ नोव्हेंबर**

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक, देगलूर- बिलोली विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी देगलूर तहसील कार्यालयाने माध्यम कक्षाची निर्मिती केली यामुळे देगलूर - बिलोली सार्वत्रिक निवडणुकीच्या विविध कार्यक्रमाची माहितीला प्रसिद्धी मिळाल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.



जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली देगलूर बिलोली विधानसभा सार्वत्रिक निवडणूक निर्णय निवडणूक अधिकारी तथा बिलोली उपविभागीय अधिकारी श्रीमती क्रांती डोंबे यांनी येथील तहसील कार्यालयात माध्यम कक्षाची निर्मिती केली. यामध्ये बिलोली तहसीलदार गजानन शिंदे यांना माध्यम नोडल अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली बिलोली नायब तहसीलदार पुरवठा सुषमा मोहोड यांना सहाय्यक मीडिया कक्षाची जबाबदारी सोपविली यांच्या अंतर्गत सहाय्यक नरहरी कोलगाणे, प्रा.महेश कुलकर्णी विठ्ठल चंदनकर, विजय शिकारे यांनी काम पाहिले. विधानसभा तसेच लोकसभा पोट निवडणुकीसाठी स्थापन झालेल्या माध्यम कक्षाने कामाचे उत्तम नियोजन करत जिल्हास्तरावर संपर्क ठेवून माध्यमांना प्रसिद्धीस येणाऱ्या मजकुरावर नजर ठेवली वर्तमानपत्रात देखील प्रसिद्ध होणाऱ्या मजकुरावर ,वृत्तावर बारकाईने लक्ष ठेवले सुषमा मोहोळ यांच्या टीमने काम करून प्रशासकीय कामासाठी सहकार्य केले आहे .

माध्यम कक्षाने दिवसभरात घडलेल्या प्रशासनातील घटना घडामोडींना प्रसिद्धीसाठी वर्तमानपत्रांच्या वृत्त संकलन करणाऱ्या वार्ताहरांना बातम्या प्रसिद्धीला दिल्या.निवडणूक कार्यालयावर एक वेगळी छाप करूनदिलीआहे. नायबतहसीलदार सुषमा मोहोड, नरहरी कोलगाने, प्रा. महेश कुलकर्णी, विठ्ठल चंदनकर, विजय शिकारे यांनी लक्षवेधी काम केल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## आनंदाचे डोही

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८



# आनंदाचे गोत्र... मैत्र!

**कृष्ण सुदाम्याची मैत्री युगानुयुगे मानवी मनाला मैत्रीच्या प्रेमळ अनुबंधाने जीवन जगायला शिकवत राहील. मैत्रीत कोणताच भेदाभेद मनाला शिवत नाही. बस्स... एकदा का मैत्रीचे सूर जुळले की जीवनगीत सुमधुर होऊन जाते. वय, प्रतिष्ठा, गरीब, श्रीमंत, लिंग अशा या कोणत्याही अटींची पूर्तता करण्याची गरज मैत्रीला नसते. मित्रमैत्रिणींच्या असण्याने जीवनात बहार येते. टाळी वाजवायला दोन हात हवेतच तसेच, जीवनबागेत आनंदाची फुले डोलायला मैत्रीचे खतपाणी हवेच ना! मैत्रीचा कट्टा यशाचा आनंद दुप्पट नव्हे तर चौपट करतो, सगळ्याच बाबतीत! मित्रमैत्रिणींचा कट्टा म्हणजे आनंद उत्साहाने भारलेले, थुई थुई नाचणारे सप्तरंगी कारंजे म्हणजे जणू ऊर्जाकेंद्रच !**

मैत्र म्हणजे आनंदाचे गोत्र! प्रश्न पडतो टपोरा पावसाचा थेंब की गंधाळलेला शुभ्र मोगरा की हसरा मदमस्त गुलाब म्हणजे असावे का खरेखुरे मैत्र? दोन मनांना आनंदाच्या झुल्यावर झुलवणारा हा आनंद सोहळाच असतो. 'मैत्र' ची व्याप्ती फार मोठी असली तरी मैत्रीच्या रूपात आपल्या जिवाभावाची सोबती असते. काय नसतं हो या मैत्रीत? समुद्राची अथांगता, आकाशाची विशालता, हिमालयाची भव्यता, धरित्रीची सोशिकता, कृष्णाच्या सानिकेची मंजुळता अशा कैक 'ता'तून आयुष्याचा ताल जमून आनंदी सूर आळवल्या जातात या मैत्रीनेच! होय ना! म्हणूनच पावसासारख्या मैत्रीवरच्या कविता बरसत राहतात. स्नेह ओलाव्याने मनामनात आनंदाचे हिरवे पाते चकाकते ठेवतात. एका संवेदनशील मनाच्या कवीच्या,

**दुःख अडवायला उंबऱ्यासारखा,**
**मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा**
**मैत्री चाटते गाय होऊन मना,**
**जा बिलग तू तिला वासरासारखा**

या ओळी समाजमाध्यमावर आपला ठसा उमटवत दरवळत राहतात.

मानवी मनाला नात्याची फार ओढ असते. रक्ताची, मानलेली नाती तर जीवनाचे अविभाज्य घटक असतात. पण, या सगळ्यांत एक अतूट नाते मात्र अगदी खास असते ते म्हणजे मैत्रीचे! बालपण आनंदी, अनुभव समृद्ध करण्यासाठी पिसारा फुलवत खेळ सवंगडी म्हणून मित्रमैत्रिणी जीवनात येतात. नकळतपणे एक लवचिक, चिवट बंध निर्माण होतो. तो आयुष्यभर मोद देत राहतो. कधी प्रत्यक्ष भेटीने तर कधी आयुष्यात प्रत्यक्ष भेट जरी होऊ शकली नाही तरी, त्या आठवांच्या कस्तुरीगंधाने मन उल्हासित होतेच. फुलपाखरासम मस्त मज्जा करीत आनंदी क्षणांचा मकरंद मन चाखू लागतं. जुन्या काळी पुरुषांच्या अशा बालपण ते शेवटपर्यंत टिकण्याऱ्या मैत्रीसाठी 'लंगोटी यार' शब्द त्यांच्या पिढीसाठी भूषण असायचा. पंचक्रोशीतील 'माहेर सासर' यामुळे स्त्रियांचीही भेटीसाठी आसुसलेली मैत्री मुरलेल्या लोणच्यासारखी जीवनात रंगत आणायची. सुखदुःख सांगायला हक्काची जागा म्हणजे मैत्रीण ! मैत्री शब्दातच अनोखी जादू आहे ती अनुभवण्यात समुद्राची गाज आहे आणि तिला प्राजक्ताचा कोमल साज आहे. कृष्ण सुदाम्याची मैत्री युगानुयुगे मानवी मनाला मैत्रीच्या प्रेमळ अनुबंधाने जीवन जगायला शिकवत राहील. मैत्रीत कोणताच भेदाभेद मनाला शिवत नाही. बस्स... एकदा का मैत्रीचे सूर जुळले की जीवनगीत सुमधुर होऊन जाते. वय, प्रतिष्ठा, गरीब, श्रीमंत, लिंग अशा या कोणत्याही अटींची पूर्तता करण्याची गरज मैत्रीला नसते. मित्रमैत्रिणींच्या असण्याने जीवनात बहार येते. टाळी वाजवायला दोन हात हवेतच तसेच, जीवनबागेत आनंदाची फुले डोलायला मैत्रीचे खतपाणी हवेच ना! मैत्रीचा कट्टा यशाचा आनंद दुप्पट नव्हे तर चौपट करतो, सगळ्याच बाबतीत! मित्रमैत्रिणींचा कट्टा म्हणजे आनंद उत्साहाने भारलेले, थुई थुई नाचणारे सप्तरंगी कारंजे म्हणजे जणू उर्जाकिंद्रच !

क्षणात पैजा लावणे, एकमेकांना चिडवणे, खेचणे, सोबतीने नाचणेगाणे, जल्लोष, मौजमस्ती, भटकंती, खादाडी करणे, चित्रपट बघणे असे उत्साही तरंग तर मैत्रीत असतातच. आत्मविश्वास वाढवून महत्त्वाकांक्षेला फुलोरा आणण्याचे सामर्थ्य मैत्रीच्या कुपीत आनंदासोबत गंधाळत राहते. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर मैत्रीचा आश्वासक हात हातात घेत, पुनवेच्या चंद्रसुधेत न्हाहून घेत ते चांदणे जपून ठेवावे. जीवन प्रवासात हा प्रसन्नतेचा गंध भरून घ्यावा अन् मग सांजवेळी 'नाव मित्रांचे ओठी... हळव्या त्या भेटीत तुष्टता मोठी!' या अनुभवाने आनंदाच्या डोही डुंबत रहावे, असे भाग्य आजच्या सोनरुपेरी वयातील मैत्र जपणाऱ्यांना लाभत आहे. त्यांच्यासाठी या आधुनिक युगातील 'रियुनियनचे वारे ... आनंदाने उधाणतात मनाचे गाभारे!' ही अशी वार्धक्यात अचानक खूप वर्षांनी होणारी पुनर्भेट त्यांच्याकरता आनंद, उत्साहाची सळसळती लाट ठरणार नाही तर काय? सांजसावल्या भिववण्यापेक्षा मैत्रीच्या कोवळ्या किरणांनी पुन्हा ते टवटवीत होत आहेत. दुःखाच्या क्षणी मित्रमैत्रिणींचे अस्तित्व जखमेवर चंदन लेपाचे काम करून जाते. अवतीभोवती मैत्रीचे काजवे चमचमते असले की, मनाचे दुखणे आपोआप बसून जाते. वय होऊनही वेदनाशामक गोळ्या न घेताच चार पावलं सहज धावल्या जातं तेव्हा लक्षात येतं,'मित्रांच्या संगतीने वाढूनी सकारात्मकता... मनी फुलते आनंद लता!' मैत्री असे संगीत आहे ज्याने, जीवनात अखंड चैतन्याची बरसात होत राहते. या मैत्रबनातील आनंदाची प्रसन्न झुळूक मनाला स्पर्शून जीवन वाट खचितच सुकर करते.

## याला जीवन ऐसे नाव!



रश्मी जोशी/९३२५७६३००३

अजूनही आठवतो मला १९७४ चा तो दिवस! आमचे पोस्टींग आसामच्या जोरहाटमध्ये होते. सकाळचे ६ वाजले होते. कोवळं, स्वच्छ, सोनेरी ऊन पण तरी मंद, थंड वारं सुटलं होतं. अगदी प्रसन्न अशी सकाळ होती आणि रोजप्रमाणे गिरीश फ्लाईंगला जायला निघाले. ते गेल्यानंतर मी रेडीओ सिलोन लावून गाणी ऐकत घरकामं आटोपली, स्वयंपाकही झाला. पण, साडे बारा-एकच्या सुमारास एकदम सगळीकडे अंधार पसरला. आभाळ भरून आलं आणि माझ्या काळजाचा ठोका चुकला. जोरदार पाऊस सुरू झाला आणि वीज गेली.

आम्ही तिथे एका तात्पुरत्या घरात जे पाडायला अगदी तयार होतं, अशा घरात रहात होतो. आम्हाला ३-४ महिन्यांत चांगलं घर मिळणार होतं. आत्ताचं हे घर अगदी जुन्या पद्धतीचं होतं. घराच्या सभोवती एलिफन्ट ग्रास होती आणि टॉयलेट घराच्या मागे १५-२० फूटांवर होतं. तिथपर्यंत जाण्यासाठी दोन-दोन विटा ठेवून पायवाट बनवली होती. साप आणि जळवा यांचं तर ते नैसर्गिक निवासस्थानच होतं. जीव मुठीत धरून आम्ही अंधारलेल्या घरात बसून होतो.

गिरीश दररोज दोन-अडीच वाजता जेवायला येत असत. पण, आज साडे चार वाजून गेले तरी त्यांचा काही पत्ता नव्हता. दरम्यान, पाऊस थोडा कमी झाला. गिरीशसोबतच काम करणारा फ्लाईट लेफ्टनंट आहुजा त्याच्या बायकोला घेऊन आला. 'तू रश्मी के पास रूक, मै आता हूं' असं म्हणून घाईघाईने निघूनही गेला. मी तिला विचारलं,'इतक्या पावसात हा घरी कसा आला?' ती म्हणाली की,'त्याला बरं नसल्यामुळे तो सुटीवर होता.'

'मग, आज बरं नसतानाही इतक्या पावसात घाईने गेला कुठे?' मला धडधडत होतं. ती म्हणाली,'अगं, ऑफीसमध्ये बोलावलं आहे त्याला! आज सकाळी ड्रॉपिंगला गेलेल्या ५ विमानांपैकी चारच विमानं परत आले आहेत. कोणतं तरी एक विमान आलेलं नाही.' पण, कोणाचं विमान आलं नाही? हे काही तिला माहिती नव्हतं. फोन पण नव्हता. नुसतं वाट बघत बसण्याशिवाय आम्हा दोघींच्याही हाती दुसरं काहीच नव्हतं. मनात नुसता गोंधळ सुरू होता. पाऊस कमी-जास्त सुरूच होता.

रात्री ९ वाजताच्या सुमारास गिरीश आणि आहुजा दोघेही घरी आलं. मला तर हसावं की रडावं ? कळतंच नव्हतं. फ्लाईट लेफ्टनंट विजूरावचं विमान परत आलं नव्हतं. गिरीशनं बाहेर जाऊन लाईटची तार हलवली आणि वीजपुरवठा सुरू झाला. सर्वांनाच भूक लागली होती. मी पटापट काकड्यांचे थालीपीठ बनवून जेवायला वाढलं. आपण आज दिवसभर जेवलेलो नाही, हे आम्हाला दोघींनाही लक्षातच आलं नव्हतं. जेवून आहुजा पती-पत्नी निघून गेले. आम्ही दोघंही झोपू शकलो नाही. विजू रावला ३ वर्षांचा मुलगा होता आणि त्याची बायको दुसऱ्यांदा ५ महिन्यांची गरोदर होती.

नंतरचे ३ दिवस सतत पाऊस पडत होता. विजू रावच्या विमानाचा शोध सुरूच होता. चंदीगडहून खास हेलिकॉप्टर मागविण्यात आलं आणि त्या वाईट हवामानातही शोध सुरूच होता. तिसऱ्या दिवशी त्यांच्या विमानाचे अवशेष सापडले. त्यांचं विमान पहाडांवर आपटून जळलं होतं. त्यात असलेले सर्वच लोक गेले होते. नंतर, कुठे हात, कुठे डोकं तर कुठे पाय विखुरलेले सापडत राहीले. मिळालेले अवयव गोळा करून आणून, वेगवेगळ्या पेट्यांमध्ये ठेवले. त्या पेट्यांवर गेलेल्या लोकांची नावं टाकली होती.

माझ्या मनात विचारांचं काहूर माजलं होतं. मन सैरभैर झालं होतं. या घटनेच्या ३-४ दिवस आधीच मेसमध्ये गेट टूगेदर झालं होतं. गिरीश नाईट फ्लाईटला गेले होते. मी आणि माझा छोटा मुलगा सपन, आम्ही दोघं घरीच होतो. मला एकटीला जायची इच्छा नव्हती. तेव्हा हाच विजू राव मला घ्यायला घरी आला होता. वादळासारखा घरात आला आणि म्हणाला,'रश्मी, लवकर तयार हो. सपनचे कपडे वगैरे दे. त्याला मी तयार करतो.' अगदी हक्काने, आग्रह करून आम्हाला तो घेऊन गेला. छान गप्पा-गोष्टी करत, तो कार्यक्रम पार पडला. गिरीशचे हे सगळे मित्र मला चिडवत होते की, तो नाईट फ्लाईटला वगैरे गेला नाही तर, डेटवर गेला आहे. मी म्हटलं, लग्न करून आणलंय मला! जाईल कुठे, येईल परत माझ्याकडे! तर, विजू राव म्हणाला,'अरे. आजचा दिवस आपला आहे. मस्तीत जगून घ्या. उद्याचा दिवस कोणी बघितला आहे?'

अपघाताला आता ७ दिवस होऊन गेले होते. पेट्यांवर सारखे युडी कोलन टाकत होते. विजू रावच्या बायकोचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता. 'मला माझ्या नवऱ्याचा चेहरा एकदा तरी दाखवा,' म्हणून आक्रंदत होती. तिच्या लेकराला तर काहीच समजत नव्हतं. भयंकर परिस्थिती होती. तिला कोण, काय आणि कसं समजावणार होतं? पाऊस थांबायचे नाव घेत नव्हता. सगळं वातावरण कुंद झालं होतं. तिचा टाहो ऐकून देवही जणू रुदन करीत होता.

इतक्या पावसात विजू रावच्या पार्थिवाला मानवंदना झाली. आज या घटनेला ५० पेक्षा जास्त वर्षे झाली. पण, ही घटना एखाद्या चित्रपटासारखी डोळ्यांसमोर घडते.

## ब्रॅण्ड स्टोरी

निकिता गावंडे / ९९७०६६३८१३

# द अँग्री यंग मॅन

'साहिल, ७० चे दशक हे साम्यवादाच्या व कामगार चळवळींच्या उदयाचे दशक होते,' बाबांनी माहिती सांगायला सुरुवात केली. 'तू जुने हिंदी सिनेमे पाहिले असशील. त्यात हिरो म्हणून भांडवलदारांच्या अत्याचाराशी दोन हात करणारा, वेळप्रसंगी उपासमार सोसणारा, अन्यायाविरुद्ध लढणारा नायक जनमानसासमोर उभा केला जात असे. सर्वांचीच सहानुभूती कामगारांच्या बाजूने असे. भांडवलदार म्हणजे अन्याय करणारा वर्ग हे जणू समीकरण झालेले होते. याच काळात कलकत्त्यासारख्या साम्यवादी विचारसरणीचे अनुसरण करणाऱ्या शहरात, जिथे कामगार चळवळ, युनियन, संप, मोर्चे हा जीवन पद्धतीचाच एक भाग होता तिथे, बिझनेस उभा करणे ही काही साधी गोष्ट नव्हती. लहान सहान कारणांसाठी कामगारांनी केलेले संप, कामाच्या वेळाकरीता, सोयीसुविधांकरीता सतत होणारी आंदोलने ही मालक वर्गाकरिता एक डोकेदुखीच होती. भांडवलदारांच्या घराभोवती घेराव घालून धरणे, आंदोलन करणारे कामगार आणि स्वतःच्याच घरात स्थानबद्ध असल्याप्रमाणे असलेले कंपनी मालक हे दृश्य काही कलकत्ता शहराला नवीन नव्हते. बाप रे! खरं आहे हे! सिनेमा पाहताना आपण मजुरांच्याच बाबतीत विचार करतो. कधी मालकाच्या बाजूने विचार केला जात नाही. पण, प्रत्येक गोष्टीच्या दोन बाजू असतात हे विसरून चालत नाही. साहिल अगदी विचारपूर्वक बोलला. अगदी बरोबर साहिल! अशाच प्रकारच्या हिंसक संपाचा अनुभव १९७५ साली अग्रवाल परिवारालाही आला. हिंसक जमावाने घराला घातलेला घेराव, तुटलेले वीज व फोनचे कनेक्शन! ४८ तास बाहेरच्या जगाशी तुटलेला संपर्क, मिनटामिनटागणिक तीव्र होत जाणारे घोषणांचे आवाज... रात्रीच्या भयाण अंधारातही मालक वर्ग हा रक्तपिपासू आहे, त्यांना ठार मारा असे कामगारांकडून येणारे चित्कार! त्यात बघ्याची भूमिका घेणारे तटस्थ पोलीस व प्रशासन, या सर्व परिस्थितीत उदय झाला, एका अँग्री यंग मॅनचा! सतरा वर्षांचा कोवळा तरुण प्रभू अग्रवाल! या अशा भयावह अनुभवानंतर त्याचा कामगारांवरचा विश्वास पूर्णपणे उडाला. बंड कुठलेही असो सर्व शक्तीनिशी ते चिरडून टाकले पाहिजे, ही विचारसरणी त्याच्या कोवळ्या मनात घट्ट रुतून बसली. पण, वडील रमेशलाल अग्रवाल मात्र धंद्यात पूर्णपणे मुरलेले एक परिपक्व व्यक्तिमत्त्व होते. ही सर्व परिस्थिती संयमाने हाताळताना त्यांनी या खवळलेल्या तरुण रक्तालाही सांभाळले. प्रभू याच्या रागाविषयी अनेक किस्से सांगितले जातात. एकदा एका कामगाराने काम करण्यास नकार दिला असता त्याच्याशी झालेली, शाब्दिक बाचाबाची हाणामारीत परिवर्तित झाली. ठोशास ठोसा लगावण्यास मागेपुढे पाहिल तो प्रभू कसला! एकदा काही गावगुंडांची टोळी रेस्टॉरन्टमध्ये शिरली. मिठायांचा भरपूर आस्वाद घेऊन, त्यांनी पैसे देण्यास नकार दिला. अगदी साऊथकडच्या सिनेमात दाखवतात तशी मारामारीकरीता परफेक्ट सिच्युएशन तयार झाली. प्रभू ठरला रेस्टॉरन्टचा मालक! कामगारांना किंवा बाऊन्सर्सला ऑर्डर सोडून, तो सहज बाजूला होऊ शकला असता. पण, आपल्या या हिरोने या लढाईचे सेनापतीपद स्वीकारले. तीनशे लोकांच्या स्टाफसहित तो हॉटेल बाहेर पडला आणि शिरलेल्या गुंडांची बाहेरून कोंडी केली. हाणामारीला सुरुवात झाली. शेवटी, पोलीस कंप्लेंटदेखील झाली. पण, सर्वांची सहानुभूती प्रभूच्या बाजूने असल्याने त्याचे फारसे नुकसान झाले नाही.

'साहिल, काही लोक हे अनप्रेडिक्टेबल असतात. कोणत्या वेळी ते कसे वागतील, कुठली परिस्थिती कशी हाताळतील, त्याचा कयास बांधणे शक्य नसते. प्रभूदेखील याच प्रकारचा! टोकाची भूमिका घेण्याच्या स्वभावामुळे त्याचे जीवन तुम्हा तरुण लोक काय जो शब्द वापरतात तसे हॅपनिंग होते. हल्दीराम्स प्रभुजी हा त्याचा ब्रँड! काजू कतली आणि काजू बर्फी या दोन मिठाया ही त्याची खासियत होती. काजू बर्फीकरिता विलायची व काजू कतलीकरिता भरपूर प्रमाणात केसर वापरले जात असे. एकदा काय हे दोन्ही जिन्नस एकमेकांशेजारी ठेवले असता, एका कामगाराने अनवधानाने ते दोन्ही जिन्नस काजू कतलीच्या मिश्रणात टाकले. शेकडो टन मिठाई अक्षरशः वाया गेली. आता यावर मालक काय प्रतिक्रिया देईल? याच्या नुसत्या विचारानेच सर्वांना थरकाप सुटला. सर्व फॅक्टरीत स्मशान शांतता पसरली. संथपणे पाऊले टाकत प्रभू आत आला. त्याने त्या कामगाराच्या हलकेसे थोपटत त्याला त्याची चूक समजावून सांगितली. पुन्हा कधीही असे न करण्याचे त्याला बजावले तसेच, सुपरवायझरलाही विलायची व केसर पुन्हा कधीच एकमेकांजवळ ठेवणार नाही, याची खबरदारी घेण्याविषयी सांगितले.' 'जीव भांड्यात पडला, असे जे म्हणतात. त्या म्हणीचा अर्थ त्या बिचाऱ्या कामगाराला त्यादिवशी कळला असेल,'साहिल हसत म्हणाला. त्या काळातील मीडियाने, त्याच्या काही हितशत्रूंनी त्याचे चित्र प्रतिनायक अर्थात अँटी हिरोचे रंगवले होते. पण, याच प्रतिनायकाने आपल्या कामगारांसाठी एयर कंडीशन किचन बनविले. तीन वेळची विनामूल्य जेवणाची सोय केली. तसेच, उत्तम आरोग्याच्या सोयी सुविधादेखील पुरवल्या.




१९७५ च्या संपाच्या परिणामातून सावरायलाच जवळपास २५ वर्षे लागली होती. आता कुठे धंदा पाहिजे, तसे मूळ धरू लागला होता. इतक्यात संपूर्ण देशात तसेच अग्रवाल परिवारातही एक धक्कादायक घटना घडली. तो दिवस होता २१ मे १९९१! अग्रवाल परिवारात एक अनपेक्षित घटना घडली होती. प्रभू यांचे धाकटे बंधू रवी अग्रवाल आपल्या पत्नीसह प्रवासावर असताना एका कार अपघातात पत्नीसह त्यांचे दुर्दैवी निधन झाले. दोन्ही मुले थोडक्यात बचावली होती. वडील रमेशलाल यांच्याकरिता हा धक्का जबरदस्त होता. पुढे दोनच दिवसात त्यांची प्राणज्योत मालवली.

'साहिल, व्यापारातील मोठमोठे धक्के या माणसाने शांत डोक्याने पचवले असतील, डोळ्यांदेखत पोटचा गोळा गमावून बसणे, हे दुःख जीवघेणं असतं बघ!' बाबा भरल्या डोळ्यांनी बोलले. जड अंतःकरणाने सर्वजण तिथून निघून गेले पण, पुढे काय झाले असेल की, उत्सुकता मनात ठेवूनच!

## गझल आरस्पानी

गझलनंदा / ८४२२०८९६६६

# कळले तुझे घराणे...



नमस्कार... मागच्या शनिवारी गझल मुशायऱ्यातील सूत्रसंचालकाची भूमिका या विषयावर आपण बोललो. मुशायऱ्यासाठी एक अध्यक्ष, त्यांच्या ज्येष्ठतेप्रमाणे नियुक्त केले असतात. त्यांच्या परवानगीने मुशायरा सुरू होतो. त्यांची भूमिका ही असते की, त्यांनी पूर्ण गझल ऐकल्यानंतर त्यावर बोलावे. दरम्यान, काही टिपणे काढावीत. काही शेर लिहून ठेवावेत. गझलकाराने गझल सादर केली तेव्हा, खास काय आवडले, कुठल्या जुन्या नव्या गझलकाराची आठवण झाली? मुशायऱ्यात काय आवश्यक आहे, काय नाही या संबंधी विवेचन करावे. सर्वच संमेलनात किंवा सभांमधे अध्यक्षीय भाषण हे शेवटीच असतं. सर्वांचे ऐकून त्याचा गोषवारा सभेला देणे, हेच अध्यक्षांचे प्रमुख काम असते.

**जर काही हजार रुपये खर्च करून गझलकार फक्त एका मुशायऱ्यासाठी जात असेल आणि त्याला आपली कला सादर करता येत नसेल, तर ते नाराज होणारच. यातूनच साहित्य प्रांतात पुढलं महाभारत घडत असतं. मी आत्तापर्यंत जे सांगितलं ते, ९ ते १० लोकांच्या मुशायऱ्याबद्दल! पण, सध्याचा जर मुशायरा बघितला तर त्यातली संख्या हातापायाची बोटे दोनदा मोजली तरी कमी पडतील एवढी असते.**

पण, असं घडतं का? बऱ्याच मुशायऱ्यात (कविसंमेलनातसुद्धा) आपण बघतो की, संपूर्ण मुशायरा सूत्रसंचालकाने व्यापलेला असतो. त्यामुळे, दोन तासांच्या अवधीत शेवटची दोन/चार मिनिटे अध्यक्षांना मिळतात. त्यांना आपली गझलही सादर करायची असते. अशावेळी उत्तम मार्ग म्हणून झालेल्या गझलांवर काहीही भाष्य न करता, आपली एखादी गझल म्हणून अध्यक्ष मुशायरा संपवतात. कधी कधी संमेलनात दुसरा मुशायरा सुरू होणार असतो किंवा श्रोत्यांना निघायची घाई असते.

याउलट असंही घडतं की, अध्यक्ष आपले भाषण मुशायरा सुरू होण्याआधीच करतात. त्यांना ठाऊक असतं की, आपल्याला नंतर वेळ मिळणार नाही. शेवटी एखादी गझल म्हणतात. बस! पण, यावेळी दोन तासांपैकी अर्धा तास तरी अध्यक्षच घेतात. यात त्यांनी कुणाच्याही गझला ऐकलेल्या नसल्याने काही जुन्या नव्या लोकांचे तुरळक शेर ऐकवून 'मी, मी आणि मीच' ही भूमिका घेत स्वतःच्याच पाच-सहा गझला म्हणण्याचे स्वातंत्र्य घेतात. वरून 'मुशायऱ्याचा अध्यक्ष' या नात्याने मी हे स्वातंत्र्य घेतोय,' असेही सांगतात. मात्र, इतर गझलकार/श्रोते यांची चुळबुळ यावेळी वाढलेली असते. कुठून यांना अध्यक्ष केले, असेही आयोजकांना वाटून जाते. त्यामुळे, या सर्व बाबतीत सुवर्णमध्य काढणे गरजेचे असते. अध्यक्ष, सूत्रसंचालक आणि गझलकार यांनी आपापल्या भूमिकांना जर योग्य न्याय दिला तर मात्र, हे मुशायरे अतिशय रंजक आणि दादलेवा होतात, यात शंका नाही.

आता जरासे गझलकारांबद्दल! मी आधीच्याच लेखात सांगितले की, मुशायऱ्याला किती वेळ दिलेला आहे, हे बघूनच गझलकारांची संख्या ठरवावी. पण, असं सहसा घडत नाही. जास्तीत जास्त लोकांना संधी देताना, मुशायऱ्यात कुठेतरी विस्कळीतपणा येतो. उदाहरणच बघू या ! मुशायऱ्यात गझल विविध प्रकारे सादर केली जाते. सुरुवातीला सूत्रसंचालकाकडून सांगितले जाते की,'गझलकाराने एक मतला, दोन शेर आणि आपली एक गझल घ्यावी,' वगैरे सुरुवातीचे दोनचार गझलकार आपापल्या गझल सादर करतात. आधी आपला बऱ्यापैकी परिचय देतात. गझलेची छानशी प्रस्तावन करतात. सादरीकरण सुरू करतात. त्यातही एक मतला, दोन शेर सादर केल्यावर श्रोत्यांकडून 'मुकर्रर' (वन्समोअर) अशी दाद येते. मग पुन्हा ते तीन शेर सादर होतात. नंतर, मुख्य गझल घेतली जाते. ती बऱ्यापैकी नऊ किंवा अकरा शेरांची असते. त्यातही, वन्स मोअर मिळाला की गझल आणखी लांबते. त्यातच काही 'उत्कृष्ट गझल गायक' तरन्नुममध्ये म्हणजे गाऊन गझल सादर करतात. अध्येमध्ये ताना आलापींची भेंडोळी असतेच. त्यात एकेक गझलकार दहा ते पंधरा मिनिटे घेतो. आजकाल त्या सादरीकरणाचे लाईव्ह आणि फोटो सुरू असतात. त्यातही वेळ निघून जातो.

मोजकेच २-३ गझलकार झालेले असतात. बाकीच्या लोकांची चुळबुळ सुरू झालेली असते. मग सूत्र संचालक सांगतात की,'गझल घेण्यापूर्वी प्रस्तावना करू नका.' तरीही वेळेचं गणित जमत नाही. मग घोषणा होते की,'गझल फक्त पाचच शेरांची घ्या.' घड्याळीचा काटा विमानाच्या वेगाने पुढे सरकत असतो. आयोजकांकडून चिठ्या येऊ लागतात लवकर आवरा म्हणून! सूत्रसंचालकाची जबाबदारी वाढत असते. आधीची दिरंगाई अंगाशी येते. अध्यक्षांचं भाषण व्हायचं असतं. त्यातच आयोजकांकडून नेमक्या दोन-तीन गझलकारांची वेळेवर शिफारस येते. आधीचे लोक अजून बसलेले असतात आणि नवे लोक आपली गझल सादर करून चालते होतात. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात पुन्हा एकदा घोषणा होते की,'गझलकारांनी एक मतला दोन शेर घेऊ नयेत. फक्त पाच शेरांची गझलच सादर करा. घाई करा, गर्दी करा! परिचय, प्रस्तावना करू नये वगैरे!

जर काही हजार रुपये खर्च करून गझलकार फक्त एका मुशायऱ्यासाठी जात असेल आणि त्याला आपली कला सादर करता येत नसेल, तर ते नाराज होणारच. यातूनच साहित्य प्रांतात पुढलं महाभारत घडत असतं. मी आत्तापर्यंत जे सांगितलं ते, ९ ते १० लोकांच्या मुशायऱ्याबद्दल! पण, सध्याचा जर मुशायरा बघितला तर त्यातली संख्या हातापायाची बोटे दोनदा मोजली तरी कमी पडतील एवढी असते. तिथली परिस्थिती काय वर्णावी? हाच भाग क्रमशः पुढील वेळी! आता नेहमीप्रमाणे माझीही एक गझल!

### खर्जातले उखाणे


हे ओठ का म्हणू मी प्रेमामधील गाणे,
ओठी जुळून आले शब्दांविना तराणे
लय अंतरात होती हृदयात ताल होता,
ख्यालात षड्ज घेई खर्जातले उखाणे
मन मोरपंख झाले आषाढ धुंदलेला,
पाऊस बोलताना कळले तुझे घराणे
भेटीत प्रेमिकांच्या मधुगंध केवड्याचा,
मारवा तिथे विसावे गंधाळल्याप्रमाणे
नाही कधीच केली प्रणया मधे उधारी,
विळख्यात रात्र गेली निसटून कोण जाणे

## बेटर हाफ

सोनाली ठेंगडी / ७७५५९३८८२२

# विक्रमवीराची हिट विकेट घेणारी रोमी

कपिल देव यांच्या पत्नीचे नाव रोमी भाटिया. असे म्हणतात की, रोमी कपिलच्या आयुष्यात येण्यापूर्वी अभिनेत्री सारिकासोबत त्याचे प्रेमप्रकरण चर्चेत होते. दोघांचे प्रेम लग्नापर्यंत येऊन ठेपले होते. कपिलने आपल्या आई-वडिलांना बोलावून सारिकाची भेटही घडवून आणली होती. दरम्यानच्या काळात कपिलच्या जीवनात रोमीची एंट्री झाली. पहिल्या नजरेत कपिल रोमीच्या प्रेमात पडले होते. कपिलचा अतिशय जवळचा मित्र सुनील भाटिया याच्यामुळे ही भेट घडून आली होती. पहिल्या नजरेतील हे प्रेम व्यक्त करण्यास मात्र, कपिलला एक वर्ष लागले.



आज मध्यम वयात असलेल्या क्रिकेटप्रेमींचा आवडीचा क्रिकेटपटू कोण तर त्यात सुनील गावस्कर, कपिल देव, दिलीप वेंगसरकर आदींची नावे येतील. त्यातही कपिल देव हे नाव सर्वांना आजही परिचित आहे. कारण काही वर्षांपूर्वी त्यांच्यावर एक चित्रपटही आला होता. त्यात रणवीरसिंह आणि दीपिका यांनी काम केले होते. १९८३ मध्ये भारताला विश्वचषक मिळवून देणाऱ्या या कर्णधाराची अजोड कामगिरी सर्वांसाठी अभिमानाचा विषय आहे. एक स्वच्छ मनाचा, साधा, सरळ आणि ज्याला खऱ्या अर्थाने जट यमला म्हणता येईल असा खेळाडू म्हणजे कपिल देव. त्याला इंग्रजी फारसे येत नव्हते. त्यामुळे तर त्याच्या इंग्रजीविषयीचे धम्माल किस्सेही प्रसिद्ध आहेत. मात्र, त्याहीपेक्षा विशेष आहे त्यांची लव्हस्टोरी.

कपिल देव यांच्या पत्नीचे नाव रोमी भाटिया. असे म्हणतात की, रोमी कपिलच्या आयुष्यात येण्यापूर्वी अभिनेत्री सारिकासोबत त्याचे प्रेमप्रकरण चर्चेत होते. दोघांचे प्रेम लग्नापर्यंत येऊन ठेपले होते. कपिलने आपल्या आई-वडिलांना बोलावून सारिकाची भेटही घडवून आणली होती. दरम्यानच्या काळात कपिलच्या जीवनात रोमीची एंट्री झाली. पहिल्या नजरेत कपिल रोमीच्या प्रेमात पडले होते. कपिलचा अतिशय जवळचा मित्र सुनील भाटिया याच्यामुळे ही भेट घडून आली होती. पहिल्या नजरेतील हे प्रेम व्यक्त करण्यास मात्र, कपिलला एक वर्ष लागले.

### धावत्या रेल्वेत केले प्रपोज

कपिल आणि रोमी एकमेकांच्या जवळ यायला लागले होते. मात्र, कपिल यांना रोमीला प्रपोज करण्यासाठी बरीच हिंमत गोळा करावी लागली. एकदा एक रेल्वे प्रवास सोबत करत असताना अगदी फिल्मी पद्धतीने कपिलने रोमीला प्रपोज केले. रेल्वेच्या खिडकीतून रोमी बाहेर पाहात असताना एका पोस्टरवर एक जाहिरात दिसली. त्यात कपिल देव हसताना दिसत होता आणि त्याच्या दाताला बटर लागले होते. ती जाहिरात पाहून कपिल देव म्हणाले, तुला या जाहिरातीचा फोटो काढायचा आहे का? हा फोटो आपण नंतर आपल्या मुलांना दाखवू.

कपिलचे हे वाक्य ऐकताच रोमी लाजली आणि म्हणाली, तू मला प्रपोज करतो आहेस का? त्यावर कपिलने हो म्हटले आणि शुभमंगल ठरले.

लग्नापूर्वी कपिलने रोमीला १९७९ मध्ये मॅच पाहायला बोलावले. तेव्हा वेस्ट इंडिजसोबत कसोटी सामना सुरू होता. त्या सामन्यात कपिलने पहिल्यांदा कसोटीतील शतक झळकवले होते. त्यानंतर १९८० मध्ये लग्न ठरले. मात्र, हा प्रवास इतका सोपा नव्हता. रोमीच्या वडिलांना लग्नासाठी तयार करण्यात कपिलला काहीही कष्ट पडले नाहीत. पण रोमीचे आजोबा फारच चिकित्सक होते. त्यांनी कपिलला इतके प्रश्न विचारले की रोमीला प्रपोज करण्यापेक्षाही त्यांच्या परीक्षेत उत्तीर्ण होणे कठीण असल्याचे कपिलला वाटले होते. तरीही शेवटी हे नाते जुळलेच.

कपिल देव आपल्या लेटलतिफीसाठी फारच चर्चेत असायचे. स्वतःच्या लग्नातच ते उशिरा पोहोचले होते. त्यावर ते सांगतात की, तसेही पंजाबी लोकांचे लग्न वेळेत कधीच लागत नाही. नाचगाण्यात इतका वेळ जातो की वेळेत कधीच लग्न लागत नसतात. मग मला थोडा उशीर झाला तर त्यात काहीही बिघडले नाही.

### 'तो' आनंदाचा क्षण अनुभवलाच नाही!

भारताला विश्वचषकाचे सुख मिळवून देणाऱ्या कपिल देवच्या टीमचे जिंकणे हा देशासाठी फार मोठा अभिमानाचा आणि अत्यानंदाचा क्षण होता. मात्र, जिंकण्याच्या थोड्या वेळापूर्वी सामना इतका गंभीर बनला होता की, आता आपण हरणार की काय या विचाराने रोमी आणि मदन लाल यांच्या पत्नी अनु दोघीही मॅच सोडून हॉटेलमध्ये परतल्या. हॉटेल स्टेडियमच्या जवळच होते. त्यामुळे भारत जिंकत असताना हल्लकल्लोळ ऐकताच त्यांनी खोलीतला टीव्ही लावला आणि समोर कपिलने रिचर्डसचा झेल टिपला हा क्षण पाहिला. भारताच्या विजयाचा हा क्षण पाहताच दोघीही अक्षरशः खोलीतील पलंगावर उभ्या राहून आनंदाने नाचायला लागल्या. त्यांनी लगेचच स्टेडियमच्या दिशेने धाव घेतली. मात्र, तोवर गर्दी इतकी वाढली होती की त्या दोघीही शेवटपर्यंत स्टेडियममध्ये पोहोचू शकल्या नाहीत. कपिल देव यांनी विजयानंतर रोमी बसली होत्या त्या दिशेने शॅम्पेन स्प्रे केली होती. मात्र, तिथे ती नव्हतीच. नंतर जेव्हा दोघांची भेट झाली तेव्हा रोमी यांना हिरमुसल्यासारखे वाटले. इतक्या महत्त्वाच्या क्षणी आपण हजर नव्हतो, याचे शल्य आजही त्यांच्या मनात कायम आहे.

### सोळा वर्षांनी कन्यारत्न

लग्नानंतर सोळा वर्षांनी या जोडप्याला कन्यारत्न झाले आणि तिचे नाव अमिया असे ठेवण्यात आले. अतिशय लाडात वाढलेली अमिया स्वभावाने अतिशय शांत आणि प्रसिद्धीच्या झोतापासून दूर राहणारी आहे. तिचे तिचे सोशल मीडिया प्रोफाईलदेखील लोकांपासून लपवूनच ठेवले आहे. मात्र, ती अतिशय गुणी मुलगी असून कपिल देव यांच्यावरील '८३' या चित्रपटात तिने सहायक दिग्दर्शक म्हणून भूमिका वठवली होती.

लग्नानंतर कपिल देव सातत्याने दौऱ्यावर असायचे. या दौऱ्यादरम्यान सुरुवातीच्या काळात रोमी त्यांच्यासोबत असायच्या. मात्र, नंतर त्यांनी आपला स्वतःचा व्यवसाय सांभाळण्यावर लक्ष केंद्रित केले.

त्या यशस्वी बिझनेसवुमन आहेत. शिवाय उत्तम इंटेरियर डिझायनरही आहेत. विशेष म्हणजे, नवऱ्याचे किंवा त्यांचे यश कधीही त्यांच्या वागणुकीतून झळकले नाही. अतिशय विनम्र आणि शांत स्वभावाच्या रोमी यांनी कायमच घराचा डोलारा उत्तमरीतीने सांभाळला. तिने घर नीट सांभाळल्यामुळेच मी क्रिकेटच्या मैदानावर लक्ष केंद्रित करू शकलो, अशी कबुली कपिल देवही देतात. म्हणूनच त्यांची जोडी आजही क्रिकेट जगतातील नव्या जोडप्यांसाठी आदर्श आहे. आपल्या प्रदीर्घ क्रिकेट कारकीर्दीत एकही नो बॉल न देणाऱ्या या विक्रमवीराच्या प्रेमाची हीट विकेट रोमीने अतिशय शांतपणे हाताळली. कदाचित त्यांच्यासाठीच म्हटले असावे की....

*इश्क का तेरे यकीन बन जाऊं*
*दर्द में तेरे सुकून बन जाऊं*
*तुम रखो कदत जिस जगह पर भी*
*खुदा करे मैं वो जमीन बन जाऊं....*

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/ ७८२१८१६४८५

# रानातील बहुगुणी पानं

माणूस असा एक प्राणी आहे की, त्याला सर्वच वस्तूंची आवश्यकता पडत असते. अन्न कितीही मिळत असेल तरी त्याला कमीच असते ही आजची वास्तविकता आहे. आपले आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी काय खाल्ले जात नाही? फळे, भाजी, रानातील भाज्या, फुले अन् बरेच काही! त्यात बाजारात मिळणारे पानंसुद्धा आवडीने खाल्ले जातात. काही जणांना तर पानं खाण्याची सवय असते तर कोणी औषधी म्हणून खात असतात. रानातील काही बहुगुणी पानंसुद्धा आहेत की, गेल्या काही वर्षांत त्यांचा उपयोग केला जात असायचा. त्यामधून, स्थानिकांना आर्थिक मदतसुद्धा होत असे. एवढेच नाही तर, त्या पानांपासून कोणतेही दुष्परिणाम होत नव्हते म्हणून आधीचे माणसं धडधाकट व निरोगी दीर्घायुष्य जगताना दिसत होते.



रानातील गुणकारी पानांविषयी जाणून घेऊ या. रानात मिळणा?या भाज्या, फळे, फुले खाल्ली जातात पण,पानं खाल्ली जात नाही तर त्याचा उपयोग जेवण करण्यासाठी केला जातो.? त्या पानांची नाव येणेप्रमाणे पळसाची पानं,माहुरची पानं, चाराची पानं, कुड्याची पानं, घोगराची पानं तसेच मोहाची पानं ह्या सहाही झाडांच्या पानाची पत्रावळ व द्रोण बनविले जातात. झाडीबोली भाषेत 'पत्राळ' असे म्हणतात तसेच द्रोण साहित्याला 'डोना' असे म्हणतात. हे सहाही झाडांची पानं फार गुणकारी आहेत. गेल्या काही वर्षाआधी गावखेड्यातील लोक पत्रावळ बनविण्याचा धंदा करत असत आणि ते जमा झालेले पत्रावळ व्यवस्थितपणे सांभाळून ठेवत असत. गावखेड्यात कोणताही कार्यक्रम असला की, त्या कार्यक्रमात जेवणासाठी फक्त, रानातील पानांपासून तयार झालेल्या पत्रावळ याचा उपयोग केला जात असे. त्या पत्रावळमुळे आरोग्याला कोणतीही हानी पोहेचत नव्हती. एवढेच नाही तर ह्या धंद्यामुळे त्यांना आर्थिक मदत सुद्धा मिळत होती. सध्याच्या घडिला बघितले तर पानांची पत्रावळ तसेच लहान असलेला द्रोण कदाचित सणाच्या निमित्ताने देवाला नैवध्य दाखविण्यासाठी केला जातो. तर कोणी ती पत्रावळ विकत आणतात आणि त्यात नैवेद्य ठेवून देवासमोर ठेवतात. पण, कार्यक्रमात मात्र पानाच्या पत्रावळीत जेवण करताना कोणीही दिसत नाही.

दिवसेंदिवस प्लास्टिकचा वापर जास्त वाढल्यामुळे कोणत्याही कार्यक्रमात जेवणासाठी प्लास्टिकची पत्रावळ दिसत असते.त्यात एक गोष्ट वेगळी अनुभवायला मिळते की जेव्हा, ती प्लास्टिकची पत्रावळ जेवणाकरीता वाढली जाते त्यावेळी तिचा खूप खराब वास येतो. तिच्यात जेवण करण्याची इच्छा होत नाही असे अनेक जण म्हणतात तरीही आजकाल तिचेच प्रमाण जास्त वाढत चालले आहे. जेव्हा तिचा वास एवढा खराब येतो तर कदाचित तिच्यात जेवण केल्यावर शरीराला सुद्धा कुठेतरी हानी पोहेचत असावी असे म्हणायला काहीच हरकत नाही. पण,तीच पानांची पत्रावळ तेवढ्या दिवसांपासून बनवली असतानासुद्धा तिचा वास येत नाही कारण, निसर्गाची देण असलेली ही रानातील बहुगुणी झाडांची पानं आहेत. पण, आजकाल त्या गुणकारी पानांकडे आणि त्यापासून बनविलेल्या पत्रावळीकडे दुर्लक्ष केले जाते. म्हणून हळूहळू पानांपासून तयार केलेली पत्रावळ तसेच तयार करणारे दिसत नाही. पानाच्या पत्रावळीत जेवण करताना एक विशेष समाधान मिळते. ताज्या पानांची पत्रावळ असो किंवा सुकलेल्या पानांपासून बनवलेली पत्रावळ असो, त्यात जेवण करण्याचा आनंद वेगळा असतो.

लहान मुलांना अगदी कमी प्रमाणात पत्रावळीमध्ये जेवण देत होते कारण, ती पत्रावळ बनवताना बारीक शिलकांचा वापर केला जातो. लहान मुले घाईगडबडीत जेवण करताना कधीकाळी ती बारीक शिलक जेवणासोबत गळ्यात अडकून राहण्याची शक्यता होती. म्हणून, त्या मुलांना आईवडील किंवा आजीआजोबा हाताने जेवण भरवत असत. त्याचप्रमाणे गावातील जाणकार माणसं पळसाच्या पानांच्या पत्रावळीत जेवण करण्याचा आवर्जून सल्ला देत होते. आजकाल माणूस खऱ्या गुणकारी वस्तूंना महत्व द्यायचे सोडून शरीराला हानिकारक असलेल्या वस्तूंना जास्त महत्व देत आहे. निसर्गापासून दूर गेल्यामुळे आरोग्य बिघडत चालले आहेत. रानात मिळणाऱ्या सर्वच वस्तू या गुणकारी वनस्पती आहेत. त्यांचे जतन करणे, रानमेव्याचा आहारात समावेश करणे गरजेचे आहे. ही पानं खाल्ली जात नसली तरी त्या पानांच्या पत्रावळीमध्ये जेवण केल्यानेसुद्धा शरीराला लाभ मिळतो.

## आठवणींच्या पारावर

मो. बा. देशपांडे/८३२९१९३५४२



# आठवण असू द्या...

सध्या देशात सर्वत्र निवडणुकांची रणधुमाळी शांततेत सुरू आहे. खरी लढत ही सत्ताधारी आणि तुल्यबळ विरोधी (की सत्ताकांक्षी?) या पक्षांत निवडणुकांच्या माध्यमातून होत असते. यात सामान्य मतदारांनी तटस्थ राहून सजगतेने मतदान करणे आवश्यक आहे. हीच लोकशाही आहे अन्यथा राजेशाहीत, सुलतानी राजवटीत इतकेच काय इंग्रजी राजवटीतही विरोधी पक्ष असण्याचे कारण नव्हते. इंग्रजांना इथे कोणतीही निवडणूक जिंकायची नव्हती. स्वराज्यासाठी विरोध करण्यातून भारतात क्रांतिकारकांनी विरोधाचे निशाण रोवले. तो भाग वेगळा पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विरोधी पक्षाला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले.

विरोधी पक्ष मजबूत असणे हेच बळकट लोकशाहीचे लक्षण आहे, असा एक मतप्रवाह आहे. विरोधी पक्षाने जनता जनार्दनाचे हित डोळ्यांपुढे ठेवून, सत्ताधारी पक्षावर अंकुश ठेवणे अपेक्षित असते. पण, लोकोपयोगी योजना मांडली तरीही सारासार विचार न करता निव्वळ विरोधासाठी विरोध करत रहाणे हे धोरण आदर्श विरोधी पक्षाच्या संकल्पनेला छेद देणारे नव्हे काय?

एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ यातून हळूच एकमेका लाच देऊ, अवघे होऊ श्रीमंत अशी नवी म्हण कधी तयार झाली ते कळलेच नाही. स्वार्थपूर्तीच्या वाटेने जाताना सुविचारांना पण, सोयीस्कर वळण देऊन त्यांची अधोगती होऊ शकते याचे हे एक मासलेवाईक उदाहरण जाणावे. कधीकधी विरोधी पक्षाजवळ इतका पैसा कोठून येतो? असा बालिश प्रश्न काही कच्चा लिंबू भोळे मतदार विचारतात. पण, तो काही मोठा इश्यू नसतो. अबकी बार कौनसी सरकार ? हा प्रश्न त्यावर सहज मात करतो.

तशी विरोधी पक्ष ही संकल्पना नैसर्गिकच म्हणावी. विरोधी पक्षाच्या तत्पर भूमिकेमुळे बंद केलेल्या फाईली पुन्हा उघडाव्या लागतात. अन्यथा चार भिंतीआडचा व्यवहार वेशीवर येण्यास वावच नव्हता. नंतरच्या काळात तर कामगारांच्या हिताच्या संरक्षणासाठी युनियन कायदेशीर करण्यात आली आहे. लोकशाहीच्या प्रस्थापितांची दंडेली चालू नये त्यांची अंडीपिल्ली वेळीच बाहेर यावी, यासाठी विरोधी पक्षाची तरतूद हा एक लोकशाहीला पोषक विचार आहे. शिवाय, जनसामान्यांना दोन्ही बाजू पारखून बघायला आयतेच वातावरण मिळते. पण, आता विरोधी पक्षाला डावलून सत्ताशकट हाकणे कठीण होऊन बसलेय. हीच स्थिर लोकशाहीची खूण समजावी काय?

पूर्वीचं राजकारण जरा वेगळे होते. चोर चोर मौसेरे भाई, या न्यायाने असे अनेक विरोधी पक्ष एकत्र गठबंधन करीत. त्यांची मते आणि ध्येयधोरणे कुठेच जुळणारी नसली तरी केवळ अमुक व्यक्ती पुन्हा सत्तेवर येऊ नये, या एकाच मुद्यावर ही गोळाबेरीज झालेली असते. भूमिका बदलली तरी वृत्ती तीच राहते. पुन्हा ये रे माझ्या मागल्या! भोळ्या मतदारांचा विरस होतो. ते बिचारे पुन्हा पहिल्या पक्षाला निवडून देतात. परिणामी कधी तळ्यात कधी मळ्यात अशी राजकारणात नेहमीच अस्थिर स्थिरता बघायला मिळायची. अमेरिकन राजकारणातील शहाणे मतदार आलटून पालटून सत्ताबदल करतात. त्यामुळे, दोन्ही पक्षांना आराम आणि पक्षबांधणी मोर्चेबांधणी वगैरे शक्य होते.

मध्यंतरी एक व्यंगचित्र बघितले. त्यात पक्षनेता अंतर्गत मीटिंगमध्ये सांगत असतो. 'मित्रांनो, विरोधी पक्षात असताना ज्या मागण्या आणि मुद्दे मांडून आपण राज्यकर्त्यांना वेठीस धरले होतेः तसेच जे मुद्दे पक्षाच्या जाहीरनाम्यात समाविष्ट केले होतेः ते प्रत्यक्षात पूर्ण करणे किती अवघड आहे ते आता लक्षात येते.' विरोधी पक्षांचा गदारोळ म्हणजे नेमके काय हे समजण्यासाठी हा प्रसंग पुरेसा बोलका आहे.

सत्ताधारी आणि विरोधी पक्ष असे चर्चेचे फड रंगतात. सत्तारूढ पक्षांना केवळ काम करून भागायचे नाही. त्यांना विरोधी पक्षाच्या आव्हानांना तोंडही देणे क्रमप्राप्त आहे. विरोधी पक्षापुढील सर्वात मोठे आव्हान हेच की, विरोधी निशाण सतत फडकत ठेवावे लागते. विरोधाची धार जराही बोथट होऊ देता कामा नये. आगामी निवडणुकीच्या योजनेचा एक भाग म्हणून जनमानसात अनुकूल प्रतिमा निर्मितीचे काम सोडले तर बाकी निर्भेळ मनोरंजन असते. तत्वविहीन राजकारण, भय, भूक और भ्रष्टाचार के खिलाफ, असे भलेमोठे शब्द वापरून वातावरण निर्मिती करावी लागते. या सर्व गदारोळात सामान्य मतदारांना तोंडी लावायला विषय मिळतो, हीच मोठी उपलब्धी !

पीठासीन अध्यक्षांनी प्रस्ताव मांडला की, विरोधाचे निशाण फडकलेच समजा. संवेदनशील ठराव चर्चेसाठी घेतला की, केले बहिर्गमन! चहापानाचे रीतसर आमंत्रण दिले तरी बहिष्कार! सर्व बळ एकवटून सागवानी बाके बडवणे, हा प्रकार किती उन्मादक ! स्वानुकुल समालोचन करून दिशाभूल करणारी पीतपत्रकारिता ओळखणारे ते सजग मतदार आणि अशा या कुरुक्षेत्रावर धृतराष्ट?ाच्या बातमीसाठी वस्तुस्थिती लोकाभिमुख करणारा संजय 'आय मीन' पत्रकार खरा स्थितप्रज्ञ !

एकेका मतदाराशी प्रत्यक्ष वैयक्तिक भेट शक्य असते, हे या काळात सिद्ध होत असे. अनेक उमेदवार आपले समर्थक सहकारी घेऊन पायी लोकांच्या दारी जात. त्यांना विनम्रपणे हात जोडून 'आठवण असू द्या' किंवा 'लक्ष असू द्या' अशी गळ घातली जायची. याचा बरेचदा सकारात्मक प्रभाव पडत असला तरी, कधीकधी लोकांच्या रोषाला सामोरे जाण्याचा प्रसंग यानिमित्ताने गुदरत असे. पण, कडूगोड दोन्ही प्रतिक्रियांचे स्वागत करण्याची उमेदवारांचे धोरण असे. हाच उपाय समस्या मार्गी लावतानाही वापरला जाऊ शकतो. पण कसले काय? ते ढासळलेले बुरुज दुरुस्त करण्यापासून सवड होईल तेव्हा ना? अशा संभ्रमित अवस्थेत सामान्य मतदारापुढे मोठे आव्हान असते. पण, जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या या देशात मतदारराजा सुबुद्ध असून, आमिष पचवून नंतर अजिबात विचलित न होता, डोळसपणे मतदान करतो.

निवडणुकांचा मौसम सुरू झाला की, इव्हीएम वाद पुन्हा पुन्हा नव्यानं ऐरणीवर येतो. कुणी मशिनच्या अचूकतेबाबत शंका उपस्थित करतात तर कुणी त्यावर नियंत्रण मिळवून स्वानुकूल फेरफार म्हणजे हॅक होत असल्याचा संशय घेतात. कुणी त्याचं मंडन तर कुणी खंडन करतात. कुणी जुन्या पद्धतीचे समर्थन करतात. भ्रमित मतदार या बातम्या चविष्टपणे चघळतात. यावर काय तोड असू शकते? लोकसभा असो की विधानसभा, निवडणुकीत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांची रस्सीखेच सुरूच राहणार. यात फार न गुंतता सजग मतदाराचे लक्षण काय? आपले अमूल्य मत डोळसपणे, सुज्ञ विचार करून योग्य मतदाराला देणे यातच शहाणपणा आहे. आपले 'माझ्या एका मताने काय फरक पडतो' हा नकारात्मक विचार असून, माझ्या एका मताने कदाचित अवघे चित्र पालटू शकेल, हा सकारात्मक विचार आहे. कदाचित भविष्यात इव्हिएम मशीन आधारशी लिंक झाली तर मतदान केल्याची पावती मिळू शकेल काय ? मतदान न केलेल्यांची व्होटर क्रमांकाची यादी मिळू शकेल काय ? इतपत संशोधन भविष्यात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कर्तव्य योग्य रीतीने बजावणे हीच लोकशाहीची पूजा ठरेल. एकही उमेदवार पसंत नाही वगैरे खटाटोप व्यर्थ आहे.

हल्ली पक्षनिष्ठा वगैरे शब्दांना केवळ पुस्तकीमूल्य असून त्याचा राजकारणातील बाजारभाव शून्य आहे. सरकार कुणाचेही येवो मंत्रिपद शाबूत ठेवणे तसेच, एकाच घराण्यात विविध पक्ष असल्यावर मग सत्ता कुणाचीही येवो काय फरक पडतो? हा विचार प्रबळ ठरतो. कधी लोकशाहीच्या पडद्याआड घराणेशाहीचे बुरुज भक्कम करण्याचा कायमस्वरूपी उद्योग सुरू असतो. पण, गंमत अशी की, भोळे मतदार मात्र बातम्या वाचून त्यावर स्वतःचे रक्त तापवतात. तेव्हा राजा राज्य कमवी, दुबळा झोप गमवी या म्हणीची यथार्थता पटते. विरोधी पक्षाने विरोधाची धार बोथट केली तर त्याला विरोधी पक्ष तरी कसे म्हणावे? म्हणून विरोधासाठी विरोध करणे याला काय म्हणावे? या सगळ्यात जनहिताची जपणूक होणे गरजेचे आहे. तसेच, जेव्हा इतर देशांशी विवादाचा मुद्दा येतो तेव्हा देशहित डोळ्यांपुढे ठेवून 'वयं पंचाधीकम शतम्' हा नियम पाळेल तोच आदर्श विरोधी पक्ष! चला मतदानाला जाऊ या, लोकशाहीची पूजा करू या !

# व्यवस्थितपणा? नको रे बाबा...



त्या दिवशी रमा चांगलीच वैतागली होती. तिला नवऱ्याने कधीतरी, कुठलासा कागद ठेवायला दिला होता. आज त्याला तो हवा होता आणि काही केल्या रमाला तो सापडेना. 'स्वतःच्या वस्तू स्वतः ठेवायला काय होतं,' तिचं पुटपुटणं त्याच्या कानावर गेलंच. 'अगं तूच म्हणत असतेस नं, माझं काम खूप व्यवस्थित आहे, म्हणून तर तुला ठेवायला दिला तो कागद,' त्याने संधी साधलीच. 'माझं काय मी सगळ्या वस्तू टेबलवरच ठेवतो. म्हणजे कशा पटकन हातात येतात. पण, तुला ते पटत नाही. केवढा पसारा टेबलवर, म्हणून तू सगळं उचलून ठेवतेस. आता शोध तो कागद! अतिशय महत्वाचा आहे आणि मला आजच हवाय तो!' रमाला हातातली कामं बाजूला ठेवून तो कागद शोधणं क्रमप्राप्त होतं. कागद व्यवस्थित ठेवला तर होता. पण कुठे? काही केल्या आठवेना. करते काय! आपलाच व्यवस्थितपणा नडला. तसाच टेबलवर पडलेला राहू दिला असता तर बरं झालं असतं, असं आता तिला वाटायला लागलं.

तिला आठवलं. तिच्या आईच्या व्यवस्थितपणाचा गुण त्या साऱ्याच भावंडांनी घेतला होता. कधी कधी तर या व्यवस्थितपणावरून तिला तिचे बाबा चिडवत असत. 'बघ, इतका व्यवस्थितपणा काही कामाचा नाही. तुला जर नवरा अव्यवस्थित मिळाला तर काय करशील?' बाबांचा हा आशिर्वाद रमाच्या बाबतीत तंतोतंत खरा ठरला. नवराच काय कुणाचाच अव्यवस्थितपणा रमाला चालत नसे. तिच्याकडे शिकवणीसाठी येणारे विद्यार्थी दारातच मधोमध चप्पल बूट काढून ठेवत, तेही अस्ताव्यस्त! सुरुवातीला शांतपणे सांगून झालं पण, परिणाम शून्य! शेवटी तिने विद्यार्थ्यांना धमकीच दिली की, यापुढे दारात अशी अस्ताव्यस्त पादत्राणे दिसली तर ती सरळ रस्त्यावर फेकून देण्यात येतील. या धमकीचा मात्र फायदा झाला. विद्यार्थ्यांनी शिस्तीत एका बाजूला पादत्राणे ठेवायला सुरुवात केली.

एकदा बाजारात खरेदी करत असताना एका विद्यार्थ्याची आई भेटली. आग्रह करून घरी घेऊन गेली. रमाला बसायला सांगून चटकन आत जाऊन पाणी घेऊन आली. रमालाही पाणी हवंच होतं. तिने ही लगेच ग्लास तोंडाला लावला. त्या क्षणी तिला ग्लासला कसलासा वास येत असल्याचं जाणवलं. हातात घेतलेला ग्लास तसाच परत करणं बरं दिसलं नसतं आणि पाणी प्यायची इच्छा होईना. तिने कसंतरी घोटभर पाणी घेऊन ग्लास परत केला. तोपर्यंत गृहिणीचा चहाचा आग्रह सुरू झाला. पण, नुकत्याच घेतलेल्या अनुभवावरून रमाने आपण चहा कॉफी इत्यादी काहीच घेत नसल्याचं निक्षून सांगितलं आणि कशी तरी तिथून सुटका करून घेतली. घरी येते तो नातवाचा प्रश्न,'आजी माझा यलो टी शर्ट कुठे आहे?' खरं तर रमा चांगलीच वैतागली होती.कधी घरात शिरून पाणी प्यायला मिळेल, असं तिला झालं होतं. त्यात ही भर! पण, शांतपणे ती म्हणाली तुझ्या कपाटात बघ.

'तिथे नाही.'

'लॉंड्री बॅगमध्ये बघ.'

'ती रिकामी आहे.'

'मग वाळत घातलेल्या कपड्यांमध्ये बघ!'

एकदाचा सापडला. आता आजही रमा काही कामं आटोपून बाहेरून चांगलीच थकून आली. तरी एका महत्वाच्या कामाला तिला वेळ देता आला नाहीच. नवऱ्याचा कागद सापडला म्हणजे मिळवली, असा विचार करतच ती पाण्याचा ग्लास भरून घेणार तोच दारात शेजारीण केवळ किल्ली ठेवायला आली. घाईत असल्याने घरात यायला तिला वेळ नव्हता त्यामुळे, अगदी अर्ध्याच तासात तिने रमाची सुटका केली. पण, तोपर्यंत रमाचा जीव तहानेने व्याकूळ झालेला!

तिने परत कागद शोधायला सुरुवात केली आणि अचानक तिला आठवलं, दिवसभरात नवऱ्याने तिला पुन्हा त्या कागदाची आठवण दिली नाही. याचा अर्थ त्याला तो कागद सापडला असेल किंवा फार महत्वाचा नसेल. नवरा घरी आल्यावर तिने विचारलं तर त्याने अगदी सहजपणे उत्तर दिलं,'अगं, तो कागद माझ्या खिशातच होता.'

आता मात्र हद्द झाली. 'तुम्हाला तो कागद सापडला होता तर सांगितलं का नाही? दिवसभर मी आपली शोध घेतेय. तेही स्वतःची कामं बाजूला ठेऊन!' त्या दिवशी खरंच तिला एका आजारी मैत्रिणीला भेटायला जायचं होत. पण, केवळ तो कागद शोधण्यात तिचा सारा वेळ गेला आणि तिचं मैत्रिणीला भेटायचं राहून गेलं. नवरा मात्र अगदी बेफिकिरीच्या स्वरात बोलला,'अग कुणी सांगितलं तुला एवढा डोक्याला ताप करून घ्यायला?'

म्हणजे तो कागद फार महत्वाचा नव्हता तर ! आता मात्र रमाने मनाशी निश्चय केला यापुढे व्यवस्थितपणाला कायमची सोडचिठ्ठी द्यायची. दुसऱ्या दिवशी घरभर पसारा बघून पतीदेव चिडले. 'काय हे ! केवढा पसारा आहे. एक वस्तू जागेवर नाही. तेच बरं! हव्या असलेल्या सगळ्या वस्तू एकाच ठिकाणी सापडतात. घरभर शोधायची गरज नाही. आता तर मी कानाला खडा लावला. व्यवस्थितपणा? नको रे बाबा,' त्याच्याकडे चोरट्या नजरेने पाहत रमा बोलून गेली.

अंजली पांडे / ९९२३३८१६४१

# सहाही मतदारसंघात आज होणार मतमोजणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ नोव्हेंबर**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील २२ लाख २७ हजार ८४४ मतदारांपैकी १५ लाख ३४ हजार ४३६ म्हणजेच ६८.८८ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बुधवारी (ता.२०) बजाविला. या सहाही विधानसभा मतदार संघातील मतदानांची मोजणी शनिवारी (ता.२३) होणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांनी सांगितले. गेवराई मतदारसंघात ७२.७२ टक्के, माजलगाव ६७.२४, बीड ६२.१८, आष्टी ७३.०५, केज ६३.४८ आणि परळी मतदारसंघामध्ये ७५.२७ टक्के मतदान झाले. जिल्ह्यात सर्वाधिक मतदान परळी विधानसभा मतदारसंघात झाले.

गेवराई मतदारसंघात एक लक्ष ९९ हजार ८८९ पुरुष मतदार, १ लक्ष ८० हजार १७ महिला, इतर ३ असे एकूण तीन लक्ष ७९ हजार ९०९ मतदार आहेत. तर माजलगाव मतदारसंघामध्ये १ लक्ष ८५ हजार ८०६ पुरूष, १ लक्ष ६६ हजार ४७२ महिला, इतर १ असे एकूण ३ लक्ष ५२ हजार २७९ मतदारांनी, बीडमध्ये दोन लक्ष दोन हजार ७२० पुरूष, १ लक्ष ८१ हजार ३७२ महिला व इतर ९ असे एकूण ३ लक्ष ८४ हजार १०१, आष्टीतील दोन लक्ष पाच हजार ३५६ पुरूष, एक लक्ष ८१ हजार एक महिला, इतर १ असे एकूण तीन लक्ष ८६ हजार ३५८, केजमध्ये दोन लक्ष दोन हजार ६२० पुरूष, एक लक्ष ८४ हजार ५९५ महिला, इतर सहा असे एकूण तीन लक्ष ८७ हजार २२१ आणि परळीमध्ये एक लक्ष ७६ हजार ५० पुरूष, एक लक्ष ६१ हजार ९२२ महिला व ४ इतर असे एकूण तीन लक्ष ३७ हजार ९७६ असे एकूण मतदार आहेत.

असे झाले मतदान

गेवराई मतदारसंघात एक लक्ष ४७ हजार १२४ पुरूष, एक लक्ष २९ हजार १५७ महिला, इतर २ असे एकूण दोन लक्ष ७६ हजार २८३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. तर माजलगाव मतदारसंघात एक लक्ष २६ हजार ५५५ पुरूष, एक लक्ष १० हजार ३२४ महिला, एक इतर असे एकूण २ लक्ष ३६ हजार ८८० मतदारांनी, बीडमध्ये एक लक्ष २८ हजार ३११, बीडमध्ये एक लक्ष १० हजार ५३१, इतर ३ असे एकूण २ लक्ष ३८ हजार ८४५, आष्टीमध्ये १ लक्ष ५२ हजार १७१ पुरूष, १ लक्ष ३० हजार ७५ महिला असे एकूण दोन लक्ष ८२ हजार २४६ मतदारांनी, केजमध्ये एक लक्ष ३० हजार ८५४ पुरूष, एक लक्ष १४ हजार ९४३ महिला आणि इतर २ असे एकूण दोन लक्ष ४५ हजार ७९९ आणि परळी विधानसभा मतदारसंघामध्ये १ लक्ष ३६ हजार १५५ पुरूष, १ लक्ष १८ हजार २२८ महिला असे एकूण २ लक्ष ५४ हजार ३८३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

## जिल्ह्यात सहा केंद्रीय मतमोजणी निरीक्षक

जिल्ह्यातील सहाही मतदार संघासाठी केंद्रीय मतमोजणी निरीक्षक यांची नियुक्ती भारत निवडणूक आयोग यांनी केली आहे. त्यानुसार गेवराईसाठी लालटनपुई वॉनचाँग (मणिपूर ), माजलगावसाठी मनोज कुमार (बिहार), बीडसाठी विजयकुमार जयरामन (कर्नाटक), आष्टीसाठी श्रीमती पूजा अग्निहोत्री (उत्तर प्रदेश), केजसाठी सुनील अंचिपका (गोवा) आणि परळीसाठी श्रीमती ईला तिवारी (मध्य प्रदेश) केंद्रीय मतमोजणी निरीक्षक असतील. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांनी त्यांच्या दालनात पूजा अग्निहोत्री यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या प्संगी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) महेंद्रकुमार कांबळे उपस्थित होते.

# रामतिर्थावर प.पू.दादा महाराज खडकीकर पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ नोव्हेंबर**

बीड येथे रामतिर्थावर प.पू.महायोगी दादामहाराज खडकीकर यांच्या एकोणिसाव्या पुण्यतिथी निमित्त व श्री. विद्यागुरु खडकीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व विविध धार्मिक कार्यक्रम सोहळा शनिवार दि.२३ नोव्हेंबर पासुन ते शनिवार ३० नोव्हेबर २०२४ पर्यंत आयोजित केला आहे.

यामध्ये गुरुचरित्र पारायण व श्रीरामकथा व कीर्तनाचे आयोजन असून दैनिक कार्यक्रमामध्ये पहाटे ४ ते ५ काकडा, ५ ते ६ श्रीविष्णूसहस्त्रनाम, सकाळी ६ ते ७ योगशिबिर, सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ८ ते ११ गुरुचरित्र पारायण, ११ ते १२ श्रींच्या समाधीला अभिषेक व आरती, दुपारी २ ते ५ भागवतकथा, सायंकाळी ६ ते ८ हरिपाठ व आरती, रात्री ११ नंतर हरिजागर होईल. भागवतकथा प्रवक्ते हभप भागवताचार्य आबादेव महाराज माजलगांवकर यांच्या अमृतवाणीतून सात दिवस भागवत कथा दररोज दुपारी २ ते ५ वा. होईल. या सोहळ्याची सुरुवात भव्य शोभायात्रेने शनिवार दि.२३ नोंव्हेंबर रोजी सकाळी ११:३० वा. विठ्ठल मंदिर ते कथास्थळापर्यंत होईल. दररोज रात्रौ ९ ते ११ या वेळेत खालीलप्रमाणे कीर्तनाचे कार्यक्रम होतील. दैनिक योगशिबिर दररोज सकाळी ६ ते ७ वा श्रीराम लाखे, एस.आर. ढोरमारे, डॉ.काकाडे, उबाळे व सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली होईल. शनिवार दि.२३ नोव्हेंबर रोजी हभप. राधाबाई साळुंके. रविवार दि.२४ रोजी हभप तुकाराम महाराज करंडे, सोमवार दि.२५ रोजी बालकीर्तनकार हभप सोहम सातपुते. मंगळवार दि. २६ रोजी हभप सुधाकर महाराज राऊत. बुधवार दि. २७ रोजी हभप सुर्यकांत महाराज पुरुषोत्तमपुरीकर. गुरुवार दि.२८ रोजी हभप एकनाथ महाराज पुजारी. शुक्रवार दि.२९ रोजी हभप अनिल महाराज जोशी. यांची कीर्तनसेवा होईल. सकाळी ११ ते १:३० श्री. रामेश्वर बाहेती व सहकारी गेवराईकर यांचे सुंदरकांड होईल.

सप्ताहाची समाप्ती शनिवार दि.३० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वा श्रीं च्या समाधीस महारुद्राभिषेक होऊन सकाळी ११:३० ते १:३० या वेळी हभप ज्ञानेश्वर महाराज माऊली माजलगांवकर यांचे अमृतुल्य काल्याचे कीर्तन होऊन त्यानंतर महाप्रसाद दु.२ ते ५ या वेळेत होईल. तरी सर्व भाविक भक्तांनी भागवतकथा, कीर्तन श्रवण व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन प.पू.महायोगी दादामहाराज खडकीकर साधकभक्त परिवारातर्फे श्री. विद्यागुरु खडकीकर महाराज यांनी केले आहे.

## माधव जाधव यांना झालेल्या मारहाणीच्या **निषेधार्थ घाटनांदुर** बंद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ नोव्हेंबर**

राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे परळी मतदारसंघातील पदाधिकारी तथा कार्यकर्ते माधव जाधव यांना परळीत मारहाण झाली होती. याच्या निषेधार्थ (दि.२१) रोजी अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर गावात बंद पुकारण्यात आला आहे. यामुळे गावातील व्यवसायिकांनी आपली दुकाने बंद ठेवले असून पोलिसांनी तगडा बंदोबस्त लावला आहे.विधानसभा निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेदरम्यान वादावादी, मारहाण झाल्याच्या घटना घडल्या. अशीच एक घटना बीड जिल्ह्यात घडली असून परळीत शरद पवार गटाच्या माधव जाधव यांना मारहाण झाली.

# माजलगाव विधानसभा निवडणुक मतमोजणीसाठी प्रशासन सज्ञ - निवडणूक निर्णय अधिकारी गौरव इंगोले

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ नोव्हेंबर**

माजलगाव विधानसभा मतदारसंघासाठी उद्या शासकीय तंत्र प्रशाला केंद्र केसापुरी येथे होणार आहे.मतमोजणीसाठी एकूण २८ फेऱ्या होणार आहेत. आणि २९ वी फेरी केवळ एका टेबलवर होणार आहे. त्यात १४ ईव्हीएम टेबल आहेत. सहा पोस्टल काउंटिंग टेबल आहेत. आणि एक इलेक्ट्रॉनिकली ट्रान्समीटर पोस्टल बॅलेट चा टेबल आहे.

या मतमोजणीसाठी दोन रूम आहेत. एक रूम हे पोस्टल बॅलेट काउंटिंग साठी आहे. आणि एक ईव्हीएम काउंटिंग साठी आहे. असेच यासाठी एकूण टेबलवर काम करण्यासाठी एक सूक्ष्म निरीक्षक, पर्यवेक्षक, आणि सहाय्यक याप्रमाणे मतमोजणी १४ टेबलवर तर पोस्टलची सहा टेबल याप्रमाणे कर्मचारी नियुक्ती करण्यात आली आहे. सदरील २२९ माजलगाव विधानसभा मतदारसंघासाठी होणाऱ्या मतमोजणीसाठी काउंटिंग ऑब्झर्वर बघून श्री मनोज कुमार (बिहार) त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा मोबाईल क्रमांक ७००४३७७९१९ असा असून ते २१/११/२०२४ रोजी मतदारसंघात आले आहेत. मतदार संघात त्यांचा निवासाचा पत्ता हा शासकीय विश्रामगृह सूट क्रमांक एक बायपास रोड माजलगाव असा आहे. अशी माहिती २२९ माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी श्री गौरव इंगोले यांनी दिली आहे.

# परळी मतदार संघाची २४ टेबलवर होणार मतमोजणी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ नोव्हेंबर**

२३३-परळी विधानसभा मतदार संघातील मतदान निवडणूक प्रक्रिया (२० नोव्हेंबर) रोजी पार पडल्यानंतर या निवडणूकीची मतमोजणी (२३ नोव्हेंबर) रोजी नविन क्लब बिल्डिंग औष्णिक वीज निर्मिती केंद्र येथे २४ टेबलवर होणार आहे.

सकाळी ०८:०० वाजल्या पासुन सुरु होणाऱ्या मतमोजणीसाठी २४ टेबल असून प्रत्येक मतमोजणी टेबलवर ०४ अधिकारी, कर्मचारी या प्रमाणे ५६ अधिकरी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणीसाठी १४, टपाल मतपत्रीकेची मतमोजीसाठी ६ टेबल तर सैन्य दलातील मतदाराच्या मतमोज ीसाठी ४ टेबल असे एकूण २४ टेबल आहेत. सदर मतमोजणी ठिकाणी ओळखपत्रा शिवाय कोणालाही प्रवेश मिळणार नाही व मोबाईल वर बंदी राहील. एका उमेदवारास प्रती टेबल एक याप्रमाणे २४ प्रतिनिधी नेमता येतील. मतदान मोजणी दरम्यान पोलीसांनी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आले आहे.

एक वाजेपर्यंत निकाल हाती

सकाळी ८ वाजता मतमोजणीस सुरुवात झाल्यानंतर २६ फेऱ्या होणार आहेत. पहिल्या फेरीचा निकाल ८.३० वाजता हाती येण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत केवळ ११ उमेदवार असल्याने एका फेरीसाठी १५ मिनिटे लागणार आहेत. संपूर्ण निकाल दुपारी एक वाजता हाती येण्याची शक्यता आहे.

दोन्ही राष्ट्रवादीमध्ये लढत

परळी विधानसभेसाठी महायुतीकडून मंत्री धनंजय मुंडे तर महाविकास आघाडीचे राजेसाहेब देशमुख यांच्यात थेट लढत झाली. ७२ टक्के मतदान झाल्याने २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपेक्षा ३० हजार वाढलेले मतदान कोणाच्या ज्याच्या पारड्यात जाईल त्याचा विजय निश्चित मानला जात आहे.

## या लढाईत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या सर्वांचे आभार-डॉ.ज्योती मेटे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ नोव्हेंबर**



बीड विधानसभा निवडणुकीसाठी दि.२० रोजी मतदान प्रक्रिया पार पडली गेली पंधरा दिवस प्रचाराचे धामधूम सुरू होती. या सर्व कार्यकाळात शिवसंग्रामचे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी त्याचबरोबर लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्यावर प्रेम करणारे असंख्य चाहते, हितचिंतक यांचे डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी आभार मानले आहेत.

नुकतेच विधानसभेसाठी मतदान झाले असून गेली पंधरा दिवस प्रचाराची धामधूम सुरू होती. या प्रचार यंत्रणेत शिवसंग्रामच्या मावळ्यांनी मोलाची साथ दिली त्याचबरोबर मुंबई, रायगड, ठाणे, रिसोड, वाशिम, पंढरपूर, इंदापूर सह महाराष्ट्रभरातील शिवसंग्राम चे मावळे या ठिकाणी माझ्या प्रचारासाठी आले आणि रात्रंदिवस मेहनत घेतली. तसेच बीड मधील मतदाराने या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान अतिशय मायेने माझं स्वागत केलं या प्रेमाने मी अतिशय भारावून गेलेली आहे. मी बालाघाटची सून आहे या बीडकरांच्या प्रेमाचा, भावनेचा बंद यापुढील काळामध्ये पक्ष किंवा राजकारणाच्या पलीकडे जाऊन जपण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न असेल ,आपण दिलेल्या स्नेहामुळे माझी पुढची वाटचाल करण्यासाठी मला प्रेरणा मिळाली आहे. तेव्हा या लढाईत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या सर्वांचे मी आभार व्यक्त करते असे डॉ. ज्योती मेटे यांनी म्हटले आहे.

# जिल्हा ज्युनीयर रोल बॉल स्पर्धा, संघ निवड चाचणी दि.२४ नोव्हेंबर रोजी होणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ नोव्हेंबर**

महाराष्ट्र राज्य संघटना यांच्या वतीने १८ वी ज्युनियर महाराष्ट्र राज्य रोल बॉल चॅम्पियनशिप २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी बीड जिल्हा रोल बॉल असोसिएशनच्या वतीने रोल बॉल मैदान जिल्हा क्रीडा संकुल येथे रविवार दि.२४ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हास्तर स्पर्धा व संघ निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धांमधून उत्कृष्ट संघ निवडून सातारा येथे दि.१४ व १५ डिसेंबर २०२४ रोजी होणार्या राज्य स्पर्धामध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करणार आहे. सदर स्पर्धांसाठी पात्रताः ०१/०१/ २००८ व नंतर जन्मलेले खेळाडू चॅम्पियनशिपमध्ये भाग घेण्यास पात्र असतील. अशी माहिती संघटनेचे सचिव रामदास गिरी यांनी दिली. चॅम्पियनशिप संघ प्रवेश शुल्क रु. १०००/- प्रति संघ, खेळाडू नोंदणी शुल्क (जिल्हा) २००/- प्रती खेळाडू, खेळाडू नोंदणी शुल्क (तालुका) २००/- प्रती खेळाडू. सहभागी संघांनी त्यांच्या संबंधित गणवेशात असणे आवश्यक आहे. तसेच सर्व प्रकारचे क्रीडा सुरक्षा साधने असणे बंधकारक असतील, सोबत जन्म दाखला, आधारकार्ड व दोन पासपोर्ट फोटो असणे आवश्यक असल्याची माहिती रोल बॉल संभाजीनगर विभागाचे प्रमुख तथा बीड जिल्हा रोल बॉल असोसिएशनचे सचिव रामदास गिरी यांनी दिली. सदर स्पर्धामध्ये जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घेवून बीड जिल्ह्याचे नावलौकिक . सदर स्पर्धामध्ये जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घेवून बीड जिल्ह्याचे नावलौकिककरावे व क्रीडा गुण सवलतीचा लाभ घाव्या असे आवाहन प्रशिक्षक वैभव गिरी यांनी केले. बीड जिल्ह्याचे नावलौकिककरावे व क्रीडा गुण सवलतीचा लाभ घाव्या असे आवाहन प्रशिक्षक वैभव गिरी यांनी केले.

# लोकनेते सुंदरराव सोळंके कारखाना सुंदरनगर तेलगाव गळीत हंगामस आज प्रारंभ; शेतकऱ्यांत आनंदाचे वातावरण



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ नोव्हेंबर**

तेलगाव येथील सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या ३३ ऊस गळीत हंगामास आज पासून सुरुवात होत आहे तरी या प्रसंगी सभासद ऊस उत्पादक शेतकरी ऊसतोड मजूर मुकादम वाहतूकदार ठेकेदार यांनी उपस्थित राहावे असे आवाहन कार्यकारी संचालक आर सी बडगुजर यांनी केले आहे

तेलगाव येथील सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा सन २०२४-२५ चा ३३वा ऊस गळीत हंगाम दिवसास २१/११/२४ या दिवशी महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या शुभहस्ते व माजी मंत्री तथा जेष्ठ संचालक आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली आणि जेष्ठ मार्गदर्शक धैर्यशील काका सोळंके चेअरमन विरेंद्र सोळंके व्हा. चेअरमन जयसिंह सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत गव्हाणीत ऊसाची मोळी टाकून शुभारंभ होणार आहे या सन २०२४-२५ च्या गळीत हंगामात कारखान्याने निश्चित केलेले साडे सहा लाख मे टन ऊस गाळपाचे उदिष्ट पुर्ण करण्यासाठी कारखान्याने सर्वोतोपरी नियोजन केलेले असुन कार्यक्षम तोड/वाहतूक यंत्रणा करार पुर्ण करुन यंत्रणा भरली असून गाळप हंगाम सोबतच कारखान्याचा असवानी प्रकल्प व को.जनप्रकल्प ही सुरू होणार आहे तरी या गळीत हंगाम शुभारंभ कार्यक्रमाला कारखान्याचे सर्व सभासद ऊस उत्पादक शेतकरी विविध संस्था पदाधिकारी उस तोडणी वाहतूक ठेकेदार हितचिंतक यांनी उपस्थित राहावे असे आवाहन कार्यकारी संचालक आर सी बडगुजर सचिव सुरेश लगड यांनी केले आहे.



# स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचे दोन स्वयंसेवक विद्यार्थ्यांचा आव्हान राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरामध्ये सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ नोव्हेंबर**

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत दिनांक ७ नोव्हेंबर२०२४ ते १६ नोव्हेंबर २०२४ या दरम्यान संत गाडगे बाबा विद्यापीठ अमरावती या ठिकाणी आव्हान राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिर संपन्न झाले या शिबिरामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे दोन स्वयंसेवक विद्यार्थी चिरंजीव आकाश शिंदे व चिरंजीव अमित वाघमारे यांची डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर विद्यापीठाच्या संघामध्ये निवड झाली होती.या दोन्ही विद्यार्थ्यांनी हे शिबिर यशस्वीरित्या पूर्ण केले त्याबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉक्टर प्रीती पोहेकर यांनी दोन्ही स्वयंसेवक विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. संजय काळे, डॉ. सुहास जोशी यांची उपस्थिती होती.

## हेरिटेज वाक बीडमध्ये संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ नोव्हेंबर**

जागतिक वारसा सप्ताह १९/११/२४ ते २५/११/२४ या काळात संपन्न होत आहे त्या निमित्त बीड येथे पुरातत्वविभाग छत्रपती संभाजी नगर, इतिहास संकलन संस्था देवगिरी प्रांत बीड स्वा सावरकर वरिष्ठ महाविद्यालय बीड , सौ के एस के महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने कंकालेश्वर मंदिर बीड येथे *हेरिटेज वाक* चे आयोजन करण्यात आले.



ऐतिहासिक वारसा स्थळ जतन संरक्षण व्हावे आपला इतिहासातील सांस्कृतिक वारसा नव्या पिढीला कळावा या उद्देशाने जागतिक वारसा सप्ताह साजरा होत असतो शासन पातळीवर पुरातत्व विभाग कार्य करतो जनतेने सुध्दा आपला सहभाग व सहकार्य करणे आवश्यकअसे प्रास्ताविकात डक यानी सांगितले

प्रा डॉ शांता जाधवर यानी कंकालेश्वर मंदिरातीव विवाध मूर्तीची माहिती विद्यार्थ्याना सांगितली.यावेळी मा कामाजी डक पुरातत्व विभाग, प्रा शशिकांत पसारकर कोषाध्यक्ष इतिहास संकलन, अमित देशपांडे प्रा डॉ शांता जाधवर प्रा डॉ अनिता शिंदे प्रा डॉ सुनिता कुरुडे प्रा पाटील मॅडम प्रा सुहास जोशी मुकुंद कुलकर्णी गणेश गिराम मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा सहभाग यात अधिक होता

# डॉ. तेजश्री देशमुख यांच्या क्षय रोगावरील औषधाच्या पेटंटला मिळाली मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ नोव्हेंबर**



माजलगाव येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्या प्राध्यापक डॉ. तेजश्री रावसाहेब देशमुख यांनी संशोधन केलेल्या क्षय रोगावरील (टी.बी.) औषधाला पेटंट कार्यालय भारत सरकार तर्फे मान्यता देण्यात आली आहे. हे औषध १,२,३ ट्राय आझोल या कंपाऊंड चा वापर करून तयार केले गेले आहे. प्रा. डॉ. तेजश्री देशमुख यांना डॉ. बापूराव शिंगटे व सहकाऱ्यांचे मार्गदर्शन मिळाले. तसेच डॉ. तेजश्री ह्यांचे २५ रिसर्च पेपर हे आंतरराष्ट्रीय जर्नल्स मध्ये प्रकाशित आहेत. या संशोधनाबद्दल त्यांचे सर्व स्तरावर अभिनंदन केले जात आहे.

## अचुक, पारदर्शक प्रक्रिया राबविण्याचे जिल्हाधिकारी स्वामी यांचे निर्देश

### मतमोजणी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.२२(जिमाका)- विधानसभा निवडणूक २०२४ करीता शनिवार दि.२३ रोजी मतमोजणी होणार आहे. त्यासाठी आज मतमोजणी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले होते. या प्रशिक्षणाला जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दुरदृष्यप्रणालीद्वारे मार्गदर्शन केले.



जिल्हाधिकारी कार्यालयातून आयोजित या प्रशिक्षणात त्या त्या विधानसभा क्षेत्रात मतमोजणी कर्मचारी, निवडणूक निर्णय अधिकारी आदी सहभागी झाले होते. जिल्हा मुख्यालयातून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्यासह अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, टपालीमतपत्रिका नोडल अधिकारी प्रभोदय मुळे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी मार्गदर्शन केले की, मतमोजणी साठी नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांनी वेळेच्या आधी मतमोजणी केंद्रावर उपस्थित रहावे. मतदान यंत्रे स्ट्राँगरुम मधून बाहेर आणण्याआधी कुलूप सिल उघडतांना निवडणूक निरीक्षक, उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित असणे आवश्यक आहे. या प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रण करणे आवश्यक आहे. त्यामुळे आवश्यक ती पारदर्शकता जपता येते. मतमोजणी केंद्रावरील संवाद प्रणाली ही अद्यावत व सुसज्ज ठेवावी. विद्युत पुरवठा अखंड ठेवण्याबाबत वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांचे पथक सज्ज ठेवावे. मतमोजणीबाबत निवडणूक आयोगाने दिलेल्या तरतूदींचा अभ्यास करा. मतमोजणी कक्षात शांतता राखायला हवी. टपाली मतपत्रिकांची मोजणीने सुरुवात करा. मतमोजणी केंद्रावर अद्यावत आरोग्य केंद्र सुसज्ज ठेवा. मतमोजणी केंद्रात केवळ निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनाच मोबाईल नेता येणार आहे. त्याव्यतिरिक्त कुणालाही मोबाईल नेता येणार नाही. मतमोजणी केंद्राबाहेर त्रिस्तरीय सुरक्षा बंदोबस्त राहील. १०० मीटर कक्षेच्या आत वाहनांना परवानगी नाही. याबाबत दक्षता घ्यावी. मतमोजणी प्रक्रिया अचूक व पारदर्शक पद्धतीने राबवावी,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके व प्रभोदय मुळे यांनीही मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणानंतर प्रत्येक विधानसभा मतदार संघात नियुक्त कर्मचाऱ्यांचे स्थानिक पातळीवर प्रशिक्षण सुरु करण्यात आले.

## मतमोजणी केंद्र परिसरात मनाई आदेश

छत्रपती संभाजीनगर,दि.२२(जिमाका)- विधानसभा निवडणूक २०२४ करीता शनिवार दि.२३ रोजी मतमोजणी होणार आहे.

**विधानसभा मतदार संघनिहाय मतमोजणी केंद्राचे ठिकाण याप्रमाणे-** १०४- सिल्लोड- शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर जळगाव हायवे, सिल्लोड ता. सिल्लोड. जि. छत्रपती संभाजीनगर., १०५- कन्नड- इनडोअर हॉल, शिवाजी महाविद्यालय, कन्नड, ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर., १०६-फुलंब्री- गरवारे हायटेक फिल्म्स लि. चिकलठाणा एमआयडीसी, छत्रपती संभाजीनगर., १०७-औरंगाबाद (मध्य)- शासकीय तंत्रनिकेतन , रेल्वेस्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर., १०८-औरंगाबाद(पश्चिम)- शासकीय अभियांत्रिकी विद्यालय, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर., १०९-औरंगाबाद(पूर्व)-सेंट फ्रान्सीस डी सेल्स हायस्कूल, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर., ११०- पैठण- प्रशासकीय इमारत, संतपीठ, जायकवाडी धरणाजवळ, पैठण, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर., १११-गंगापूर- इनडोअर स्टेडियम हॉल, श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर., ११२-वैजापूर- टेनिस कोर्ट हॉल, विनायक पाटील महाविद्यालय, येवला रोड, वैजापूर ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

मतमोजणी शांततेत व्हावी यासाठी मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहे. त्याअन्वये मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात प्राधिकृत व्यक्तिंव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तिस प्रवेश करण्यास, मोबाईल नेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश मतमोजणी अधिकारी, कर्मचारी, पोलीस अधिकारी यांना लागू राहणार नाहीत,असे स्पष्ट करण्यात आले आहे.

संपूर्ण परिसरात मोबाईल, टॅब, संगणक व तत्सम संदेशाची देवाणघेवाण करणाऱ्या विद्युत उपकरणे बाळगण्यास व हाताळण्यास मनाई, अनधिकृत व्यक्तिच्या प्रवेशास मनाई करण्यात आली असून या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तिविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ प्रमाणे कारवाई करण्यात येईल,असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली मतमोजणीच्या तयारीची पाहणी

छत्रपती संभाजीनगर,दि.२२ : विधानसभा निवडणूक २०२४ करीता शनिवार दि.२३ रोजी मतमोजणी होणार आहे. मतमोजणी केंद्रावर निवडणुक आयोगाने दिलेल्या निर्देशांप्रमाणे सर्व तयारी करण्यात आली आहे. आज दुपारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी १०७-औरंगाबाद मध्य, १०८-औरंगाबाद पश्चिम, १०९-औरंगाबाद पूर्व या विधानसभा मतदार संघांच्या मतमोजणी केंद्रांना भेटी देऊन पाहणी केली.



१०७-औरंगाबाद (मध्य) चे मतमोजणी केंद्र शासकीय तंत्रनिकेतन , रेल्वेस्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर, १०८-औरंगाबाद(पश्चिम) चे मतमोजणी केंद्र शासकीय अभियांत्रिकी विद्यालय, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर, तर १०९-औरंगाबाद(पूर्व)-सेंट फ्रान्सीस डी सेल्स हायस्कूल, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर या केंद्रांना त्यांनी भेटी दिल्या. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून मतमोजणी केंद्राची रचना, तेथील सुरक्षा व्यवस्था, माध्यम कक्ष, टपाली मतांच्या मोजणीची व्यवस्था, स्ट्राँगरुम, मतदान यंत्रांची स्ट्राँग रुम ते मतमोजणी कक्ष अशी केली जाणारी वाहतुक अशा विविध बाबींची पाहणी केली. त्याचप्रमाणे मतमोजणी केंद्राकडे येणारे व तेथून बाहेर जाणारे मार्ग, त्यावरील सुरक्षा व्यवस्था इ. बाबींची पाहणी केली.

## हरी शरणम ट्रेडलिंक प्रा.लि.ला वनविभागाचा आशीर्वाद; कंपनीवर कारवाईची मागणी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २२ नोव्हेंबर: पैठण तालुक्यातील म्हारोळा रोडवर असलेली गट नंबर ६७ फारोळा येथील हरी शरणम प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये अनेक वर्षापासून बेकायदेशीरपणे खराब प्लास्टिक जुने कपडे फळझाडांची अवैधपणे वृक्षतोड करून ते लाकूड कंपनीचे बॉयलर मध्ये टाकण्यात येते यामुळे परिसरात प्रदूषण निर्माण होऊन नागरिकांना आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे. सदर या कंपनीची तक्रार प्रदूषण विभाग वन विभाग तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय औरंगाबाद



यांना रफिक बाबा पटेल यांनी दिनांक १८ नोव्हेंबर रोजी लेखी स्वरूपात तक्रार केली असून अद्यापपर्यंत या कंपनीवर कुठल्याच विभागाने विशेष करून वनविभागाने कारवाईच केली नसुन दररोज असलेला लाकडाचा साठा संपल्यानंतर कारवाईसाठी संबंधीत विभागाचे अधिकारी येथील का अशी चर्चा नागरिकांत होताना दिसून येत आहे. याच महिन्याच्या दिनांक १३ रोजी पैठण तालुक्यातील ७४जळगाव या ठिकाणी एका मुलीवर बिबट्याने प्राणघातक हल्ला केला त्यात एक दहा वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाल्याची घटना घडून दहा दिवस उलटूनही वनविभागाला बिबट्याला जेरबंद करता आले नाही. हे कारण दाखवून सर्व वनविभागाचे अधिकारी कर्मचारी वेळ मारुन नेत आहे. तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाने ही कुठलीच कारवाई केली नसल्याचे दिसुन येते.कंपनीचे परिसरात शेती परिसर शालेय परिसर व गावातील दळणवळण चा मुख्य रस्ता असून या बॉलरच्या प्रदूषणाने आरोग्याला धोका निर्माण झाला आहे तरी या कंपनीची संबंधित अधिकारी यांनी चौकशी करून तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी या कंपनीच्या विरोधात तक्रारदार रफिक बाबा पटेल यांनी केलेली आहे.

## मतमोजणीसाठी निरीक्षक दाखल


छत्रपती संभाजीनगर,दि.२२(जिमाका)- विधानसभा निवडणूक २०२४ करीता शनिवार दि.२३ रोजी मतमोजणी होणार आहे. मतमोजणीसाठी जिल्ह्यात भारत निवडणूक आयोगामार्फत नियुक्त निरीक्षक दाखल झाले आहेत. विधानसभा मतदारसंघनिहाय नियुक्त निवडणूक निरीक्षक व त्यांचे निवासाचे ठिकाण याप्रमाणे- १०४- सिल्लोड- बिद्यानंद सिंह. नेक्स इमारत, सिंधफणा कक्ष, सुभेदारी विश्रामगृह., १०५- कन्नड- श्री. सुधाकर, नेक्स इमारत, बिंदुसरा कक्ष, सुभेदारी विश्रामगृह., १०६-फुलंब्री- विजेंद्र हुडा, अजंता इमारत, कक्ष क्रमांक १ अ, सुभेदारी विश्रामगृह., १०७-औरंगाबाद (मध्य)- तलत परवेज इक्बाल रोहिला, मुख्य इमारत, मांजरा कक्ष, सुभेदारी विश्रामगृह.,१०८-औरंगाबाद(पश्चिम)- श्रीमती कोर्रा लक्ष्मी, मुख्य इमारत, तेरणा कक्ष, सुभेदारी विश्राम गृह., १०९-औरंगाबाद(पूर्व)- अनिलकुमार यादव, नेक्स इमारत, गिरजा कक्ष, सुभेदारी विश्रामगृह., ११०- पैठण- उज्ज्वलकुमार सिंग, नेक्स इमारत, पेनगंगा कक्ष, सुभेदारी विश्रामगृह., १११-गंगापूर- आतिषकुमार, अजंता इमारत, कक्ष क्रमांक ५ अ, सुभेदारी विश्रामगृह., ११२-वैजापूर- अभयकुमार पांडे, अजंता इमारत, कक्ष क्रमांक ४ अ, सुभेदारी विश्रामगृह.

## विधानसभा निवडणूक मतमोजणी आज

गंगापूर दि.२२ नोव्हेंबर: १११ गंगापूर विधानसभा निवडणूक मतमोजणी आज (दि.२३) येथील मुक्तानंद महाविद्यालयाच्या इंडोर हॉल येथे होणार आहे.गंगापूर मतदारसंघात ७३.७७ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ३ लाख ६४ हजार ७७० पैकी २ लाख ६९ हजार ७५ मतदारांनी मतदान केले यात १ लाख २७ हजार ३३७ महीला तसेच १ लाख ४१ हजार ७३० पुरुष व ८ इतर मतदान झालेले आहे. निवडणुक रिंगणात १८ उमेदवार लढत आहे. मतमोजणी सकाळी ८ वाजता पार पडणार आहे मतमोजणीसाठी केंद्राचे टेबल ईव्हीएम चे १४ वी. पि.बी. साठी ७ टेबल लावले आहे तसेच मतमोजणी केंद्रावर मिडिया कक्ष , कंट्रोल रुमची स्थापना सह पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अशीम माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सुचिता शिंदे यांनी दिली आहे.

## गंगापूरला शनिवारचा आठवडी बाजार राहणार बंद

गंगापूर दि.२२ नोव्हेंबर: गंगापूर शहरात दर शनिवारी भरणारा आठवडी बाजार विधानसभा निवडणुकीचा निकाल दिनांक २३ नोव्हेंबर रोजी असल्याने याच दिवशी शनिवार चा आठवडी बाजार गंगापूरला असल्याने (दि.२३) शनिवारी आठवडी बाजार भरणार नाही त्यामुळे व्यापारी आणि भाजीविक्रेत्यांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी दिलीप स्वामी यांच्या आदेशानुसार बंद ठेवण्यात आलेला आहे. याची सर्व व्यापारी बांधव, भाजी विक्रेते ,फळ विक्रेते व जनतेने नोंद घ्यावी असे आवाहन नगरपरिषद गंगापूरच्या मुख्याधिकारी डॉ.पल्लवी अंभोरे यांनी केले आहे.



## पार्वतीबाई कोथिंबीरे यांचे निधन

बिडकीन दि. २३ नोव्हेंबर पार्वतीबाई दगडूजी कोथिंबीरे वय ७५ वर्ष रा. माळी गल्ली बिडकीन ता .पैठण यांचे दि २१ रोजी रात्री दु:खद निधन झाले त्यांच्या पार्थिवावर आज दि २२ शुक्रवार रोजी दुपारी बारा वाजता शेकटा रोडवरील अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यविधी करण्यात आली त्यांच्या पश्चात दोन मुलं, तीन सुना, मुलगी, जावई, नातवंड ,असा मोठा परिवार आहे.



## इंदुबाई रामभाऊ कराळे यांचे निधन

गंगापूर दि.२२ नोव्हेंबर : शहरातील इंदूबाई रामभाऊ कराळे (८७) यांचे वृद्धापकाळाने ( दि.२२ )पहाटे निधन झाले. त्यांच्यावर सकाळी साडे अकरा वाजता रामेश्वर मंदिर कायगाव येथे अंत्यसंस्कार संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, दिर, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार असून शिवाजी रामभाऊ कराळे यांच्या मातोश्री होत.

## धार्मिक सप्ताहातील सहभागामुळे समता, बंधुत्वाची अनुभूती येते : ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड



छ.संभाजीनगर:- वारकरी सांप्रदायामध्ये समता व बंधुत्वाला अनन्यसाधारण महत्त्व असून दींडी व धार्मिक सप्ताहामध्ये सहभागी होणाऱ्याला खऱ्या अर्थाने समता, बंधुतेची म्हणजेच भक्तीची अनुभूती येते असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री माऊली भजनी मंडळाच्यावतीने संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी सोहळयानिमित्त दि. २२/११/२४ ते २९/११/२४ या कालावधीत धार्मिक सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात डॉ. नारायण बाबा जाधव, रामभाऊ महाराज सारडा, ड. दीपक कोल्हे, प्रविण महाराज गोसावी, ज्ञानेश्वर दादा महाराज, विष्णु महारजा गुरव, डॉ. फड यांची कीर्तने होणार आहेत. या सप्ताहाचे वैशिष्टय म्हणजे डॉ. फड हे दररोज सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत श्रीमद भागवत, महाभारत, रामायण, गीता ज्ञानेश्वरी, हरिपाठ, भक्तविजय या ग्रंथाचा संपूर्ण सार तसेच समग्र श्री ज्ञानेश्वर माऊली चरित्र सांगणार आहेत. या सप्ताहाची पुर्वतयारी म्हणून संयोजक समितीची बैठक घेण्यात आली. याप्रसंगी बोलतांना ज्ञानदास डॉ. फड यांनी वारकरी सांप्रदायातील दिंडीचे व सप्ताहाचे महत्त्व स्पष्ट केले. समता, बंधूता, नि:स्वार्थ प्रेम व कर्तव्य हे वारकरी सांप्रदयाचे आधारस्तंभ आहेत. या चारही आधारस्तंभांना धार्मिक कार्यामध्ये मजबूती मिळते तसेच सहभागी होणाऱ्या प्रत्येकाला खऱ्या अर्थाने समता, बंधूता, नि:स्वार्थ प्रेम व कर्तव्याची अनुभूती येते. अशा सप्ताह कार्यक्रमात सहभागी होणारा प्रत्येक स्त्री-पुरूष माऊली या मायेच्या बहुमानास पात्र होतो. प्रत्येकाला कष्ट/कर्तव्याचे शिक्षण मिळते. त्यामुळे सहभागी वारकरी खऱ्या अर्थाने समता, बंधुता, नि:स्वार्थ प्रेम व कर्तव्याचा चालता-बोलता पुतळाच होतो. मानवतेचे वैरी असणारे इर्षा, व्देष, मत्सर, क्रोध, अहंकार आपोआप नष्ट होऊ लागतात. सप्ताहाचे महत्व समजावतांना फड यांनी संतांच्या अनेक ओव्या, अभंगाचे दाखले यावेळी दिले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रभाकर अंबाडे, अशोक त्रिभुवन, रमेश रमेश केसकर, दिलीप माळदे, संजय मचे, बळवंत वनगुजरे, आबासाहेब अंबाडे, नामदेव येवले, विजय कुंदे, बालाजी गुंडाळे, जनार्दन वाघचौरे, देवराव दहिफळे, दिगंबर म्हस्के, संभाजी पवार, उध्दव वाघमोडे, वाल्मिक रोडे, संजय ठोंबरे, शिवाजी गिते, नारायणे जालींदर, व्यंकट येरावार, ज्ञानेश्वर निकम, विजय जयवाळ, ज्ञानेश्वर उगले आदीं सेवेकरी म्हणून काम पहात आहेत.

## महाराष्ट्र निवडणूक निकालांचा अन्वयार्थ या विषयावर सोमवारी व्याख्यानाचे आयोजन



छत्रपती संभाजीनगर, दि. २२ : यशवंतराव चव्हाण सेंटर, जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर व एमजीएम विद्यापीठाचा जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या चाळीसाव्या पुण्यतिथीनिमित्त सोमवार, दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी आचार्य विनोबा भावे सभागृह, एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग येथे दुपारी १२ वाजता 'महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालांचा अन्वयार्थ' या विषयावर शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख व ज्येष्ठ राजकीय अभ्यासक प्रा. डॉ. प्रकाश पवार यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यावेळी यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.

२०२२ साली राज्यात झालेल्या राजकीय उलथापालथीनंतरची ही विधानसभा निवडणूक; नुकतीच पार पडली आहे. दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी या निवडणूकांचा निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे या निकालाचा अन्वयार्थ जनसामान्यांना यानिमित्ताने कळावा; यासाठी आदरणीय चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या व्याख्यानास सर्वांना प्रवेश खुला असून जास्तीत जास्त अभ्यासक, विद्यार्थी व नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## 'बड्या' अतिक्रमणधारकांना एमआयडीसीचे 'अभय'



वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : मागील काही दिवसांपासून एमआयडीसी प्रशासनाच्यावतीने अतिक्रमण हटाव मोहीम राबवून बर्याच ठिकाणचे अतिक्रमणे जमीनदोस्त केली परंतु काही बड्या अतिक्रमणधारकांकडे मात्र जाणून-बुजून कानाडोळा केल्याची चर्चा औद्योगिक परिसरात आहेत.

महाराणा प्रताप चौकातील पद्मपाणी बुद्ध विहाराकडे जाणार्या रस्त्यावरील बर्याच दिवसांचे अतिक्रमण एमआयडीसीने जमिनदोस्त केले त्याबद्दल एमआयडीसीच्या अधिकार्यांचे जनसामान्यांमधून कौतूक होत आहे. परंतु या ठिकाणी अर्धेच अतिक्रमण काढून टाकली आहेत परंतु याच मार्गावर पुढे असलेल्या सर्वच हॉस्पिटलने अतिक्रमण करून रहदारीचा रस्ता काबीज केलेला आहे. अतिक्रमीत रहदारीच्या रस्त्यावरच या हॉस्पिटलच्या वतीने सर्रासपणे चारचाकी व दुचाकी पार्किंग केल्या जात असल्याने नागरिकांना रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे एमआयडीसीच्या अधिकार्यांनी बड्या अतिक्रमण धारकांना अभय दिले की काय ! पुढील अतिक्रमण काढले आता हे अतिक्रमण कधी काढणार असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत

## महर्षी कण्व महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या.च्या दुसऱ्या शाखेचा शुभारंभ सारंग नितीन गडकरी यांच्या हस्ते

छत्रपती सभाजीनगर

कण्व ब्राम्हण समाज छ. संभाजीनगर ही एक सामाजिक संस्था आहे, या सामाजिक संस्थेने समाजिक भावनेतुन गेल्या ४ वर्षापुर्वी महर्षी कण्व महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या. हीपतसंस्था छ. संभाजीनगर येथील बारावी योजना, शिवाजीनगर येथे कार्यरत आहे... पहिल्या शाखेच्या यशस्वी वाटचालीनंतर येत्या २४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजता शॉप नं. ४, वरद गणेश हौसिंग सोसायटी, एनकेजीएसबी बँकेसमोर, वरद गणेश मंदिर रोड, समर्थनगर, छ. संभाजीनगर येथे दुसऱ्या शाखेचा दिमाखदार उद्घाटन सोहळा पार पडणार आहे.... या शाखेचे मुख्य उद्घाटक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे सुपुत्र सारंग नितीन गडकरी आहेत तर या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशनचे उपाध्यक्ष व वर्धमान नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष शांतीलाल सिंगी , भारतीय जनता पक्षाचे छ. संभाजीनगरचे अध्यक्ष शिरीष बोराळकर सर, देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे , संस्थापक अध्यक्ष, गायत्री महिला नागरी पतसंस्थाचे संस्थापक अध्यक्ष सी.ए. आर.बी. शर्मा, श्रीराम मंदिर समर्थनगरचे अध्यक्ष माणिक रत्नपारखी , शिवसेना (उबाठा) गटाचे उपजिल्हा प्रमुख तथा माजी नगरसेवक आनंद तांदूळवाडीकर , वारद गणेश मंदिर समर्थनगरचे अध्यक्ष सुनिल खोचे , माजी नगरसेवक समीर राजूरकर उपस्थित असणार आहे.

या पतसंस्थेचे उद्दीष्ट म्हणजे, महिलांना स्वतःच्या पायावर ऊभं राहता याव यासाठी जास्तीत जास्त कर्ज महिलांना दिले जाते. दुसरी गोष्ट ही महिलांनी महिलांसाठी सुरु केलेली पतसंस्था आहे. त्यानंतर सामाजिक भावना या उद्देशाने ही संस्था चालवली जाते. संभाजीनगरच नाही तर महाराष्ट्रातील हे पहिले उदाहरण आहे की येथे महिलांसाठी विशेष ५% हा स्पेशल इंटरेस्ट रेट आपण दिला आहे. त्याप्रमाणे आपण अपंग आणि विधवा महिलांसाठी ५०% रेट ऑफ इंटरेस्ट स्पेशल दिला आहे. येथील संचालक मंडळ हे एकाच कुटुंबातील नसुन समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील महिला या बँकेच्या संचालिका आहेत. पतसंस्थेमध्ये सध्या २००० सभासद, १२०० सेव्हींग अकांऊट, ४५० महिला व पुरुषांना कर्ज वाटप केलेले आहे. संस्थेच्या स्थापनेपासुन पतसंस्था दरवर्षी नफ्यामध्ये राहिली आहे तसेच गेल्या ३ वर्षात ऑडीट क्लास ए मिळाला आहे. अशी माहिती अध्यक्ष सौ. पल्लवी मालखरे, संचालिका डॉ. प्रिया भाले, सचिव सी. शोभा देशपांडे. तज्ञ संचालक श्री. लक्ष्मीकांत जयपुरकर यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्यातील तीनही विधानसभा मतदारसंघात आज मतमोजणी

## प्रत्येकी १४ टेबवर मतमोजणी होणार, मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

**विजय गुंडेकर**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार हिंगोली जिल्ह्यातील ९२-वसमत, ९३-कळमनुरी आणि ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघात सकाळी ८ पासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. मतमोजणीसाठी प्रत्येक फेरीसाठी प्रती मतदार संघ १४ टेबल लावण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे टपाली मतपत्रिकासाठी वेगळे टेबल लावण्यात आलेले असून प्रत्येक टेबलवर मतमोजणीसाठी एक पर्यवेक्षक, एक सहाय्यक पर्यवेक्षक आणि एक सूक्ष्म निरीक्षक यांची नेमणूक करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिली आहे.

९२-वसमत विधानसभा मतदार संघाची मतमोजणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परभणी रोड वसमत ता. वसमत जि. हिंगोली येथे होणार आहे. ९३-कळमनुरी विधानसभा मतदार संघाची मतमोजणी उपविभागीय अधिकारी कार्यालय कळमनुरी जि. हिंगोली येथे होणार आहे. तर ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघाची मतमोजणी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, एमआयडीसी, लिंबाळा मक्ता ता. जि. हिंगोली येथे होणार आहे.

हिंगोली जिल्ह्यातील ९२-वसमत, ९३-कळमनुरी आणि ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघासाठी बुधवार, दि. २० नोव्हेंबर रोजी १०२३ मतदान केंद्रावर मतदान पार पडले आहे. जिल्ह्यात एकूण मतदारांची संख्या ९ लाख ८४ हजार ७६४ मतदारांपैकी ७ लाख ११ हजार ४२९ मतदारांनी या निवडणुकीत मतदान केले आहे. त्यामध्ये ३ लाख ७५ हजार ३३९ पुरुष, ३ लाख ३६ हजार ८५ महिला आणि ५ तृतीयपंथीय मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा मतदार संघनिहाय मतमोजणी निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ९२-वसमत विधानसभा मतदार संघासाठी हिमांशुकुमार गुप्ता, ९३-कळमनुरी विधानसभा मतदार संघासाठी श्रीमती टी. एल. संगीता आणि ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघासाठी श्रीमती वंदना राव यांची मतमोजणी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. गोयल यांनी दिली आहे. हिंगोली जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघात ५३ उमेदवार निवडणूक रिंगणात असून, १०२३ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. जिल्ह्यात बुधवारी झालेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत ७२.२४ टक्के मतदारांनी मतदान केले आहे. यामध्ये वसमत विधानसभा मतदार संघ ७५.०५, कळमनुरी ७३.६३ आणि हिंगोली विधानसभा मतदार संघात ६८.१६ टक्के मतदान झाले आहे, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी सांगितले.

हिंगोली जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदार संघामध्ये मतदारांनी राष्ट्रीय कर्तव्यात सहभागी होत मतदानाचा हक्क बजावला आहे. त्याचा विधानसभा मतदार संघनिहाय तपशीलपुढीलप्रमाणे आहे. ९२-वसमत विधानसभा मतदार संघामध्ये २ लाख ४० हजार ७३७ मतदारांनी मतदान केले असून त्यामध्ये १ लाख २६ हजार ८१८ पुरुष, १ लाख १३ हजार ९१७ महिला तर २ तृतीयपंथी मतदाराने मताचे दान उमेदवाराच्या पारड्यात टाकले. ९३-कळमनुरी विधानसभा मतदार संघात २ लाख ४३ हजार ४९० मतदारांनी मतदान केले असून १ लाख २८ हजार ७७१ पुरुष, तर १ लाख १४ हजार ७१८ महिला व एका तृतीयपंथीयाचा समावेश आहे. तर ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघातील मतदानाची टक्केवारी सर्वात कमी असून त्यामध्ये २ लाख २७ हजार २०२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. यामध्ये १ लाख १९ हजार ७५० पुरुष, १ लाख ७ हजार ४५० महिला आणि २ तृतीयपंथीयाचा समावेश आहे.

हिंगोली जिल्ह्यातील एकूण मतदारांची संख्या ९ लाख ८४ हजार ७६४ मतदारांपैकी ७ लाख ११ हजार ४२९ मतदारांनी या निवडणुकीत मतदान केले आहे. त्यामध्ये ३ लाख ७५ हजार ३३९ पुरुष, ३ लाख ३६ हजार ८५ महिला आणि ५ तृतीयपंथी मतदारांने मतदानाचा हक्क बजावला आहे. मतदानाची एकूण टक्केवारी पाहता ९२-वसमत विधानसभा मतदार संघ (७५.०५ टक्के) अव्वलस्थानी राहिला असून हिंगोली विधानसभा मतदार संघातील मतदान (६८.१६ टक्के) सर्वात कमी राहिले आहे. ही निवडणूक पार पाडण्यासाठी निवडणूक निरीक्षक श्रीमती वंदना राव, खर्च निरीक्षक श्री. अर्जुन प्रधान, निवडणूक निरीक्षक (पोलीस) श्री. राकेशकुमार बन्सल आणि जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांच्या निगराणीखाली ही प्रक्रिया पार पडली. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर जिल्हाधिकारी खुशाल सिंह परदेशी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मंजुषा मुथा, जिल्हा पुरवठा अधिकारी राजेश पुंजाळ यांच्यासह सर्व पथक प्रमुख तसेच जिल्ह्यातील तीनही विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विकास माने (वसमत), श्रीमती प्रतिक्षा भुते (कळमनुरी) आणि समाधान घुटुकडे (हिंगोली) यांनी कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

## वसमत आणि कळमनुरी विधानसभा मतमोजणीसाठी निरीक्षक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**

भारत निवडणूक आयोगाने हिंगोली जिल्ह्यातील ९२-वसमत विधानसभा मतदार संघाच्या मतमोजणीसाठी हिमांशू गुप्ता, ९३-कळमनुरी विधानसभा मतदार संघाच्या मतमोजणीसाठी श्रीमती संगीता यांची तर ९४-हिंगोली विधानसभा मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी श्रीमती वंदना राव यांची मतमोजणी निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. श्रीमती वंदना राव ह्या यापूर्वी हिंगोली जिल्ह्यासाठी निवडणूक निरीक्षक (सामान्य) म्हणून काम करत आहेत.

९२-वसमत विधानसभा मतदारसंघाचे मतमोजणी निरीक्षक श्री. गुप्ता हे २०१३ उत्तर प्रदेश कॅडरचे एससीएस सेवेचे अधिकारी असून ८६०४०१५४७९ हा त्यांचा संपर्क क्रमांक आहे. ९३-कळमनुरी विधानसभा मतदार संघाचे मतमोजणी निरीक्षक श्रीमती टी. एल. संगीता तेलंगाणा कॅडरच्या २०२२ च्या एससीएस बॅचच्या अधिकारी असून त्यांचा संपर्क क्रमांक ९५१५६७८०१० असा आहे. तर ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघाच्या मतमोजणी निरीक्षक श्रीमती वंदना राव या सन २०१५ च्या दिल्ली कॅडरच्या आयएएस अधिकारी असून त्यांचा संपर्क क्रमांक ७८२०८६९२४८ असा आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या मतमोजणीसाठी आलेल्या मतमोजणी निरीक्षकांना कोणत्याही राजकीय पक्षांची, उमेदवारांची, नागरिकांची किंवा मतदाराची तक्रार असल्यास त्यांच्याशी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे निवडणूक विभागाकडून प्राप्त प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.



हिंगोली- येथील लिंबाळा मक्ता परिसरातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात आज मतमोजणी होणार असून या ठिकाणी पोलिस प्रशासनाच्यावतीने चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे. तसेच मतमोजणी केंद्रात प्रशासनाने मतमोजणीची तयारी पूर्ण केली आहे. छाया- विजय गुंडेकर

## मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर हिंगोली शहर आणि कळमनुरी येथील पर्यायी रस्त्याचा वापर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीची मतमोजणी दि २३ नोव्हेंबर रोजी होणार असून या मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर हिंगोली शहर आणि कळमनुरी येथील वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आले असून वाहन चालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

दि २३ नोव्हेंबर रोजी सकाळी सात वाजल्यापासून हिंगोली शहर आणि कळमनुरी येथील मार्गात बदल करण्यात आला आहे. कळमनुरी येथील राज्य महामार्गालगत असलेल्या तहसील कार्यालयात मतमोजणी होणार असल्यामुळे विधानसभेतील नागरिक, प्रतिनिधी यांची मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे रहदारसी अडथळा, अपघात होऊ नये तसेच कोणताही अनुचीत प्रकार घडू नये यासाठी सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आला आहे. त्यामध्ये शासकीय विश्रामगृह ते नगर पालिका पर्यंत वाहनांना पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. शिवणी ते लमाणदेव पर्यत जडवाहनांना बंदी, शासकीय विश्रामगृह ते जुने बसस्टँड पर्यंत चारचाकी वाहनांना बंदी आहे. हिंगोली ते नांदेड ये-जा करणारी वाहने कळमनुरी बायपासने जातील. कळमनुरीत येणारी चारचाकी वाहने, बसेस बायपास वाईपूल येथून कळमनुरीत येतील आणि त्याच मार्गाने परत जातील. इतर वाहने शासकीय विश्रामगृह ते विकास नगर महाराष्ट्र बँकेसमोरून शहरात येतील.

## मतमोजणीनंतर उमेदवारांचे आज भवितव्य मतपेटीतून बाहेर येणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**

हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, वसमत, कळमनुरी या तीनही विधानसभा निवडणुकीची मतमोजणी दि २३ रोजी होणार आहे. या मतमोजणीनंतर उमेदवारांचे भवितव्य मतपेटीतून बाहेर येणार आहे. मात्र मतदानानंतर उमेदवारांचे समर्थक आपणच विजयाचा गुलाल उधळणार असल्याचा दावा करीत असतांना दिसत आहेत.

दि २० नोव्हेंबर रोजी राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी मतदान पार पडले. यावेळी राष्ट्रवादी अणि शिवसेना यांच्या दोन गट झाल्यामुळे या पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे विभाजन झाले. त्यामुळे या निवडणुकीत मोठी रस्सीखेच पहायला मिळत आहे. निवडणुक प्रचाराच्या रणधुमाळीत सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमेकांवर जोरदार टीका केली. तसेच दोन्हीकडूनही महिला, शेतकरी, युवकांना तसेच वृध्दांना विविध योजनांची घोषणा करण्यात आली. मतदारांना खुश करण्याचा प्रयत्न दोन्ही बाजुंनी झाला.

साम-दाम-दंड-भेद याचा या निवडणुकीत मोठा वापर करण्यात आला. याशिवाय मराठा आरक्षण, शेतकरी समस्या तसेच महिला अत्याचार, महागाई, बेरोजगारी यांवर टीका टिप्पणी करण्यात आली. तर सत्ताधाऱ्यांनी राज्यात केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा जनतेसमोर मांडीत विविध कल्याणकारी योजनांची माहीती देण्यात आली.

मतदार राजाने दि २० नोव्हेंबर रोजी त्याचे मतदान मतपेटीत टाकल्यामुळे आता उमेदवारांचे भवितव्य दि २३ रोजी मतपेटीतून बाहेर पडणार आहे.

हिंगोली विधानसभा मतदारसंघात भाजचे तान्हाजीराव मुटकुळे, शिवसेना उबाठाच्या रूपाली पाटील गोरेगावकर, अपक्ष उमेदवार भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्यामध्येच खरी लढत झाली असून भाजपचे तान्हाजीराव मुटकुळे यांचे पारडे जड असल्याचे बोलल्या जात आहे. कळमनुरी मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे संतोष बांगर आणि उबाठा शिवसेनेचे डॉ संतोष टारफे यांच्यात दुरंगी लढत पहायला मिळाली. तसेच वसमत मतदारसंघात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे राजु नवघरे यांच्यात काट्याची टक्कर झाली असल्याची चर्चा आहे. तीनही विधानसभा मतदारसंघाचा निकाल दुपारी १ वाजेपर्यंत जवळपास स्पष्ट होण्याची शक्यता आहे. उमेदवारांची मात्र धाकधुक वाढली निकालानंतर चित्र स्पष्ट होणार आहे.

## संक्षिप्त वृत्त

### तपासासाठी गेलेल्या उपनिरीक्षकास धक्काबुक्की

हिंगोली- वसमत तालुक्यातील गिरगाव शिवारात तपासासाठी गेलेल्या उपनिरीक्षकासह जमादारास धक्काबुक्की करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कुरूंदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गिरगाव येथील एका चौकात ताटव्याचे हॉटेल आहे. गुरूवारी दि २२ रोजी नऊ वाजण्याच्या सुमारास याठिकाणी आलेल्या चौघांचा तेथील काही व्यक्तींसोबत वाद झाला. या वादानंतर किरकोळ हाणामारी झाली. यावेळी चौघांनी रागाच्या भरात ताटव्याचे हॉटेल पेटवून दिले. यामुळे एकच गोंधळ उडाला. आग विझविण्यासाठी अग्नीशमन दलास पाचारण करण्यात आले होते. या घटनेची माहीती मिळाल्यानंतर कुरूंदा पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक प्रवीण आगलावे, जमादार भालेराव यांचे पथक घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी तेथे वाद झालेल्या दोघांना शांत करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये पोलिसांनी दोघांनाही तक्रार देण्याबाबत सूचना दिली. मात्र यावेळी चौकशी करीत असतांना पांडुरंग नादे व इतर तिघांनी सदरची घटना आम्हीच केली असल्याचे सांगत पोलिसांसोबतच हुज्जत घालण्यास सुरूवात केली. पोलिस त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत असतांना पोलिसांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली तसेच पोलिसांसोबत झटापट केली. पोलिसांना ढकलून देत तेथून पळ काढला. याप्रकरणी कुरूंदा पोलिस ठाण्यात पांडुरंग नादरे व इतर तिघांविरोधात सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### खंजरचा धाक दाखवीत लुटण्याचा प्रयत्न

हिंगोली- शहरातील तिरूपतीनगर भागात गुरूवारी दि २१ नोव्हेंबर रोजी दुपारी एका घरात शिरलेल्या चोरट्याने खंजरचा धाक दाखवून लुटण्याचा प्रयत्न केला. मात्र यावेळी मुलगा घरात आल्याने त्याची चोरट्यांसोबत झटापट झाली. त्यानंतर चोरटे दुचाकीवर पसार झाले. झटापटील मुलाच्या मानेवर खंजर लागल्याने त्याला येथील खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. शहरातील तिरूपती नगर भागातील सुरेंद्र सावंत यांचे घर आहे. दुपारच्या सुमारास सावंत हे पेट्रोलपंपावर गेले होते तर त्यांच्या पत्नी व मुले घरी होते. दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास दुचारीवर दोन चोरटे आले. दोघेही काही वेळ घराच्या भिंतीजवळ घुटमळले. त्यानंतर त्यांनी घराची बेल वाजवली. त्यामुळे सावंत यांच्या पत्नीने दरवाजा उघडताच एका चोरट्याने खंजर काढून त्यांना दाखविला. या प्रकारामुळे त्या घाबरून गेल्या. दरम्यान याचवेळी त्यांचा मुलगा श्रेयस सावंत घरी आला. त्याला घरात चोरटा शिरल्याचे लक्षात आल्यानंतर त्याने चोरट्याशी झटापट सुरू केली. यामध्ये चोरट्याने त्याच्या मानेवर खंजरने वार केला.यामध्ये तो गंभीर जखमी झाला. या झटापटीनंतर चोरट्यांनी दुचाकीवरून पळ काढला.त्यानंतर सावंत कुटुंबियांनी जखमी श्रेयस यास उपचारासाठी खाजगी रूग्णालयात दाखल केले. घटनेची माहीती मिळताच शहर पोलिस ठाण्याचे पोनि नरेंद्र पाडळकर यांचे पथक घटनास्थळी गेले.

## पिंपळखुटा भागात दिवसाढवळ्या अवैध वाळू उपसा, महसूल विभाग झोपेत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**



तालुक्यातील पिंपळखुटा येथील नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर दिवसाढवळ्या वाळूमाफीया अवैधपणे वाळू उपसा करीत असूनही महसूल विभागाचे मात्र याकडे दुर्लक्ष होत आहे.

पिंपळखुटा येथील नदी पात्रातून राजरोसपणे अवैध वाळू उपसा केल्या जात आहेत. महसूल विभागाचा लाखो रूपयांचा महसूल बुडत आहे. या ठिकाणी गारमाळ, कारवाडी, भोगाव, खानापूर, सावरखेडा या भागात सर्रासपणे टिप्पर, ट्रॅक्टरने अवैधपणे वाळूची वाहतुक होत आहे. एका ट्रॅक्टरमागे पाच हजार रूपये घेतल्या जात आहेत. सदरील वाळू माफीया हे दिवसाढवळ्या या भागातून वाळूचा उपसा करीत असून पोलिस आणि महसूल विभाग मात्र याकडे जाणीवपूर्वक डोळे झाक करीत आहे. सदरील वाळू माफीयांना राजकीय लोकांचा वरदहस्त असल्यामुळे बिनधास्तपणे अवैधपणे वाळूचा उपसा करीत वाहनातून नेल्या जात आहे. याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.



हिंगोली- सध्या कडाक्याची थंडी पडत असल्यामुळे शहरात स्वेटर, मफलर, कानटोपी आदी उबदार कपड्यांची दुकाने थाटली असून नागरिक खरेदी करण्यासाठी गर्दी करीत आहेत. छाया- विजय गुंडेकर

## लाचेची मागणी करणाऱ्या तलाठ्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**

तक्रारदार यांचा आतेभाऊ शंकर झनक पाटोळे हा उजव्या डोळ्याने अपंग असून, त्याच्याकडे अपंग असल्याबाबतचे ४०% चे प्रमाणपत्र आहे. तक्रारदार यांचा आतेभाऊ शंकर झनक पाटोळे याला इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेचे अंदाजे १२०० ते १५०० रुपये मासिक लाभ मिळण्याकरिता फाईल तयार करून, ती तलाठी सज्जा मौजे फाळेगाव तालुका जिल्हा हिंगोली यांचे कार्यालयात दिनांक १३/ ११/२४ रोजी सादर केली असता, फाळेगाव सज्जाचे तलाठी माधव भालेराव यांनी सदर फाईल स्वतःकडे ठेवून घेऊन, फाईलवर त्यांची सही शिक्का देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १००० रुपयाची मागणी केली. त्यावरून दिनांक १३/११/२०२४ रोजी तक्रारदार यांनी तलाठी भालेराव लाचेची मागणी करत असल्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे रीतसर तक्रार दिली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.१४/११/२०२४रोजी शासकीय पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली असता, तक्रारदार यांचे आते भाऊ याचे फाईलवर सही शिक्का देण्यासाठी आलोसे माधव भालेराव यांनी तक्रारदार यांचेकडून शासकीय पंचासमक्ष १००० रू लाच रक्कम स्वीकारण्याची सहमती दर्शविली. त्यावरून दिनांक १४/११/२४ रोजी सापळा कारवाईचे आयोजन केले परंतु तलाठी भालेराव यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्यामुळे त्यांनी १००० रुपये लाचेची रक्कम स्वीकारली नाही. तलाठी माधव भालेराव यांनी तक्रारदार यांचे कडून शासकीय पंचासमक्ष १००० रुपये लाचेची रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावरून आलोसे माधव भालेराव यांचे विरुद्ध हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस अधीक्षक संदीप पालवे, अप्पर पोलिस अधीक्षक डॉ संजय तुंगार, पोलिस उपाधीक्षक विकास घनवट यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनायक जाधव, पोलिस निरीक्षक प्रफुल्ल अंकुशकर, उपनिरीक्षक महमद युनुस,विजय शुक्ला, तानाजी मुंढे, ज्ञानेश्वर पंचलिंगे, भगवान मंडलीक, गजानन पवार, शेख अकबर यांच्या पथकाने केली आहे.

## मतमोजणी परिसरात ड्रोनद्वारे निगराणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ नोव्हेंबर**

जिल्ह्यातील तीनही विधानसभा मतदारसंघाच्या मतमोजणी केंद्राच्या परिसरात पाच किमी अंतरापर्यंत ड्रोनद्वारे निगराणी ठेवली जाणार आहे. विनापरवानगी रॅली काढणे तसेच डीजे वाजविणाऱ्यांवर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिला आहे.

जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी तसेच वसमत विधानसभा मतदारसंघात शनिवारी दि २३ नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणीला सुरूवात होणार आहे. मतमोजणीसाठी येणाऱ्या उमेदवार प्रतिनिधींना मतमोजणी कक्षामध्ये प्रवेश दिला जाईल मात्र यावेळी त्यांची ओळखपत्रे तपासली जाणार आहेत. ज्या प्रतिनिधींकडे ओळखपत्रे नसेल त्यांना मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाणार नाही. तसेच मोबाईल नेण्यास मनाई करण्यात आली आहे.

मतमोजणी केंद्रावर मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. मतमोजणीच्यावेळी केंद्राच्या बाहेर घोषणाबाजी करणाऱ्या तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या व्यक्तींवर गुन्हे दाखल केले जाणार आहेत. तीन विधानसभा मतदारसंघासाठी पंधरा पथके तैनात असतील अशी माहीती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिली आहे.

## इति-उवाच...



मिलिंद देवरा यांनी मते मिळत नसल्याचे लक्षात आल्यानंतर राज ठाकरेंच्या नावाने खोटे पत्र व्हायरल केले. लाडक्या बहिणींचे हे लाडके भाऊ चिटर आहेत. प्रत्यक्षात मनसे किंग मेकर आहे, हे ४८ तासांनी कळेल.

**संदीप देशपांडे**, मनसे



वाढलेल्या मतांचा फायदा महायुतीला होईल. 'कटेंगे तो बटेंगे'चा फायदाही होणार आहे. एकनाथ शिंदे नेहमी योग्य दिशेने जातात. आम्ही त्यांचा शर्ट पकडून त्यांच्या मागे जाऊ. आम्हाला गुवाहाटी पार्ट २ करण्याची गरज नाही, आम्ही नवीन ठिकाणी जाऊ.

**संजय शिरसाट**, शिवसेना



गेल्या वेळेस एका ठिकाणी इतर पक्षातील आमदार घे, स्वत:च्या पक्षातील आमदाराला बसवा, समोर लढत द्यायला कुणीच नाही आणि आरशासमोर उभे राहून तलवारीने लढले होते. त्यामुळे माझा मुलगा युद्धात लढून जिंकेल, याचा मला अभिमान आहे.

**शर्मिला ठाकरे**, मनसे



अजितदादांना मत म्हणजे भारतीय जनता पक्षाला मत. त्यामुळे बारामतीतील मतदार दादांना जिंकवणार नाहीत. यावेळी ते ४० हजार मतांनी पडतील.

**उत्तमराव जानकर**, राकाँशप

# लाडकी बहीण योजनेमुळे मतदान टक्केवारीत वाढ!

**महिला मतदारांचे वाढते मतदान**

**◆ मुंबई, २२ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीतील मतदानात ६५.११ टक्के इतकी प्रभावी टक्केवारी नोंदवली गेली. रात्री ११.४५ वाजेपर्यंत हाती आलेल्या आकडेवारीनुसार, ही टक्केवारी मागील निवडणुकीपेक्षा जास्त होती. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात महिलांनी मतदानाला मोठ्या प्रमाणावर हजेरी लावली, ज्यामुळे लाडकी बहीण योजनेचा प्रभाव अधोरेखित झाल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.



लाडकी बहीण योजनेमुळे महिला मतदारांचे प्रमाण वाढल्याचे राजकीय वर्तुळात चर्चिले जात आहे. ही योजना महिलांसाठी विशेष सवलती आणि सुविधांचे आश्वासन देते, ज्यामुळे महिला मतदारांचे लक्ष वेधले गेले. या वाढलेल्या टक्केवारीचा फायदा महायुतीला होणार की महाविकास आघाडीला, हे निकालानंतर स्पष्ट होईल.

**विदर्भ-मराठवाड्यात महिलांची संख्या अधिक**

विदर्भात सरासरी ५८ ते ६० टक्के मतदान झाले, ज्यात महिलांचा सहभाग उल्लेखनीय होता. मराठवाड्यातही महिलांनी मोठ्या प्रमाणावर मतदान केले. ही वाढती टक्केवारी महत्त्वाची असून, ती निवडणुकीच्या निकालांवर परिणाम करू शकते. मुंबई शहराचा विचार करता, इतर भागांच्या तुलनेत मतदानाची टक्केवारी कमी राहिली. मात्र, राज्याच्या इतर भागांमध्ये मतदानाच्या आकडेवारीत लक्षणीय वाढ दिसून आली आहे.

**महिला मतदार निर्णायक ठरणार**

लाडकी बहीण योजना महिलांच्या हितासाठी केंद्रित असल्याने, महिला मतदारांचा ओघ ज्या पक्षाकडे आहे, त्याला याचा फायदा होण्याची शक्यता आहे. अनेक मतदारसंघांमध्ये महिला मतदारांची संख्या निर्णायक ठरू शकते.

विशेषतः जिथे मतदानाचे प्रमाण वाढले आहे, तेथील निकाल महायुतीच्या बाजूने जातील, अशी चर्चा आहे.

लाडकी बहीण योजनेमुळे महिलांमध्ये सरकारविषयी सकारात्मक भावना निर्माण झाल्या आहेत. राजकीय विश्लेषकांचे मत आहे की, या योजनेच्या प्रभावामुळे ग्रामीण महिलाही मोठ्या प्रमाणावर मतदानासाठी पुढे सरसावल्या.

राजकीय तज्ज्ञांच्या मते, महिलांचे वाढलेले मतदान अनेक मतदारसंघांमध्ये निकालाचे गणित बदलू शकते. लाडकी बहीण योजनेमुळे निर्माण झालेला हा ट्रेंड निवडणुकीतील प्रमुख घटक ठरू शकतो. ◂(वृत्तसंस्था)

# विरोधी पक्षनेताच सरकारमध्ये सहभागी झाला

## २०१४ च्या विधानसभा निवडणुकीनंतरच्या नाट्यपूर्ण घटना

**श्यामकांत जहागीरदार**



**◆ नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

१९९५ नंतर २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपा-सेना युतीची सत्ता आली होती. भाजपाचे देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. १९९५ मध्ये महाराष्ट्रात शिवसेना-भाजपा युतीची सत्ता आली होती; कारण त्यावेळी शिवसेनेच्या आमदारांची संख्या जास्त होती. शिवसेनेचे मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले होते. २०१४ मध्ये मात्र भाजपा आमदारांची संख्या शिवसेनेपेक्षा जास्त होती. परिणामी, भाजपाचे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले होते. त्यावेळचे सरकार हे भाजपा-सेना युतीचे होते.

२०१४ ची विधानसभा निवडणूक जागावाटपावरून मतैक्य न झाल्यामुळे शिवसेना आणि भाजपाने वेगवेगळी लढवली होती. या निवडणुकीत २५ वर्षांपासून असलेली भाजपा-सेना युती पहिल्यांदा तुटली होती. विशेष म्हणजे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातही जागावाटपाचा समझोता होऊ शकला नाही. या दोन्ही पक्षांची १५ वर्षांची आघाडी या निवडणुकीत पहिल्यांदा तुटली. त्यामुळे राज्यात प्रथमच भाजपा, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे चार पक्ष वेगवेगळे लढले होते.



या निवडणुकीत राज्यात कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते. सर्वाधिक १२२ जागा जिंकत भाजपा सर्वांत मोठा पक्ष ठरला होता. राज्यात भाजपाने स्वबळावर जिंकलेल्या आतापर्यंतच्या या सर्वांत जास्त जागा होत्या. भाजपा समर्थित एक आमदारही निवडून आला होता, त्यामुळे भाजपाचे संख्याबळ १२३ होत होते. भाजपाला बहुमतासाठी २२ जागा कमी पडत होत्या. शिवसेनेने दुसऱ्या क्रमांकाच्या ६३ जागा जिंकल्या होत्या. काँग्रेसने ४२ तर राष्ट्रवादी काँग्रेसने ४१ जागा जिंकल्या होत्या. अपक्षांना ७ तर अन्यांना १३ जागा मिळाल्या होत्या. भाजपाला २७.८० टक्के मते मिळाली होती. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या शिवसेनेने १९.३० टक्के मते घेतली. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या जागांच्या संख्येत तसेच मतांच्या टक्केवारीत फारसा फरक नव्हता. काँग्रेसला १८ टक्के तर राष्ट्रवादी काँग्रेसला १७.२० टक्के मते मिळाली होती.

२००९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने ८२ तर राष्ट्रवादी काँग्रेसने ६२ जागा जिंकल्या होत्या. भाजपाने ४६ तर शिवसेनेने ४५ जागा जिंकल्या होत्या. राज ठाकरे यांच्या मनसेने आपल्या इतिहासातील सर्वाधिक १३ जागा जिंकल्या होत्या.

२००९ मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीने बहुमतांचा आकडा गाठला होता. काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार उपमुख्यमंत्री झाले होते. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीनंतरच भाजपाला आपली ताकद समजली. तोपर्यंत राज्यात शिवसेना मोठा भाऊ तर, भाजपा लहान भाऊ होता. २०१४ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने शंभरावर जागा जिंकत सर्व पक्षांना मागे टाकले. त्याचा नंतरच्या काळात भाजपाला फायदाच झाला. २०१४ मध्ये शिवसेनेने दिलेल्या जागांवर भाजपाने निवडणूक लढवली असती, तर भाजपा राज्यात नेहमीसाठी दुय्यम भूमिकेतच राहिला असता. राज्यात त्रिशंकू विधानसभा असल्यामुळे तसेच कोणत्याही पक्षाला स्वबळावर स्पष्ट बहुमत नसल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांनी भाजपाला सरकार बनवण्यासाठी परस्पर पाठिंबा देऊन टाकला. शिवसेना पुन्हा भाजपाजवळ येऊ नये म्हणून पवारांनी खेळलेली ही खेळी होती, असे म्हणतात.

२०१४ मध्ये सरकार स्थापन करण्यासाठी राज्यात अनेक नाट्यपूर्ण घटना घडल्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. नंतर आवाजी मतदानाने विधानसभेत बहुमत सिद्ध केले. शिवसेनेचे एकनाथ शिंदे विरोधी पक्षनेते होते, त्यांनी मतविभाजनाची मागणी केली, पण ती फेटाळून लावण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केल्यामुळे भाजपावर टीकाही झाली. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्याने आपल्याला फारकाळ सरकार चालवता येणार नाही, हे भाजपाच्या लक्षात आले. सरकारच्या स्थैर्यासाठी जुना मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेला जवळ आणण्याच्या हालचाली भाजपाने सुरू केल्या. भाजपा नेते आणि शिवसेनेचे उद्धव ठाकरे यांच्यात चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या. शिवसेनेलाही सरकारमध्ये सहभागी होण्यात आपला राजकीय फायदा दिसत होता. त्यामुळे शिवसेनेने भाजपाला पाठिंबा देत सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. पाच वर्ष हे सरकार यशस्वीपणे चालले आणि देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून आपला पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. ■

# मुख्यमंत्रिपदावरून निकालापूर्वी भांडण!

**पटोले म्हणाले, काँग्रेसचाच असेल**

**उबाठानेही चंग बांधला**



**◆ मुंबई, २२ नोव्हेंबर**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले यांनी विधानसभा निवडणुकीच्या निकालापूर्वीच महाविकास आघाडी सरकारबाबत मोठा दावा केला. ते म्हणाले, महाराष्ट्रात काँग्रेसच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत येईल. काँग्रेसचे सर्वाधिक आमदार निवडून येतील. त्यामुळे मुख्यमंत्री काँग्रेसचाच असेल. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी नाना पटोले यांच्या विधानाला उत्तर दिले. राऊत म्हणाले, हे विधान आम्ही मान्य करणार नाही. महाविकास आघाडीचे सर्व घटक पक्ष एकत्र बसून निर्णय घेतील. काँग्रेस हायकमांडने नाना पटोले यांना मुख्यमंत्रिपदासाठी सांगितले असेल, तर राहुल गांधी, मल्लिकार्जुन खडगे यांनी तशी अधिकृत घोषणा करावी.

यापूर्वीही नाना पटोले आणि संजय राऊत यांच्यात वाद झाले आहेत. हरयाणामधील निवडणुकीत काँग्रेसच्या पराभवानंतर राऊत यांनी टीका केली होती, ज्यावर पटोले यांनी आक्षेप घेतला होता. त्यांनी म्हटले की, गठबंधनाबाबत अशा प्रकारे सार्वजनिक आरोप करणे अयोग्य आहे.

जागावाटपाच्या मुद्यावरूनही मुख्यमंत्रिपदावरून उबाठा आणि काँग्रेसमध्ये चांगलीच जुंपली होती. उबाठाचा उद्धव ठाकरेंच्या चेहऱ्यासाठी आग्रह होता. मात्र, काँग्रेसच्या नाना पटोलेंनी ते मान्य केले नव्हते. जागावाटपातही काँग्रेसने जास्त जागा मागितल्या होत्या. शरद पवारांनी या दोघांमधील वाद कसाबसा शमवला होता. आता निकालाआधीच मुख्यमंत्रिपदाचे वेध लागल्याने महाविकास आघाडीत रस्सीखेच होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रत्यक्ष निकालानंतर स्थिती काय राहील, हे मात्र दोन दिवसांनंतरच समजणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# मतदानातही पुणेकरांचे 'एक ते चार'!

**◆ पुणे, २२ नोव्हेंबर**

पुण्यातील लोकांविषयी अनेक समजुती ख्यात आहेत. त्यातही दुपारी एक ते चार पुणेकर कुठेही न जाता, सर्व कामे बाजूला सारून वामकुक्षी घेतातच, या समजुतीचाही समावेश आहे. याच धोरणाला कायम ठेवत दुपारच्या वेळी पुण्यातील मतदानाची प्रक्रिया मंदावली होती.



मतदान केंद्रात भ्रमणध्वनी नेण्यावरून झालेले वाद आणि मतदान यंत्र काही काळ बंद पडण्याचा अपवाद वगळता पुण्यातील आठही विधानसभा मतदारसंघांतील मतदानाची प्रक्रिया बुधवारी शांततेत पार पडली. मतदान केंद्रांबाहेर सकाळी लागलेल्या रांगा, दुपारी १ ते ४ या काळात मंदावलेला वेग, मतदान केंद्रांबाहेर राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांची लगबग, सुसज्ज प्रशासकीय व्यवस्था आणि कडेकोट पोलिस बंदोबस्त असे आश्वासक चित्र मतदान प्रक्रियेवेळी दिसून आले. ज्येष्ठ नागरिकांसोबतच 'लाडक्या बहिणीं'चा मतदान प्रक्रियेतील लक्षणीय सहभाग ही मतदानाची वैशिष्ट्ये ठरली.

दुपारी एक ते चार या कालावधीत कसबा, खडकवासला मतदारसंघ वगळता अन्यत्र तुलनेने कमी मतदान झाले. दुपारी चारनंतर मतदार बाहेर पडल्याने मतदानाचा वेग वाढला. त्यामुळे अनेक मतदार केंद्रांबाहेर सहानंतरही मतदारांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसून आले.

लोकसभा निवडणुकीत दुबार मतदार, नावे वगळली गेल्याच्या तक्रारी, मतदान केंद्र बदलण्यात आल्याचा अनुभव अनेकांनी घेतला होता. विधानसभा निवडणुकीत मात्र त्याची पुनरावृत्ती झाली नाही. राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी, तर प्रशासकीय पातळीवर कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून दक्षता घेण्यात आली. लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत मतदार याद्यातील घोळही फारसा दिसून आला नाही. त्यामुळे केंद्राबाहेर गोंधळ झाला नाही. बोगस मतदानाच्या तक्रारीही झाल्या नाहीत. ◂(वृत्तसंस्था)

# एक्झिट पोलनंतर मविआच्या हालचाली सुरू

## जयंत पाटील, बाळासाहेब थोरात अपक्ष, बंडखोरांच्या संपर्कात


**◆ मुंबई, २२ नोव्हेंबर**

राज्यातील विधानसभा निवडणुकीचे मतदान संपल्यानंतर विविध संस्थांच्या एक्झिट पोल्सचे निकाल समोर आले होते. यात महाविकास आघाडी आणि महायुतीला संमिश्र कौल मिळाल्याने संभ्रमाची परिस्थिती निर्माण झाली होती. या पृष्ठभूमीवर महाविकास आघाडीने फासे टाकायला सुरुवात केली आहे. राज्यात कोणत्याही आघाडीला बहुमत न मिळाल्यास अपक्षांची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. त्यामुळे महाविकास आघाडीने बंडखोर आणि अपक्ष उमेदवारांशी संपर्क साधायला सुरुवात केली आहे.

मतदान संपल्यानंतर महाविकास आघाडीची बैठक बोलावण्यात आली आहे. गुरुवारी सकाळपासून महाविकास आघाडीचे प्रमुख नेते कामाला लागले आहेत. जे बंडखोर विजयी होऊ शकतात, त्यांच्याशी बाळासाहेब थोरात आणि जयंत पाटील यांच्या माध्यमातून संपर्क साधायला सुरुवात झाली आहे. यामुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे.

विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढला आहे. त्यामुळे हा वाढीव टक्का कोणासाठी फायदेशीर ठरणार, याबद्दल तर्कवितर्क लावले जात आहेत. महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये काँटे की टक्कर झाल्यास कोणालाही बहुमत मिळणार नाही, असेही अंदाज व्यक्त केले जात आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# मतदारांसाठी सेल्फी पॉईंट ठरला आकर्षण




**◆ मुंबई, २२ नोव्हेंबर**

विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यापासून प्रचाराचा प्रचंड धुरळा उडाला. हटके रिल्स, व्हिडीओज आणि फोटोंच्या माध्यमातून तरुणांनी विधानसभा निवडणुकीत प्रचारात रंगत आणली. मतदानानंतर सेल्फीची क्रेझ असणाऱ्यांसाठी ठिकठिकाणी उभारलेले सेल्फी पॉईंट आकर्षणाचा विषय ठरला.

निवडणूक सुरू झाल्यापासून राजकीय पक्षांनी सोशल मीडिया सांभाळणारी स्वतंत्र यंत्रणा राबविली. त्यासाठी स्वतंत्र सोशल मीडिया वॉररूमदेखील सज्ज ठेवण्यात आली होती. मतदानाच्या आदल्या दिवशीपासून सोशल मीडियावर मतदान करण्याचे आवाहन केले जात होते. प्रत्येक राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आपापल्या उमेदवारांचे व्हिडीओ, रिल्स बनवून सोशल मीडियावर व्हायरल केले. यात तरुणाही मागे राहिली नाही.

निवडणुकीच्या दिवशी मतदानासाठी आवाहन केले. अनेकांनी मतदान केल्याची निशाणी दाखवत काढलेले फोटो व्हॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर शेअर केले. सहकुटुंब मतदान केल्यानंतर सेल्फी घेऊन समाज माध्यमावर अपलोड करण्यात आल्या, तर काही जणांनी निवडणुकीत उमेदवार, राजकीय नेते, सेलिब्रिटी यांच्यासमवेत फोटो काढून समाज माध्यमांवर व्हायरल केले.

**नवमतदारांना सेल्फीचा मोह**

पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजावणाऱ्या तरुण-तरुणींमध्ये उत्साह दिसून आला. आई-वडिलांसमवेत मतदान केंद्रात जाऊन मतदान केल्यावर सेल्फी घेण्याचा मोह अनेकांना आवरला नाही. पहिल्यांदा मतदान केल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. मतदान केल्याची बोटावरील शाईची खूण मित्र-मैत्रिणींना दाखवून अनेकांनी एकत्रित फोटोसेशनही केले. ◂(वृत्तसंस्था)

# कोल्हापूर राज्यात भारी!

**निवडणुकीत उच्चांकी ७६.१७ टक्के मतदान**



**◆ कोल्हापूर, २२ नोव्हेंबर**

यंदाही वाढत्या टक्केवारीची परंपरा कायम ठेवत कोल्हापूर जिल्हा आघाडीवर राहिला आहे. करवीर मतदारसंघात जिल्ह्यातील सर्वाधिक मतदान झाले. जिल्ह्याने निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याची परंपरा यंदाही कायम ठेवली आहे. या निवडणुकीत उच्चांकी ७६.१७ टक्के इतके मतदान झाले. त्यामुळे कोल्हापूर राज्यात भारी ठरला.

जिल्ह्यातील करवीर मतदारसंघ राज्यात अव्वल राहिला. येथे ८४.९५ टक्के मतदान झाले. गेल्या तीन निवडणुका पाहिल्यास ही टक्केवारी वाढतच आहे. यंदाही वाढत्या टक्केवारीची परंपरा कायम ठेवत कोल्हापूर जिल्हा आघाडीवर राहिला. २००९ मध्ये ७३.९१ टक्के, २०१४ मध्ये ७५ टक्के, २०१९ मध्ये ७४.०८ टक्के मतदान झाले होते. या निवडणुकांमध्ये करवीर मतदारसंघाने राज्यात बाजी मारली होती.

जिल्ह्यातील दहाही मतदारसंघात चुरशीने सुमारे ७६.१७ टक्के मतदान झाले. जिल्हा प्रशासनाकडून मतदार नोंदणी व मतदान जनजागृतीसाठी उपक्रम राबविण्यात येत असतात. त्याचबरोबर मतदार नोंदणीसाठी ऑनलाईन सॉफ्टवेअरचा वापर करून स्वत:हून मतदानासाठी प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे मतदानाची टक्केवारी प्रत्येक निवडणुकीत वाढतच असल्याचे दिसून येत आहे. ◂(वृत्तसंस्था)

# 'लोकल' बंद न ठेवता 'त्यांनी' केले मतदान

## रेल्वे प्रशासनाची प्रशंसनीय व्यवस्था

**◆ मुंबई, २२ नोव्हेंबर**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर रेल्वे प्रशासनाने अत्यावश्यक सेवांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी खास सवलत दिली होती. मुंबईची जीवनरेखा असणारी लोकल बंद न ठेवता तेथील कर्मचाऱ्यांनी व्यवस्थित मतदान केले, हे विशेष.

मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या सेवा बुधवारी १०० टक्के सुरू असल्याने प्रशासनाने रेल्वे

कर्मचाऱ्यांना कामाच्या वेळेत चार तासांची विशेष सुटी दिली होती, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. असे असले तरी, रेल्वेची नियमित सेवा अबाधित राहिली असून, प्रवाशांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, याची काळजी घेण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. अत्यावश्यक सेवा वगळता इतर कर्मचाऱ्यांना मतदान करता यावे, यासाठी सुटी देण्यात आली होती.

मध्य आणि पश्चिम रेल्वेने सकाळी ७ ते सायंकाळी ६ दरम्यान कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा, म्हणून ड्यूटीच्या वेळेनुसार चार तासांची सुटी दिली होती या सवलतीचा लाभ घेणाऱ्यांमध्ये कमर्शिअल स्टाफ, मोटारमन, गार्ड, ट्रेन ऑपरेशनशी संबंधित कर्मचारी आणि इतर अत्यावश्यक सेवा देणारे कर्मचारी यांचा समावेश होता. ◂(वृत्तसंस्था)

**१२ अतिरिक्त लोकल**

मतदानाच्या ड्यूटीवरील कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेतर्फे बुधवारी १२ अतिरिक्त लोकल चालविण्यात आल्या. मुख्य मार्गावरील सीएसएमटी ते कल्याण अप-डाउन आणि सीएसएमटी ते पनवेलदरम्यान या लोकल चालविण्यात आल्या. ■

# प्रणिती शिंदेंची गाडी फोडण्याआधी तुझी गाडी फोडतो

**काँग्रेसच्या युवक नेत्याचा इशारा**

**◆ सोलापूर, २२ नोव्हेंबर**

काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूर दक्षिणमध्ये काँग्रेसने ठाकरे गटाच्या अमर पाटील यांच्याऐवजी अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा दिल्याने महाविकास आघाडीमध्ये वादाची ठिणगी पडली आहे. ठाकरे गटाचे उपनेते शरद कोळी यांनी या दोन्ही काँग्रेस नेत्यांवर सडकून टीका केली. शरद कोळी यांनी प्रणिती शिंदे भाजपाच्या बी टीम असल्याचा, प्रणिती शिंदेंनी भाजपासोबत आतून हातमिळवणी केली असून, त्या भाजपाचा प्रचार करतात, असा आरोप केला. मात्र, शिंदे कुटुंबाची ही शेवटची खासदारकी आहे, यापुढे तुम्हाला खासदारकी मिळणार नाही, असा इशाराही शरद कोळी यांनी दिला. सुशीलकुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे यांनी सोलापूरचा विकास केला नाही. शिंदे कुटुंबाने आमचे आभार मानण्याऐवजी पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले. ही माणसं धोकेबाज निघाली, गद्दाराकडून काय अपेक्षा करणार, असा हल्लाबोल त्यांनी केला. आता काँग्रेसकडूनही शरद कोळी यांच्यावर पलटवार करण्यात आला आहे.

**काँग्रेसकडून गाडी फोडण्याचा इशारा**

सोलापुरात ठाकरे गट आणि काँग्रेसमधील वाद टोकाला गेला आहे. प्रणिती शिंदेंची गाडी फोडण्याआधी तुझी गाडी फोडतो, असा इशारा युवक काँग्रेसच्या शहराध्यक्षाने शरद कोळींच्या कार्यालयापुढे जाऊन दिला. काँग्रेसच्या युवक नेत्याने म्हटले आहे. ठाकरे गटाचे उपनेते शरद कोळींनी काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे आणि सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रतिमेला जोडेमारो आंदोलन केले होते. या आंदोलनानंतर आज युवक काँग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. शरद कोळींची गाडी ज्या दिवशी कार्यालयासमोर थांबेल, त्या दिवशी ती गाडी फोडणार, असा इशारा काँग्रेसने दिला. ◂(वृत्तसंस्था)

# मतमोजणी केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकी कालावधीत जिल्हयातील परतूर, घनसावंगी, जालना, बदनापूर, भोकरदन या विधानसभा मतदार संघातील क्षेत्रात शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी व अनाधिकृत कृत्य होऊ नये याकरिता जिल्हादंडाधिकारी डॉ. पांचाळ यांनी दि. २३ रोजी मतमोजणी दिवशी मतमोजणीच्या ठिकाणी २०० मिटर परिसरात मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ आद-ेशाव्दारे खालील कृत्य करण्यास मनाई केली आहे.

या आदेशानुसार मतमोजणीच्या २०० मीटर परिसरात बेकायदेशीर जमाव करणे, हत्यार बाळगणे, धुम्रपान करणे, ज्वलनशील पदार्थ नेणे, कोणत्याही सार्वजनिक वा खाजगी जागेमध्ये ध्वनिवर्धक किंवा ध्वनिक्षेपक यासारखे मानवी आवाजाचे वर्धन करणारा किंवा तो तसाच्या तसा ऐकवणारा उपकरणसंच वापरणे किंवा चालविणे, कोणत्याही प्रकारचे वाहन आणणे, परिसरात मोबाईल, कॉडलेस फोन, वायरलेस सेट आणणे,




मतमोजणीच्या २०० मी. परिसरात हॉटेल, टेलिफोन बुथ, झेरॉक्स मशीन, फेरीवाले यांनी व्यवसाय करणे आदींना मनाई करण्यात आली आहे. मतमोजणी केंद्राचे २०० मीटर परिसरात नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना वगळून पाच किंवा पाचपेक्षा जास्त व्यक्ती येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

मतमोजणी केंद्राचे २०० मीटरच्या आत संबंधीत पक्षाचे उमेदवाराच्या चिन्हांचे प्रदर्शन करणेस व निवडणूक विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कामकाजासाठी नियुक्त असलेल्या अधिकारी/कर्मचारी व्यक्ती व्यतिरिक्त इतर व्यक्तींना वैध ओळखपत्र असलयाशिवाय प्रवेश करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे. सदर आदेश हे निवडणूकीच्या कामकाजासाठी नियुक्त्त अधिकारी/कर्मचारी यांना लागु राहणार नाहीत. सदर आदेश हे निवडणूकीची कामे हाताळतांना कायदा व सुव्यवस्-थेचा प्रश्न निर्माण होवु नये म्हणुन दिनांक २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ५ वा. पासून ते मतमोजणीची प्रक्रिया संपेपर्यंत अंमलात राहणार असल्याचे जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी कळविले आहे.

## संक्षिप्त

### आनंद आखाडा येथे पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



श्रीक्षेत्र नांगरतास येथील महादेव संन्यास आश्रम पंचायती आनंद आखाडा येथे तपोनिधी सद्गुरु महंत रामगिरीजी महाराज व सेवागिरी जी महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त भाविकांच्या श्रमदानातून जय्यत तयारी सुरु आहे. दरवर्षी या सोहळ्यास भाविकांची मोठी गर्दी असते.

मठाधिपती महंत भागवतगिरजी महाराज व महंत बालकगिरीजी महाराज मार्गदर्शनाखाली आयोजित पुण्यतिथी सो-हळानिमित्त पंचक्रोशीतील भाविक भक्तांकडून सेवेकरी सेवा करण्यासाठी सध्या नांगरतास येथे येत आहेत. या ठिकाणी येऊन मोठ्या प्रमाणात अन्नदान व महाप्रसाद तयार करण्यासाठी लागणारे इंधन फोडणे, प्रसाद मार्ग बनवणे, परिसर स्वच्छता, वृक्षांची देखभाल, दर्शन रांग आदी सेवा प्रत्यक्षात सुरू झाली आहे. काही सेवकरी यांनी स्वतःची जेसीबी मशीन, ट्रॅक्टर देखील सेवेसाठी या ठिकाणी पाठवले आहेत. या तीनदिवसीय सोहळ्यामध्ये सद्गुरूंच्या मूर्तीचा अभिषेक, पूजन, कीर्तन, भजन, विष्णुसहस्त्रनाम, हनुमान चालीसा, हरिपाठ , दीप महोत्सव चक्रीभजन हरिपाठ आदी धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. भक्तांसाठी महाप्रसादाचे देखील आयोजन केले आहे.

### तेजज्ञान फाऊंडेशनतर्फे ध्यान महोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

हॅपी थॉट नावाने ओळखली जाणारी तेजज्ञान ग्लोबल फाऊंडेशन ही आध्यात्मिक सेवाभावी संस्था आपल्या स्थापना दिनाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात प्रवेश करत आहे. या विशेष प्रसंगी फाऊंडेशन तर्फे दि. २४/११/२०२४, रविवार रोजी सोमेश मंगल कार्यालय, गणपती नेत्रालय समोर, जालना येथे रजत जयंती ध्यान महोत्सवफ (सिल्व्हर ज्युबिली सेलिब्रेशन) आयोजित करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन अतंरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त श्रीमद् भागवत कथा प्रवक्ता प.पू. पंडित मनोजजी महाराज गौड एवम् जालन्याचे सुप्रसिद्ध उद्योगपती मा.श्री. सुनिलजी विनोदरायजी रायठठ्ठा यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. तेजज्ञान फाऊंडेशनचे संस्थापक तेजगुरू सरश्री यांनी जीवनात ध्यान व आध्यात्मिक साधनेचे महत्व पटवून देत लाखो लोकांच्या जीवनात आनंद आणि शांती निर्माण केली आहे. तेजज्ञान फाऊंडेशनतर्फे आयोजित हा महोत्सव ध्यानाच्या माध्यमातून जगभर शांतता आणि आनंद पसरवण्याच्या उद्दिष्टाला एक नवीन दिशा देईल. या महोत्सवात सहभागी होण्यासाठी फाऊंडेशन सर्व साधक, ध्यानप्रेमी आणि नागरिकांना उत्साहपूर्वक आमंत्रित करते. आपल्या जीवनात ध्यानाचा ठाव घेण्यासाठी आणि आनंद व शांततेच्या दिशेने एक पाऊल टाकण्यासाठी या महोत्सवाचा एक भाग व्हा !

### मतमोजणीनिमित्त छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील वाहतुकीच्या मार्गात बदल

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्ह्यात जालना विधानसभा मतदारसंघ- १०१ मतदारसंघाची मतमोजणी शनिवार दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी जालना येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पार पडणार आहे. तसेच बदनापुर विधानसभा (अ.जा.) मतदारसंघाची बदनापुर येथील कृषी महाविद्यालय मतमोजणी सकाळी ७ वाजेपासुन फेरनिहाय मतमोजणी संपेपर्यंत चालणार आहे. रस्ता मोकळा रहावा व रस्त्यावर वाहने उभी राहुन मार्गात अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, या दृष्टीने वाहतुकीच्या नियमनासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ अन्वये या मार्गावरील वाहतुक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. असे आदेश पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी जारी केले आहेत.

छत्रपती संभाजीनगरकडुन येणारी व ग्रेडर टी पॉइंट पासुन ते छत्रपती संभाजीनगर जाणारी वाहतुक ही हॉटेल इंद्रायणी चौक चंदनझिरा पासुन ते ग्रेडर टि पॉईट पर्यंत छत्रपती संभाजीनगर ते जालना हायवे रोडवरुन एक मार्गी म्हणजे जालना ते छत्रपती संभाजीनगर जाणाऱ्या रस्त्याने येईल व जाईल.

जालना ते छत्रपती संभाजीनगर, जालना एमआयडीसीकडे जाणारी वाहतुक ही ग्रेडर टी पॉंईटपासून ते हॉटेल इंद्रायणी चौक चंदनझिरापर्यंत जालना ते छत्रपती संभाजीनगर हायवे रोडने एकमार्गी जाईल व येईल.

जालना ते छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी व छत्रपती संभाजीनगरकडुन जालनाकडे येणारी वाहतुक बदनापुर ते सोमठाणा फाटा व सोमठाणा फाटा ते बदनापुर अशी एक मार्गी म्हणजे जालना ते छत्रपती संभाजीनगर जाणाऱ्या रस्त्याने येईल व जाईल. हा आदेश दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ५ वाजेपासुन मतमोजणी संपेपर्यंत अंमलात राहील. असेही आदेशात नमुद केले आहे.

## सागवान माडी माळवद् आगीत जळून खाक; लाखो रुपयांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

येथील शहरातील ब्राह्मण गल्ली येथील दिगंबर नाईक यांचे राहते घर आगीच्या भक्षस्थानी पडल्याची घटना काल (ता.२०) बुधवार रोजी रात्री अंदाजे ११:०० वा.दरम्यान घडली असून या आगीत लाखो रुपयाचे जुने सागवान माडी माळवद जुळून खाक झाल्याची घटना घडली आहे. या विषयी सविस्तर वृत्त असे की, ता.२० रोजी विधानसभा निवडणुकीचा मतदान करण्याचा दिवस असल्याने मतदान आटपून शहरातील नागरिक आप आपल्या घरी झोपेत असताना दिगंबर नाईक यांच्या घरातून धूर व आगीचे लोट येताना काही जणांना दिसले त्यांनी जवळपासचा नागरिकांना जागे करे पर्यंत आगीने रौद्र रुप धारण केले होते.

या वेळी नागरिकांनी अग्निशामक बंबाला फोन लावला असताना मंठा येथील अग्निशमन दलाची बंब अर्ध्या तासात पोहोचला तोपर्यंत आगीने स्वरूप व्यापक सवरुपाचे झाले होते.सदरील आग गल्लीतील इतर घरात पोहोचण्याची शक्यता होती तोपर्यंत शेजारील नागरिकांनी आपापल्या बोरच्या पाण्याने विझविण्याचा प्रयत्न केला परंतु आग आटोक्यात येण्याची शक्यता दिसत नव्हती.

अग्निशामक दलाचा बंब आल्यानंतर त्यांनी आग विजवनाकरिता शर्तीचे प्रयत्न केले रात्री जवळपास चार तासानंतर आग आटोक्यात आली सकाळी सुमारे चार वाजता आग विझवून अग्निशामक दलाचे कर्मचारी निघून गेले परंतु सकाळी आठ वाजता पुन्हा त्याच घरातून धूर व आगीचे लोट येताना दिसत असल्याने वर मंठा येथील अग्निशमन दलाची गाडी नाकाम झाल्यामुळे परतुर येथील अग्निशामक दलाच्या बंबाला दूरध्वनी द्वारे संपर्क केला असता संबंधित गाडीही मतदान प्रक्रिया करता त्या ठिकाणी ठेवण्यात आलेली होती नंतर जालना येथील अग्निशामक दलाची गाडी आल्यानंतर त्यांनी आगीवर पूर्णपणे नियंत्रण दुपारी एक वाजेपर्यंत मिळविले होते. विशेष म्हणजे या घरात मागील ७ ते ८ वर्षापासून कोणीही राहत नसल्यामुळे जीवित हानी झाली नाही संबंधित घर जरी जुने असून सागवानी माळवदाचे असल्यामुळे अग्नीने लवकर पेट घेतला होता ही आग कशामुळे लागली हे अद्यापही समजलेले नाही.

## परतूरला १४ टेबल्सवर २६ फेऱ्यांद्वारे होणार मतमोजणी

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीचा निकाल शनिवारी (दि. २३) रोजी घोषित करण्यात येणार असून मतमोजणीसाठी निवडणूक प्रशासन सज्ञ असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी पद्माकर गायकवाड यांनी दिली.दरम्यान, एकूण १४ टेबल्सवर २६ फेऱ्यांद्वारे मतमोजणी केली जाणार आहे. प्रारंभी टपाली मतांची मोजणी करण्यात येणार असल्याचेही गायकवाड यांनी सांगितले.

मतमोजणी संदर्भात अधिक माहिती देताना निवडणूक निर्णय अधिकारी पद्माकर गायकवाड म्हणाले की,तालुक्यातील आंबा येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या सभागृहात शनिवारी

### पद्माकर गायकवाड : सकाळी ८ वाजता होणार मतमोजणीस प्रारंभ

सकाळी ८:०० वाजता विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीस प्रारंभ करण्यात येणार आहे. एकूण १४ टेबल्सवर २६ फेऱ्यांद्वारे मतमोजणी होणार आहे.प्रारंभी टपाली मतदान व त्यानंतर मतदान यंत्रातील मतांची मोजणी केली जाणार आहे.मतमोजणीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण तसेच आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.साधारणपणे दुप-ारनंतर निवडणुकीचा निकाल हाती येईल असेही गायकवाड यांनी सांगितले.

## भोकरदन शहरात आज मतमोजणी साठी वाहतुक मार्गात बदल

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची मतमोजणी दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडणार आहे. भोकरदन विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी ही जालना ते भोकरदन या महामार्गालगत असलेले नगर परिषद मंगल कार्यालय भोकरदन येथे होणार असुन, मतमोजणीकरीता विविध पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात येण्याची शक्यता असल्याने अवजड वाहनांच्या रहदारीमुळे क्षुल्लक बाबीवरुन विवादीत परिस्थिती निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता -नाकारता येत नाही. सुरक्षेच्या दृष्टीने व वाहतुकीच्या सुनियमनासाठी भोकरदन ते जालना या मुख्य महामार्गावरील अवजड वाहनांना पर्यायी मार्गाने वळविण्यात आले आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ ची कलम ३६ अन्वये, पोलीस अधीक्षक, अजय कुमार बसंल यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन जालनाकडुन भोकरदन मार्गे सिल्लोड, जळगाव, जाफ्राबाद, बुलढाणाकडे जाणारी वाहने तसेच भोकरदन मार्गे जालनाकडे येणारी अवजड वाहनांना दिनांक २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी ०७:०० वा.ते २३:०० वाजेपर्यंत खालील नमुद पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश देण्यात आलेले आहे.

जालनाकडून भोकरदन मार्गे जळगावकडे जाणारी अवजड वाहने ही छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजूर, फुलंब्री मार्गे जळगावकर्ड जातील तसेच जळगावकडून भोकरदन मार्गे जालनाकडे जाणारी अवजड वाहने ही याच पर्यायी मार्गाचा अवलंब करतील. जा-लनाकडून भोकरदन मार्गे बुलढाणा जाणारी अवजड वाहने ही छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजूर, टेंभुर्णी, जाफ्राबाद मार्ग बुलढाणाकडे जातील तसेच बुलढाणाकडून भोकरदन मार्गे जालनाकडे जाणारी अवजड वाहने ही याच पर्यायी मार्गाचा अवलंब करतील. सिल्लोडकडून भोकरदन मार्गे जाफ्राबाद, बुलढाणा जाणारी वाहने ही मालखेडा, आव्हाना, आसडी, वाकडी, मलकापूर, आन्वा पाटी कडे मार्गे जाफ्राबाद, बुलडाणा जातील तसेच बुलडाणा, जाफ्राबाद कडून भोकरदन मार्गे सिल्लोड कडे जाणारी वाहने ही याच पर्यायी मार्गाचा अवलंब करतील. सिल्लोड कडून भोकरदन मार्गे जालनाकडे जाणारी हलके चारचाकी वाहने ही राजस्थान हॉटेल (नांजा पाटी) भोकरदन, नांजा पाटी, नांजावाडी, नांजा, नांजा पाटी (जालना रोड) मार्ग जा-लनाकडे जातील तसेच जालनाकडून भोकरदन मार्गे सिल्लोडकडे जाणारी हलके चारचाकी वाहने ही याच पर्यायी मार्गाचा अवलंब करतील. जाफ्राबादकडून भोकरदन मार्गे सिल्लोड, जळगावकडे जाणारी वाहने ही आन्वा पाटी, वाकडी, आन्वा, शिवना, अजिंठा मार्गे सिल्लोड जळ-गावकडे जातील तसेच जळगांव, सिल्लोडकडून भोकरदन मार्गे जाफ्राबादकडे जाणारी वाहने ही याच पर्यायी मार्गाचा अवलंब करतील. जाफ्राबाद, बुलढाणाकडुन भोकरदन मार्गे जालनाकडे जाणारी वाहने ही सिपोरा बाजार, दाव-तपुर, टाकळी, बरंजळा साबळे, नळणी, राजुर मार्गे जा-लनाकडे जातील. तसेच जालनाकडून भोकरदन मार्गे जाफ्राबाद, बुलढाणाकडे जाणारी वाहने ही याच पर्यायी मार्गाचा अवलंब करतील. जालनाकडून भोकरदन शहारात जाणारी अवजड व हलके चारचाकी वाहने ही उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, भोकरदन, क्रिडा संकुल मार्गे भोकरदन शहरात जातील तसेच भोकरदन शहरातून जालनाकडे जाणारी अवजड व हलके चारचाकी वाहने ही याच पर्यायी मार्गाचा अवलंब करतील. वरिल मार्गाचे अवजड व हलके चारचाकी वाहतुकी मध्ये दिनांक २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी ७:०० वा.ते २३:०० वाजेपर्यंत बदल करण्यात आला आहे. तरी सर्व वाहन धारकांनी याची नोंद घेण्याचे आदेश पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी दिले आहे.

## परतूर विधानसभेच्या मतमोजणीसाठी प्रशासन सज्ञ

### बॉम्ब शोधक, नाशक पथकासह प्रशासनाच्या वतीने मतमोजणी केंद्राची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीचा निकाल आज शनिवारी (दि. २३) रोजी घोषित करण्यात येणार असून मतमोजणीसाठी निवडणूक प्रशासन सज्ञ असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी पद्माकर गायकवाड यांनी दिली. दरम्यान,बॉम्बशोधक नाशक पथक जालना यांच्या पथकाने मतमोजणी केंद्राची पाहणी केली. यावेळी श्वानपथकही उपस्थित होते हे विशेष.

तालुक्यातील आंबा येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या सभागृहात शनिवारी विधानसभा निवडणुकीची मतमोजणी होणार आहे.खबरदारी म्हणून पोलीस आणि प्रशासनाच्या वतीने मतमोजणी केंद्राची पाहणी करण्यात आली.यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार डॉ. प्रतिभा गोरे, सोनाली जोंधळे,नायब तहसीलदार विनोद भालेराव,लक्ष्मीकांत खळीकर,एस. यु. शिंदे,संतोष पवार, पी. बी. पाटील, ज्ञानेश्वर ढवळे, विक्रम वाघमारे,संजय कास्तोडे,कृष्णा सोनवणे एस .एच. नीलवंत, डी.एन.शेवाळे, एस.जी.उगले, एस. बी. डाखोरे यांच्यासह निवडणूक कर्मचारी उपस्थित होते. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी पद्माकर गायकवाड यांनी मतमोजणी कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना दिल्या. स्निफर डॉग स्वीटी व योग्य ती काळजी यावेळेस सूचना देण्यात आल्या.

## उस्वद शिवारात झाले बिबट्याचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील कानडी येथील शेतकरी यांना पूर्णा नदीकाठच्या उसवत शिवारात दुपारी बिबट्या दिसून आला यामुळे शेतकऱ्याची भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कानडी येथिल शेतकरी एकनाथ खंदारे .विष्णु खंदारे यांचे पूर्णा नदीकाठच्या उत्सव शिवारात शेती आहे दोघे गुरुवारी दुपारी शेतात जात असताना त्यांना बिबट्या दिसून आला व काल रात्रि पंढरी बांगर यांच्या शेतात आखड्यावर पण बिबट्या दिसला ही माहिती ग्रामस्थांना येऊन सांगितलं बिबट्या दिसल्याची माहिती महसूल विभागाला कळवली असल्याचे कृष्णा खंदारे अमोल खंदारे यांनी सांगितले यानंतर ग्रामस्थ सह वनविभागाच्या पथकाने परिसरात पाहणी केली

विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान कार्यकर्त्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली; लोणीकरांनी व्यक्त केले कार्यकर्त्यांची ऋण

## बहाद्दर कार्यकर्त्यांच्या प्रचंड मेहनतीच्या बळावर मी पुन्हा एकदा निवडून येईल -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

कुठलाही राजकीय वारसा नसताना सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेला एक सर्वसामान्य व्यक्ती आहे. मी एक सर्वसामान्य शेतकऱ्याचा मुलगा असून केवळ बहाद्दर कार्यकर्त्यांच्या प्रचंड मेहनतीच्या बळावर पुन्हा एकदा निवडून येईल आणि जनता जनार्दनाची सेवा करण्याची संधी मला मिळेल असा विश्वास माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज व्यक्त केला मंठा व परतुर येथे आज माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज आभार मेळावा घेतला यावेळी आपली प्रतिष्ठा करून अधिकाधिक मताधिक्य आपापल्या बूथवर देणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी ऋण व्यक्त केले

मागील पंचवार्षिक मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात पाणीपुरवठा स्वच्छता मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली त्यावेळी मंत्रीपदाच्या कार्यकाळातील ४७०० कोटी रुपयांची विकास कामे तर मागील अडीच वर्षात ३००० कोटी रुपयांच्या विकास कामांना जनता जनार्दनाने पसंती दिली दिली असून अत्याधिक मताधिक्याने मी पुन्हा एकदा निवडून येईल असा विश्वास देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, कुठलाही राजकीय वारसा नसताना केवळ बलाढ्य कार्यकर्त्यांच्या हिमतीवर आजपर्यंत राजकारण आणि समाजकारणामध्ये टिकून आहोत माझे पूर्वजन्मीचे काही संचित किंवा पुण्य असेल त्यामुळे मला असे बहाद्दर कार्यकर्ते लाभले असे शब्दात आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या कार्यकर्त्यांचं कौतुक केलं. विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान कार्यकर्त्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली असून प्रत्येकाने आपले बूथ वर अधिकाधिक मतदान



भारतीय जनता पक्षाच्या कमळ चिन्हाला कशी मिळेल यासाठी प्रयत्न केले आहेत त्या सर्व कार्यकर्त्यांचा मी आजन्म ऋणी आहे अशा शब्दात आमदार लोणीकरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या, महाराष्ट्रातल्या २८८ मतदार संघामधील कुठल्याही मतदारसंघात एवढे बहाद्दर कार्यकर्ते नाहीत असेही यावेळी लोणीकर म्हणाले. यावेळी भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर परतुर विधानसभा निवडणूक प्रमुख गणेशराव खवणे संदीप भैया गोरे भाऊसाहेब गोरे भाऊसाहेब कदम सतीशराव निर्वळ शत्रुघ्न कणसे रमेश भापकर राजेश मोरे पंजाबराव बोराडे संपत टकले हरेराम माने संभाजी वारे बद्रीनारायण ढवळे भगवानराव मोरे दया काटे डॉ. सुकराज कोटेचा सुरेश सोळंके नितीन जोगदंड दिगंबर मुजमुले कैलासराव बोराडे माऊली शेजुळ जिजाबाई जाधव विकास पालवे प्रदीप ढवळे नागेशराव घारे गणेशराव घारे प्रसादराव बोराडे विठ्ठलराव काळे गजानन लोणीकर गजानन लिपणे श्रीनिवास देशमुख विलास घोडके डॉ. शरद पालवे रवींद्र सोळंके उद्धवराव गोंडगे विठ्ठलराव काळे दतराव कांगणे गजानन देशमुख अशोकराव बरकुले नरसिंग राठोड मधुकर मोरे बाबाराव थोरात नसरुल्ला काकड भगवान आरडे दारासिंग चव्हाण कैलास चव्हाण महेश पवार मोहन आढे अमोल मोरे संदीप बाहेकर दीपक दवणे शेषनारायण दवणे प्रवीण सातोनकर मिराज खतीब प्रकाश चव्हाण कृष्णा आरगडे आनंद जाधव नितीन सरकटे विवेक काकडे शिवाजी बलम खाने एडवोकेट काळे ओम मोर जितेंद्र सरकटे प्रल्हादराव सरकडे दिनेश होलानी जगनराव टकले सुभाष चव्हाण सुरेश राठोड सेवकराम राठोड नितीन चाटे सोपान वायाळ दतराव खराबे तुकाराम सोळंके सोपानराव खरात माऊली गोंडगे संतोष बोराडे राजेभाऊ खराबे गजानन उफाड विक्रम उफाड विनोद राठोड जगदीश पडोळकर नरेश कांबळे शंकर बांडगे गजानन शिंदे तुकाराम वैद्य लहू आढे रावसाहेब वैद्य नितीन चव्हाण राजेंद्र वायाळ महादेव नानोटे कल्याण उबाळे कल्याण कदम दीपक दवणे उद्धव वायाळ यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती